एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे

# उड्डाणटप्पू

तिसरे
उड्डाण



## श्रीरंग कौलगी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# उड्डाणटप्पू

## ( एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

## तिसरे उड्डाण

श्रीरंग कौलगी

# उड्डाणटप्पू

## ( एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

## तिसरे उड्डाण

**लेखक : श्रीरंग कौलगी**

सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. +९१ ९९२०६ १२९९६
ई मेल shreerangkaulgi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके नियमित मिळवण्यासाठी या क्रमांकावर आपले नाव व गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २ नोव्हेंबर २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय



माझे नाव श्रीरंग कौलगी, शिक्षणाने आणि पेशाने मेकॅनिकल इंजिनियर.

माझे कार्यक्षेत्र नवीन मशीन डिझाइन्स करणे, ती डिझाइन्स विकसित करणे, त्याचे पहिले उत्पादन, म्हणजे प्रोटोटाईप करतांना बाहेर येणाऱ्या अडचणी सोडविणे आणि मग ती मशीन वापरात आणायला मदत करणे असे होते.

नव्याने आणि मुळापासून विचार करायला लागणे ही आमच्यासाठी पहिली आणि मूलभूत गोष्ट होती.

त्या अनुषंगाने आजूबाजूला चौकस नजरेने पहाणे आणि मिळेल तिथून नव्या कल्पना प्रत्यक्षांत आणणे हे आमच्यासाठी आवश्यकच होते.

जगाकडे चौकस दृष्टीने बघतांना आणि दिसलेल्या गोष्टींची ॲनालिटिकल चिरफाड करताना काही गोष्टी नव्याने सुचल्या त्या इथे मांडल्या आहेत.

एका इंजिनियरच्या दृष्टीतून जग कसे दिसते याची झलक आहे ही.

इथे सगळ्या गोष्टी नव्या नाहीत पण वेगळ्या अंगाने दाखवायचा एक प्रयत्न केला आहे.

प्रयोग कसा झाला आहे ते वाचक ठरवतील.

श्रीरंग कौलगी.

------------------------------------

# अर्पण पत्रिका

काहीतरी लिहावे असे वाटायला लागले. पण आपले वाचणार कोण असेही वाटले. पण तसे झाले नाही. ज्यांच्याकडे हे साहित्य पाठवले त्यांनी ते नुसते वाचले नाही तर त्यावर साधक बाधक प्रतिक्रियाही दिल्या. चांगली टीकाही केली. काही प्रतिक्रिया आणि टीका नवे विषय देऊन गेल्या.

त्या सर्व वाचकांना, त्यांत वर्गमित्र आले, घरचे आले आणि खास जवळचे हक्काचे टीकाकार वाचक आले. त्या सर्वांना साष्टांग दंडवत घालून हे पहिले प्रकरण अर्पण करतो.

ई साहित्य ने हे विस्कळीत लेख एकत्र आणायला मदत केली आणि ते नीट जुळवायचे काम कसे उत्तम केले आहे ते बघाच. त्यांचे मी हार्दिक आभार मानतो.

"मॅन प्रोपोझेस अँड गॉड डिसपोझेस" या उक्ती प्रमाणे आपले प्रयत्न सफल व्हायला ती दैवी शक्ती जी दिसत सुद्धा नाही, तिच्या चरणी हे पुष्प अर्पण.

# प्रस्तावना

या संग्रहात जे लेख प्रस्तुत केलेले आहेत ते एका इंजिनियरच्या मनात आलेले विचार आहेत. पण ते सगळयांनाच लागू होतात.

आपल्या मनांत अनेक विषय घोळत असतात, त्यांना तात्कालिक कारण असते किंवा पूर्वी काहीतरी पाहिलेले ऐकलेले असते त्याची पार्श्वभूमी असते.

रोज घडणाऱ्या घटना कधी नवीन पैलू घेऊन येतात. त्या दुसऱ्यांना सांगून पहाव्यात हा हेतू इथे आहे.

विषय वेगवेगळे आहेत आणि त्यांची एकमेकांशी रंगसंगती नाही, पण सगळे आपल्याला कधी न कधी स्पर्श करून गेलेले असेल.

हे ललित लेख किंवा मुक्त विचार प्रकटन म्हणूनच पाहावे, उगीच त्यातून खोल अर्थ काढू नये हा हेतू आहे.

बघा तुमचे विचार, अनुभव आमच्याशी जुळतात का.

हा तिसरा संग्रह आहे. असे अजून संग्रह तुमच्यापुढे ठेवण्याचा मानस आहे.

"वर्क इन प्रोग्रेस" मानावे याला.

# लेख-अनुक्रम


सत्तरी
आफ्टर लाईफ
मारुतीचे आत्मचरित्र
माणसाळवणे
अपनी गलीमें कुत्ता शेर
भविष्यवाणी
गणित शिकल्याचे परिणाम
फायनल
एकवीस ते बावीस
आ बैल मुझे मार
लय आणि ताल
एकुलता एक
माझ्या आवडीचे लेखक
११ फेब्रुवारी २०२२
कानसेन की तानसेन?
उंची आणि पॉवर
स्त्री शक्ति
लक्ष्मी आणि सरस्वती
संमेलनाच्या पूर्वसंध्येला
पुढचा पार्ट
शैक्षणिक सहल
राम
बस नंबर ग्यारह
"रूळ"लेल्या वाटा
"यंत्र"मुग्ध
युगांचे चक्र
वर्णांचे महत्व
कान्होबा
अग्निजिव्हा
सिंहावलोकन

# सत्तरी

आमचा अवतार या पृथ्वीवर झाल्यापासून पृथ्वीने सूर्याभोवती त्र्याहत्तर प्रदक्षिणा घातल्या. चौऱ्याहत्तरावी चालू आहे. त्यातल्या फक्त पाच प्रदक्षिणा तश्या मजेच्या झाल्या. त्यावेळी आमचे पृथ्वीवरचे कोऑर्डीनेट्स थोडे बदलले होते.

चंद्राने तेवढ्यात नऊशे एकोणीस वेळा पृथ्वीभोवतो प्रदक्षिणा घातल्या म्हणजे पर्यायाने आमच्या भोवतीच की. एखादं दुसरी प्रदक्षिणा मागे पुढे.

सूर्य आपली जागा सोडून ५.०६८१५ X १०^११ इतके किलोमीटर पुढे गेला आमचा अवतार सुरू झाल्या पासून. त्याच्या आकाशगंगेच्या प्रवासांत. आणि तो आपल्या जवळच्या साथीदारांपेक्षा ४.६०७४ ×१०^१० किलोमीटर दूर गेला किंवा जवळ आला. थोडे लाख किलोमीटर इकडे तिकडे.

आतापर्यंत डोके फिरायला लागले असेल तर दुसरा काहीतरी विचार करूया.

सत्तावीस वजा नऊ म्हणजे किती असे राजा अकबराने राजा बिरबलाला विचारलेले आम्ही अकबर बिरबल पुस्तकांत वाचले आहे. उत्तर शून्य असे आहे असेही वाचल्याचे आठवते. कसे काय? अहो, सत्तावीस नक्षत्रातली पावसाची नऊ वजा केल्यावर काय उरणार? शून्यच ना?

मग आपल्या त्र्याहत्तर सूर्य प्रदक्षिणेतल्या पाच वजा केल्या तर काय उरणार? शून्यच की.

इंजिनियरिंगच्या कॉलेजांत येण्यापूर्वीच्या आमच्या सूर्य प्रदक्षिणा तिथे येण्याची तयारी करायला होत्या. मग सूर्याला पाव शतक प्रदक्षिणा घातल्यावर आम्ही प्रगल्भ झालो. जगाला टक्कर द्यायची ताकद आली अंगांत आणि डोक्यांत.

नंतरच्या आमच्या सूर्य प्रदक्षिणा नवनिर्माण करण्यांत गेल्या. नवनिर्माण घरांत, बाहेर आणि देशांत करतांना सूर्य काही आडवा आला नाही आणि चंद्रही.

डोके वापरायचे तिथे डोके वापरले, हात पाय वापरायचे तिथे हात पाय आणि इतर अंगे वापरायची तिथे ती. नवनिर्माण करतानाच्या कळा सोसल्या

a

आणि लाडूही खाल्ले. जिकडे मार खायचा तिथे मार खाल्ला आणि जिकडे ओवाळून घ्यायचे तिथे ओवाळून घेतले.

असे म्हणतात की फुगा गॅस भरून हवेत सोडला की तो त्याच्या कुवती इतकाच उंच जातो आणि मग हळूहळू पुन्हा खाली येतो. आपला फुगा जेवढा जायचा तेवढाच उंच गेला. इतर फुगे काही वर गेले काही खाली. शेवटी फुगेच ना ते? हळूहळू खाली येताहेत. काही अजून उंच तरंगताहेत पण त्यांच्या कडे बघून आपल्या फुग्याची शरम नाही वाटत आता.

सूर्याभोवतीची सत्तरावी प्रदक्षिणा केल्यावर आता शहाणपण सुचायला लागले आहे. "तुमने क्या खोया जो तुम्हारा था? तुम क्या पाओगे जो तुम्हारेपास नही है? क्या पाना था और कितना? आखिर उस सूरज को देखो। उसको क्या पाना है फिरभी वो अपनी क्रिया करतेही रहता है।" वगैरे वगैरे.

हे शहाणपण जर सूर्याभोवतीच्या तिसाव्या किंवा चाळिसाव्या किंवा अगदी पन्नास साठाव्या प्रदक्षिणेच्या वेळी सुचले असते तर आमच्या सारख्या इतर प्रवाशांना जरा ज्यास्त आरामाचे जीवन नसते का जगता आले. उगाच टेन्शन घेऊन आरामाची जिंदगी त्रासांत घालवली.

पण हे असेच असते बघा. करून झाल्यावर आणि धावून झाल्यावर असे सुचते. चला, ही सुद्धा एक देवाचीच देणगी आहे. कामाच्या वेळी "दौडते रहो" आणि आरामाच्या वेळी आलेले शहाणपण वाजवत रहा.

पृथ्वीतर अजून चार पाच बिलियन वर्षेपर्यंत सूर्याची प्रदक्षिणा करतच रहाणार आहे. आणि चंद्रही आमच्या भोवती. हजारावी झाली तर जल्लोष करू. पण मग पुढे काय? पृथ्वी काय किंवा चंद्र काय, प्रदक्षिणा घालत रहाणारच आहेत. त्यांना काय पडली आहे त्या मोजायची?

मग आता आपण तरी प्रदक्षिणा मोजायच्या कशाला? जेवढ्या सूर्य प्रदक्षिणा घालायच्या तेवढ्या घालू आणि मग लांबून अंतराळातून पृथ्वीची ही मजा पाहू.

आता प्रदक्षिणा नाही मोजत बसणार.

# आफ्टर लाईफ

डोळे किलकिले करून बघितले. प्रखर पांढरा प्रकाश होता काही दिसत नव्हते. मधूनच सांवल्या असाव्यात तसे काही तरी डोळयासमोरून जात होते. कानात सूंईं असे निरनिराळ्या फ्रिक्वेन्सीचे आवाज ऐकू येत होते त्यापुढे बाहेरचे काहीच ऐकू येत नव्हते. "डॉक्टर, ऑक्सीजन बढाऊँ क्या? कितना रक्खूं?" असे अगदी क्षीण आवाजांत ऐकू आले. "Keep maximum setting. Keep defibrillator ready. I think the patient is sinking fast". "Let the relatives have a look. Only near relatives. Is that clear?". कोणीतरी बोलले, डॉक्टरच असावा बहुतेक. "एक बार देखने दीजिए और प्लीज बाहर रुकने को कहिये। Sorry, he may come through, but it will be a miracle". डोळ्यांपुढचा प्रकाश अंधुक व्हायला लागला होता. दिसणे ही अंधुक होत चालले होते.

एक काळा सांवळा जवान पुढे उभा होता. चांगला उंच धिप्पाड, पण अंगावर कपडे नव्हते आणि कपड्यासारखेच काहीतरी त्याच्या अंगालाच लागलेले दिसत होते. "चला." मला म्हणाला. "कुठे, आणि तुम्ही कोण?" मी विचारले. आवाज तर काही फुटला नाही गळयातून माझ्या पण त्याला समजले असे दिसले. "मी यमदूत आहे, साहेबांनी बोलावले आहे आता." तोही काही तोंडाने म्हणाला असे वाटले नाही. ओहो. हेच काय ते? ते?

"चला", मी म्हटले नाही फक्त विचार केला, त्याला समजले ते. त्याने माझा हात धरला आणि मला वर उचलले. खाली वळून पाहिले तर हॉस्पिटलची खोली दिसत होती, आयसीयूच असावी, दहा बारा बेड होती, आत्ताच मला त्याने उचलले तिथे बेड वर एक माणूस निजला होता. "अरे हाच मी होतो का?" आजूबाजूला माणसे उभी होती, बायका आणि पुरुष. सगळे स्तब्ध होते.

"म्हणजे ऐंशी वर्षे मी ज्याच्यांत राहिलो तेच हे शरीर का? हेच ते असते का?" माझ्या मनात विचार आला, त्याने तो वाचला वाटते. त्याने मान डोलावली. याला माझा विचार कसा कळला? मी तर मराठीतून विचार केला होता. "आता या नंतर भाषा नसते आपली, तो म्हणाला." म्हणजे म्हणाला नाही पण कळले मला. "आणि इथे आता बाई, बुवा, माणूस, जनावर वगैरे काही नाही. फक्त एक चेतना. यालाच आत्मा म्हणतात. तो आता आत्मा आहेस." तो "म्हणाला".

तो मला घेऊन चालला होता, वर वर जातो आहे आम्ही असे वाटत होते. इतरही असेच काही "आत्मे" चालले होते. "आपण नक्की कुठे आणि कसे जाणार? मी "विचारले", म्हणजे विचार केला. "बघत रहा." तो "म्हणाला" म्हणजे "विचारला". पण कळले मला.

a

आम्ही लांब लांब चाललो होतो. जमीन खाली खाली चालली होती, सर्वत्र अंधार पण जागोजागी प्रकाशाचे पुंजके दिसत होते. म्हणजे आपण अंतराळात आलो की काय? आपल्याला काहीच फरक जाणवत नाहीये. पण डोळे नसून दिसल्यासारखे वाटते आहे, कान नसून ऐकल्यासारखे आणि डोके नसून विचार येताहेत मनात. काहीतरी विशेष आहे खरे.

"Hi, nice to see you here. Remember me? अरे, हा तर आपला मित्र जोसेफ. माझ्या बरोबर इंजिनीयर होता. "Yes, of course, when did you come here?" हा तर पंचवीस वर्षांपूर्वी गेला होता, मग तो मला कसा काय ओळखतो? आणि इंग्लिश मधून कसा "विचारतो" आहे? "I came here a while ago. I was watching you from here. You were doing a good job." अरेच्चा, याला कसे कळले मी काय करत होतो ते. हा एक दिवस चक्कर येऊन पडला होता. पंचवीस वर्षांपूर्वी, ऑफिस मध्येच. त्याला हॉस्पिटल मध्ये नेऊन ठेवता ठेवता गेला होता.

"अरे साब, पहचाना क्या? आपसे पहले हमने नंबर लगा दिया। आपने हमारी बहुत मदद की थी। लेकिन क्या करे, हमको आपको छोड़ कर जाना पड़ा। आईये अब साथ साथ चलेंगे।" ओहो, हा तर आपला युसुफभाई, मेकॅनिक. बिचारा काही त्याची चूक नसताना अंगावर गाडी उलटली आणि गेला होता.

तर असे आहे काय? आत्मे बरेच मोकळे हिंडतात की इथे. मग आपल्या त्या काळेबाई ही भेटतील इथे. त्या काय, दिसताहेत की, बघून हसल्या बघा माझ्याकडे. "अरे बाबा, आता पूर्वीचे सगळे विसरायचे, जे करायचे होते ते केले. आता मी तुझी साहेब नाही आणि तू माझा ट्रेनी नाहीस. सगळे आपण सारखेच आहोत."

मी त्या यमदूताला विचारले, "इथे काळ वेळ काही असते की नाही? सगळे मला एक सारखेच दिसताहेत. आणि बाई, बुवा, माणसे, इतर प्राणी काही फरक आहे की नाही?" "आता फरक काही नाही, तो बघा तुमचा खंडेराव कुत्रा येतो आहे. आणि तुमची मैना साळुंकी त्याच्या बरोबर आहे. तिच्याबरोबर ती मनी माऊ दिसली का? तिनेच त्या मैनेची सुटका केली होती त्या पिंजऱ्यातून आणि इकडे पाठवली".

"इथे सर्व सारखे. ज्याने ज्याचे काम केले, जीवन घालवले त्याप्रमाणे त्याला इकडे ट्रीटमेंट मिळते. एकदा ट्रीटमेंट झाली की सर्वजण मोकळे फिरायला"

"मग ते दुष्ट खुनी लोक, त्यांचे काय? तेही असेच मोकळे असतात का फिरायला?" मी विचारले. "हो त्यांचे सगळे तपासून झाले आणि ट्रीटमेंट झाली की तेही मोकळे". असे कसे काय असू शकते? तिकडे पृथ्वीवर एवढे थैमान

घातलेले, एवढ्या लोकांना मारलेले, इतका छळवाद केलेले आणि साधुसंत सारखेच?" "आता साहेबांनाच विचारा, ते देतील तुम्हाला उत्तर".

पोचलो आम्ही एका ठिकाणी. जमीन वगैरे नव्हतीच तिथे. पण दोन मोठी दारे होती. जवळच एक मोठी खुर्ची होती, सिंहासनासारखी, इकडेसुद्धा सिंहासन असते का? एक विचार चमकून गेला. एक मोठीशी व्यक्ती तिथे बसली होती. "कोण हे", मी विचारले. "चित्रगुप्त साहेब." तो म्हणाला.

जवळ गेलो. त्या साहेबांनी माझ्याकडे पाहिले. माझ्यावरून एक किरणच गेला असे वाटले. सर्वत्र सोनेरी प्रकाश पडला. "साहेब खुश आहेत वाटते तुमच्यावर. नाहीतर लाल किंवा निळा प्रकाश पडतो. कोणा कोणावर तर जांभळा किंवा हिरवा प्रकाश पडतो. काही लोकांवर तर प्रखर पांढरा प्रकाश पडतो. मग त्यांची कसून खूप वेळ चौकशी होते." "आत्तापर्यंत कुणाची चौकशी सगळयांत ज्यास्त वेळ झाली होती?" मी विचारले, असेच उत्सुकता म्हणून. "एक कोणीतरी पंतप्रधान की प्रेसिडेंट होता. त्याची चौकशी संपता संपत नव्हती. आणि त्याच्यावर पडलेला लाईट इतका ब्राईट होता की आम्हीसुद्धा भाजून निघालो". अरेच्चा, यमदूत सुद्धा इंग्लिश मधून विचार करतो की. कोण असेल बरं तो पंतप्रधान का प्रेसिडेंट? आणि शेवटी काय झाले त्याचे? "त्या डावीकडच्या दरवाज्यातून लोटला आत त्याला, अजून बाहेर आला नाही". हो का? म्हणजे इथेतरी न्याय असतो तर.

माझा नंबर आला. तो यमदूत माझा हात सोडून बाजूला उभा राहिला. त्या चित्रगुप्ता सारख्या व्यक्तीने त्याला एक चिठ्ठी दिली, तो वाकून निघून गेला. दुसरी ड्युटी करायला. मला चित्रगुप्ताने जवळ बोलावले. "कैसे हो आप? हमें क्षमा किजीए, आपको बुलानेमे थोडी देरी हुई। आपका खाता मैने देखा है। यह दाएं तरफ का दरवाजा है उससे जाइये। आपको आगे बताएंगे वहां।" चित्रगुप्त हिंदीत का बोलत होता ते कळले नाही. मला वाटले हे लोक संस्कृतमधूनच बोलतात. पण एकंदरीत प्रसन्न वाटला.

गेलो त्या दारातून आंत. चांगले स्वच्छ होते सगळे, मऊ सोनेरी प्रकाश, विरळ ढगासारखे दिसणारे ते आकाश, जिकडे तिकडे चांदण्याच चांदण्या. कोणीतरी आले पुढे भेटायला. तरल शरीर, तरल आवरणे, मधुर स्मितहास्य, गोड आवाज. "कोण आहात आपण?" "अरे, मी तुझी आज्जी होते. किती आवडत होतास मला." "आणि बाकीचे सगळे? ते कुठे आहेत?" "सगळे आहेत इथेच कुठे कुठे".

"मग त्या डाव्या दरवाज्यातून कोण जाते?" "ते आपल्याला सांगता येत नाही. ती चित्रगुप्त ठरवतो काय ते". "मग इकडे काही 'ऍडजस्टमेंट' वगैरे होत नाही का?" मी विचारले. "कुणी जर तसे करायचा प्रयत्न केला तर त्यांच्या वरचा प्रकाश पांढरा होतो आणि मग चित्रगुप्त त्यांची कसून चौकशी करतो. बहुतेक

a

असे ऍडजस्टमेंट करू पाहणारे लोक डावीकडेच जातात", आज्जीचा आत्मा म्हणाला.

"मग, आता?" मी विचारले. "आता काही नाही, हिंडायचे फिरायचे, आराम करायचा". "पण मला तसा आराम करायला आवडत नाही. मी कोण होतो, कसा होतो ते सांगाल का मला?" मी विचारले.

"तू मागच्या जन्मी माझा नातू होतास, पृथ्वीवर. त्याच्या अगोदर तू एक अमिबा जीव होतास. त्याच्या पूर्वी तू एक गाय होतास, आणि त्याच्या पूर्वी तू एक वटवृक्ष होतास. पण ते असू दे आता, ते मागे पडले. आता पुढे तू काय आणि मी काय, कुठे जाणार ते माहीत नसते आपल्याला, म्हणून आता हिंडायचे फिरायचे, आराम करायचा". "बोलावले की जायचे चित्रगुप्ताकडे."

तसे तर होणार नाही. आपण काही आराम करायला इथे आलो नाही. मग करायचे काय? हिंडता फिरता एक अजून भेटले. "How do you do? I was on the earth for sixty seven years. There is a place called India. Do you know it, are you from the earth?" त्यांनी विचारले. "हांजी, में अर्थ से, इंडिया से आया हूँ। आप कौन और यहां कैसे और कब आये?" मी उत्तर दिले, म्हटले बघू याला हिंदी येते का. "हां, मैं यहां आके बहुत समय हुआ है। में इंडियामें एक वकील था। वैसे तो मेरे बहुतसे साथी थे, उनको तो उस बाएं

वाले दरवाजेसे जाना पड़ा, केवल मुझे ही उस दाएं वाले दरवाजेसे भेजा। क्यूं? नही पता। शायद मैंने एक केसमें उस औरतकी मदद की थी। बेचारी बहुत परेशान थी। उसके पतीको किसीने मार दिया था और मैंने उन बदमाश लोगोंको मौतकी सजा सुनवाई थी और औरतको उसके बच्चोंके साथ पाला था।" बघा असेही होते. याने त्या बाईची आणि मुलांची काळजी घेतली एवढे एक कार्य त्याला इथे घेऊन आले.

पण आता काय करायचे? पुन्हा चित्रगुप्ताकडे गेलो. "सर मुझे फिरसे पृथ्वीपर जाना है। जा सकते हैं क्या?" त्याने पुन्हा स्मित केले माझ्याकडे. "अरे भाई, तुम्हारा खाता तो बहुत प्लस में है। हां, जा सकते हो। क्या होना है जाकर? फिर इंसान ही बनना है क्या? किसके यहां जाना चाहते हो?" मी थोडा विचारात पडलो. काय सांगावे याला आता. मग सरळ एक शॉर्टकट मारला. "मुझे मेरे बेटे की बेटी बना सकते हैं क्या? खुशी खुशी रहूंगा। कुछ और अच्छा काम करूंगा। फिर सत्तर पिचहत्तर सालों के बाद फिर बुला लीजिये। आ जाऊंगा।" चित्रगुप्त फारसे विचारात पडलेले दिसले नाहीत. त्यांनी त्यांच्या वहीचे नवे पान उघडले, एक नवी एन्ट्री केली. "हां, जा सकते हो अब। तथास्तु।"

पूर्ण अंधार आहे. सगळया बाजूने घट्ट आवळले आहे मला. पाठीमागून ढकलली जाते आहे मी. डोके माझे तर एक बोगद्यातून हळूहळू चालले आहे. कसेतरी पुढे जाते आहे. एकदम बाहेरचा प्रकाश आला. मी डोळे गच्च मिटून

घेतले. मग हळूहळू आवळले जाणे कमी झाले, एकदम गार वाटले. काहीतरी घुसले माझ्या छातीत. आणि मला जोराने रडू आले. "वा, छान, मुलगी झाली हो. एकदम सुरेख". कानावर आवाज आले, खणखणीत. डोळे उघडून पाहिले, प्रखर प्रकाश पडला होता. कानात आवाज नुसते घुमत होते.

मी रडणे थांबवले. कोणीतरी मला हलकेच पुसत होते. मऊ कापडात गुंडाळत होते. छान वाटत होते मला. मस्त पैकी डोळे मिटून झोपून टाकले.

# मारुतीचे आत्मचरित्र

माझा जन्म मानेसर ला हरियाणात २००५ मध्ये झाला.

माझा जन्म म्हणजे आमच्या डिझायनर्सनी केलेली एक भेळच होती म्हणाना. एक बॉडी घेतली, त्याला अनेक इंजिनांमधून एक इंजिन निवडले, एक ट्रान्समिशन सिस्टिम फिट केली, ती सुद्धा याची गियरबॉक्स, त्याचे ड्राइव्ह शाफ्ट, एक चाकांचा सेट आणि दुसऱ्याच गाडीचे सस्पेंशन.

तसे म्हणजे माझी रूपरेषा १९९५च्या सुमारासच झाली होती. पाच माणसे आरामांत बसून शेकडो किलोमीटर सहज जाऊ शकतील असा माझा आकार आणि ताकद. अगोदरच्या मारुती ८०० पेक्षा मोठा, इंजिन मोठे, आरामा करता एसी, चार गियर्स, १४० किलोमीटरचा टॉप स्पीड, नेहमीच नव्हे, पण कधीतरी मजेसाठी किंवा इमर्जन्सी साठी, पण सेफ असा. अगोदर एक मॉडेल आणले होते, झेन नावानेच. चांगले लोकप्रिय झाले होते. त्याला जराशी पावडर लाली केली, नवीन मल्टि पॉईंट फ्युएल इंजेक्शन सिस्टीम लावली, झाला माझा अवतार तयार.

आता या बाळाचे नाव काय बरे ठेवावे? चार पाच मीटिंग मध्ये नुसता गोंधळ घातला होता. आधी सजेशन बॉक्स ठेवली, ती दोन दिवसांत भरून

वाहायला लागली. मग त्यांत पुन्हा निवडणूक ठेवली नावांची. तिथेही फाईट ड्रॉ झाली. मग आमच्या एमडींनी लोकशाही वगैरे बाजूला ठेवली आणि वरून दट्ट्या आणला. झेनच म्हणायचे. कारण माझ्या अगोदरचे मॉडेल झेन फारच प्रसिद्ध झाले होते. झेन नाव टाकून तर द्यायचे नाही पण हळूहळू मागे लोटायचे, कारण आता ते जुने झाले, दहा वर्षे झाली त्याला. काहीतरी नवीन पाहिजे.

मग माझे नाव मारुती सुझुकी झेन एस्टीलो ठेवावे असे "एकमत" झाले. मग माझ्या करता एक नवीन लाईन तयार केली आमच्या प्लांट मध्ये. त्याचवेळी माझे आयुष्य किती असावे याचीही चर्चा होऊन गेली. यावेळीच जपानच्या आमच्या लोकांनी मारुती सुझुकी चा ताबा घेतला होता, मग मारुती गाळून टाकून सुझुकीच ठेवावे असे ठरले. पण एस्टीलो ही मागे पडले आणि सुझुकी झेन ठरले.

सरकारी नियम होतेच. मग मला बी एस ३ ला योग्य ठरवले. पर्यावरणाची काळजी घ्यायला.

आम्ही तुमचे वाहक. चांगले दणदणीत शक्ती असणारे, खूप टिकणारे, तसे आमचे आयुष्य कमीतकमी वीस पंचवीस वर्षे तरी सहज असणार. पण लोक आम्हाला लौकर कंटाळतात, नवे पाहिजे असते त्यांना सतत. मग आमची

लाईन जास्तीत जास्त पाच वर्षे चालवायची असा प्लॅन झाला. मी त्या झेनच्या लाईन मध्ये शेवटी शेवटी जन्म घेतला.

जरासे इकडे बघा. आमचे इंजिन साठ हॉर्स पॉवरचे. पेट्रोलवर चालणारे. पण शेजारी उभे राहिलात तर आवाज नाही येणार त्या इंजिनाचा. बरं. आमची तब्येत अशी की पहिल्या दिवसापासून टॉप स्पीडला धावायची आमची तयारी. ते ब्रेक इन नाही की ती हळू चालवायची अडचण नाही. रस्ता आहे तिथे तर जाऊच, पण रस्ता नसेल तिथेही जाऊ, पण हळूहळू.

प्रत्येकाच्या नशिबात असते की कोण कुठे कसे चालवणार आहे ते. माझे नशीब चांगले. एका मेकॅनिकल इंजिनियरने मला निवडले आणि २००५ मध्ये नोव्हेंबर मध्ये त्यांच्या घरी आलो. मालक खूप चांगला होता, जपून गोडीने चालवायचा मला. आणि त्याला दोन मुलगे होते, तरणे बांड.......

आमची पहिली ट्रिप म्हैसूरला झाली. सगळ्या प्रकारच्या रस्त्यांवरून जाणे झाले. मी तरुण होतो आणि मालक हळूवार होता. चांगले एव्हरेज मिळाले. मालक, मुले खूष झाली. पहिल्याच ट्रिप मध्ये चामुंडी मातेचे आणि नंतर विठोबारायाचे दर्शन झाले.

a

मग आले मुंबईत धावणे. शेजारी एका मीटर वर दुसरी गाडी. जरा लक्ष दुसरीकडे गेले की धक्काबुक्की ठरलेलीच. तसेच झाले शेवटी. एका मासेवाल्या ट्रकने ढकलले मला बाजूला. तोल गेला माझा आणि गिडमिडत आदळलो जाऊन बाजूच्या फुटपाथवर. चांगलाच मार मिळाला मला, पण दुसऱ्या कुणाला खरचटलेही नाही.

टो चेनने ओढून आणले आमच्या दवाखान्यात. चांगला आठवडा पंधरा दिवस पाहुणचार घेतला. आता काय करावे? सगळे होते तसे झाले होते पण आता ओरिजिनल कसे असणार? पण माझी तब्येत सुधारली आणि अजून बऱ्याच ठिकाणी जाऊन आलो आम्ही. एकदा तर पार केरळांत मुन्नारला जाऊन आलो. फार मजेची ट्रिप झाली ती.

चांगली पंधरा वर्षे झाली या मालकांबरोबर. मालक तर चांगले होतेच, आता ती मुलेही जराशी मवाळ झाली होती. त्यातही आनंद म्हणजे माझी देखभाल फार छान केली होती त्यांनी.

पण हे बघा, आमचे दुखणे खुपणे चालूच असते थोडे फार. त्यांत आता मला किती कॉंपिटीटर झाले होते बघा. फक्त दहा वर्षांत रस्त्यावरच्या गाड्यांची संख्या आणि त्यांची वेगवेगळी रूपे बघितली तरी कळेल किती लौकर जुने होतो आपण ते.

माझी तब्येत थोडी नरम गरम व्हायला लागली होती. आज इथे दुखते तर उद्या तिथे. साहजिकच आहे ना. पाच वर्षांचे माझे आयुष्य पंधरा वर्षापर्यंत वाढले होते. म्हातारा झालो होतो आता. त्यांत आता ती लाईन बंद झाली होती. पार्ट मिळायला अडचणी येत होत्या.

आणि आता रस्त्यावर येण्यासाठीचे नियम ही बदलत होते. नव्या दमाचे माझे भाईबंद आता रस्त्याचा ताबा घेत होते. त्यांची शक्ती, त्यांचे डोळे, त्यांचा उत्साह याला मी आता पुरत नव्हतो.

रिटायर व्हायची वेळ आली होती. माझ्या करता रिटायर होणे म्हणजे आपले हात, पाय काढून दुसऱ्याला देऊन टाकून पंचतत्वात विलीन होणे.

पण त्याचे दुःख नाही मला. जेवढी सेवा केली ती चांगली केली. माझ्याच अंगापिंडातून नवीन निर्माण होईल, ते असेच कुणाची तरी सेवा करील आणि माझ्याच सारखे पुनर्जन्म घेईल. त्यांत खेद कसला.

पुन्हा मी येईन, नव्या रूपांत, तेंव्हा मला ओळखा.

# माणसाळवणे

एक तरणाबांड खोंड असतो, जवानीच्या नशेत मस्त असलेला, आपली ताकद दाखवत असतो सगळ्यांना. इथे तिथे उंडारावे, याला त्याला ढुश्या द्याव्यात, खाऊन पिऊन मस्त रहावे. येणाऱ्या जाणाऱ्या कालवडींना छळावे, बस, हाच त्यांचा उद्योग. पण तो विसरतो, म्हणजे त्याला माहीतच नसते की त्याचा जन्म कशाकरता झाला आहे ते.

एक दिवस त्याच्या गळ्यांत एक दोर पडतो, त्याला बांधलेले असते एक जाडसे दांडके. दोन चार दिवसांत, एक दोन वेळा जमिनीवर आदळल्यावर कळते की कसे वागावे ते. त्याला एखाद्या रहदारीच्या रस्त्याजवळ बांधले आणि जाणाऱ्या येणाऱ्या वाहनाला बुजून दोन चार वेळा भ्याल्यावर कळते की आता काय करायचे ते. चार पाच दिवसांत त्याची ती मस्ती उतरते, गरीब गाय होऊन जातो तो. मग एकदाचे डोक्यांत शिरते त्याच्या की आता कसे वागायचे ते. तो माणसाळतो.

नाठाळ जनावराला ठिकाणावर आणण्यासाठी लोढण्यासारखे अमोघ सोल्युशन ज्याने शोधले तो महान म्हणायचा. बस एक दोरी, एक जाडसे आणि जडसे दांडके, बास होते.

उगाच नाही माणूस एवढा महान झाला.

गाई, बैल आणि म्हशी तर मुळांत स्वभावाच्या सौम्य. एकदाची ती जवानीची मस्ती उतरली की एकदम गरीब गाय.

हत्ती पहा. चांगला दोन तीन टन वजनाची भक्कम बॉडी, माणसाच्या कित्येक पटीने शक्ती. मनांत आले तर सेकंदांत माणसाचा चुराडा, अगदी पल्प करायची क्षमता. पण माणूस त्यांनाही आपले गुलाम बनवतो, अगदी सहज. जंगली हत्तींना अगोदरच माणसाळवलेले हत्तीच, म्हणजे हत्तीणी वापरून.

हत्तींचे कळप आसाम, कर्नाटक, तामिळनाडूच्या जंगलांत हिंडतात. मधूनच जंगलाबाहेर येऊन शेतीभातीचा सत्यानाश करतात. त्यांना पकडून, मऊ करून त्यांच्याकडून आपली कष्टाची कामे करवायची कल्पना खूपच जुनी आहे. त्यांत पुन्हा एखादा हत्ती भलताच सुलक्षणी दिसतो, मग त्याला बराच मऊ करून देवळे, राजवाडे वगैरे मध्ये शोभेचा पीस करायचा ही पद्धतही जुनीच.

हत्ती खेडा करून पकडतात तेंव्हा त्याला कळतही नाही की काय होते आहे ते. जंगली हत्तींच्या कळपाला बरोबर भिववून एका दिशेत नेऊन बांबूच्या ओपन एयर पिंजऱ्यात बरोबर नेण्याचे काम त्या पाळलेल्या हत्तीणीच करतात. एकदा

सापडले पिंजऱ्यात की चांगले दोन तीन दिवस भुकेलेले ठेवून मग हळूहळू खाणे टाकले की त्यांना समजते की खाणे टाकणारे आपले मित्रच असावेत असे!

मग त्याचे पाय जखडून त्यांना एकमेकांशी बांधून ठेवले की आपली शक्ती ओढाओढीत खर्च करून दमून जातात. मग ते माहूत एक एक करून त्यांना वेगळे करतात आणि त्यांचे "शिक्षण" सुरू होते. हत्तींच्या स्वभावाचा सखोल अभ्यास करून त्यांचे प्लस आणि मायनस पॉईंट शोधून त्यांना माणसाळवणे जमले आहे. एकदा हत्ती माणसाळवला की तो जन्मभर त्याच्या माहुताचे ऐकतो. हत्तीचा आज्ञाधारकपणा आणि त्याची ताकद त्याची अडचण बनतात.

आता हत्तीचे हे नशीब थोडे बदलले आहे. त्यांना कायद्याचे संरक्षण मिळाले आहे. पण त्यांचे माणसांच्या बरोबरचे जीवन फारसे दुःखदायक होत नाही. मॅनर्स पाळले की हत्ती अगदी आरामांत जीवन घालवू शकतो, एवढेच नव्हे तर लाडकाही होतो.

वाघोबा आणि सिंहांची गोष्ट वेगळी. ते एक तर माणसाच्या काहीच उपयोगाचे नाहीत. दुसरे म्हणजे त्यांचा माणसांना वाटणारा धोका कधीच कमी होत नाही. मग त्यांना का पाळावे? भारतात सिंह तरी सुरक्षित आहेत. वाघ ही तसे ठीकच आहेत. पण कधीतरी त्यांच्यावर आपत्ती येतात आणि ते मानवभक्षी

होतात. एवढे उमदे असणारे ते प्राणी, पण माणसाच्या जाळ्यांत आणि पिंजऱ्यात सापडतात. मग त्यांच्या नशिबी आयुष्यभराचा तुरुंगवासच येतो.

वाघा सिंहासारखी उमदी, जनावरे पकडून त्यांना शिक्षण देऊन सर्कशीत दाखविण्याची आयडियाही तशी भारीच. एवढे उमदे प्राणी पण या स्टुलावरून त्या स्टुलावर उडी मारणे, खोटे खोटे डरकाळणे करून दाखवले की त्यांचा ट्रेनर खुश. अर्धपोटी का असेना पण आयते, शिकार न करायला लागता खायला तरी मिळते. नाहीतरी त्यांची शिकार करण्याची बुद्धी आणि कला कुठे असते आता? सोडले जंगलात तर उपाशी मरतील अशी अवस्था. मग एक तर सर्कशीत रहावे किंवा झू मध्ये. लोकांना आपले अंग दाखवावे आणि पुढे काय पडेल ते खाऊन पडून रहावे.

बैलांचे आणि रेड्यांचे तर नशीबच इतके फुटके असते की एकदा मऊ पडले तरी जन्मभर कष्ट आणि म्हातारपणी जिवंत मरण म्हणावे अशी वंचना. नाहीतर बाल मरण. त्यांत त्यांच्यातला पुरुष कधीच निकामी केलेला असतो. मग आयुष्याची ती एक इच्छाही नाहीशी झालेली असते.

कोणीकधी त्यांच्यावर दया केली तर एखाद्या गोवंशगृहांत दिवस काढणे, नाहीतर खाटीक आहेच त्यांची काळजी घ्यायला.

तर माणसाळवणे काही त्या प्राण्यांना फारसे सुखदायक होत नाही.

माणूस माणसालाच माणसावळतो की नाही? बघा जरा.

सिंहासारखा तडफदार, दिलदार, मोकळ्या मनाचा माणूस असतो. "दिल जो करे सो" जगत असतो. कुणालाही भीत नाही की कुणासमोर कधी झुकत नाही. आपल्या मस्तीत जीवन जगत असतो. मग त्याचे लग्न होते!

हळुवार, न दिसणाऱ्या धाग्यांनी तो बांधला जातो. त्याला कळतही नाही की त्याला काय होते आहे ते. त्या जंगली हत्ती सारखा तो ऑपोझिट सेक्सच्या भुलभुलैयांत अडकतो. बिनधास्त हसणारा, कॉमेंट्स करणारा तो, त्याला एकदम जाणवायला लागते की विशिष्ट कॉमेंट्स केल्या तर आपला जबडा आवळला जातो आहे. नजरेला नजर भिडवायची त्याची आता छाती होत नाही. "घरी जाऊ, मग पहा" या आवाहनामुळे तो दडपून जातो. कधीही कुणापुढे न झुकणारा हा पुरुषसिंह चक्क लाडीगोडी करायला लागतो.

हे काय होते आहे? तो माणसाळवला जातो आहे की काय? आणि त्या जंगली गजराजा सारखेच त्याचे होणार की काय? आता आयुष्यभर आज्ञाधारकपणाच त्याचा मूळ स्वभाव होणार की काय?

एकदा तो माणसाळला की पुन्हा कसा पुरुषसिंह होणार? मग त्याचे मन आपली फॅमिली, आपली मुलेबाळे यातच अडकून राहणार की नाही? ते सुद्धा अगदी आनंदाने. त्या जंगली हत्ती सारखा कामाला उत्तम, दाखवायला उत्तम, वागायला उत्तम. सगळे उत्तम, उत्तम, उत्तम.

तर माणसाळवून घेणे एवढे वाईट नसावे. थोडी फार, म्हणजे फारच मुरड घालून घ्यायला लागत असेल आपल्याला पण तसे काही बिघडत नाही.

काय म्हणता? पटते का? कबूल?

# अपनी गलीमें कुत्ता शेर

माणसाच्या जवळपास रहाणारे जे प्राणी आहेत ते तसे दूर दूरच रहातात. काही ओळख दाखवतात आणि काही नाही. पण माणसाच्या जवळ राहून नुसती ओळखच दाखवितो असे नाही तर चक्क त्याच्या आयुष्यांत शिरतो तो म्हणजे कुत्रा.

गाई, बैल, घोडे, गाढवे आणि म्हशी पाळीव खऱ्याच पण हे कसे दूरचेच वाटतात. ओळख म्हटली तर आहे म्हटली तर नाही असे. मांजर तर एवढे माणसाच्यात मिसळून सुद्धा आपली आब आणि मान राखून राहते. वेळी प्रसंगी "तुम्ही कोण?" असे विचारायला कचरत नाही.

पण कुत्रा तसे कधीच नाही करत. एके काळी जंगली जनावर असलेले हे प्राणी इतके माणसाळले आहेत ती त्याचे स्वभावच बदलून गेले आहेत. इमानीपणा कुत्र्यात का आणि कसा आला हे तर शोधावेच लागेल. लांडगे आणि कोल्हे किंवा तसलेच ते कोयोटे असा इमानीपणा माणसाला तरी दाखवत नाहीत.

माणूस ज्यास्त इमानी का कुत्रा ते दोघांच्या वागण्यावरून ओळखावे. हा इमानीपणा एक खास प्रॉपर्टी आहे कुत्र्याची.

माणसांनी कुत्रे पाळले ते अनादी काळापासून. कदाचित लौकर आणि सहज खाद्य मिळते हे कुत्र्यांनी ओळखले आणि त्यांचा इमानीपणा माणसाने ओळखला म्हणूनच असेल. कुत्र्यांचे प्रकार, त्यांचे दिसणे आणि त्यांचे वागणे याची बरोबरी फक्त माणूसच करू शकेल. इतक्या प्रकारचे नैसर्गिक आणि कृत्रिम प्रकार कुत्र्यांच्यातच दिसतात, तसेच माणसाच्यात ही दिसतात.

कुत्र्यांचे नाक भारी तिखट, त्याचे ऐकणे असेच तिखट, त्याचा इमानीपणा इतका की माणसाने एकदा एखादे काम दिले की ते जीव गेला तरी करणारच असे कुत्र्यांचे प्रिन्सिपल.

कुत्र्याची शेपटी म्हणजे त्याचा मूड इंडिकेटर. गोल वर म्हणजे कॉन्फिडन्स. गोल वर आणि भराभर हलली म्हणजे खुशीत येणे किंवा लाडीगोडी लावणे. जरा खाली उतरायला लागली की समजावे कॉन्फिडन्स संपला त्याचा आणि सरळ दोन पायांत घातली की त्याच्यासारखा भित्रा कोणी दुसरा नसेल असे समजावे.

दोन कुत्रे भेटले म्हणजे त्याची बॉडी लँग्वेज बघण्यासारखी असते. एकमेकावर इम्प्रेशन मारणे, तू मोठा की मी ते दाखविणे, प्रसंगी गुरगुरून दात दाखवणे किंवा एकमेकांवर धावून जाण्याचा अभिनय करणे, ज्यास्त करून

मालक असेल आणि त्याने पट्टा ओढून धरला असेल तर अजूनच. नुसता अभिनय असतो बरं तो. पट्टा हातात धरला असेल तर सोडून बघा, एकजण लगेच पळून जाईल. एकदा तो मोठा की मी मोठा ठरले की ओळख करून घ्यायची, अर्थात वासाने. मग तो मोठा त्या दुसऱ्याच जवळ उभा राहतो ताठ मान करून, आणि तो दुसरा सरळ लोळण घेतो. तो मोठा मात्र दूरवर नजर लावून लक्ष मात्र त्या लोळण घेणाऱ्यावर ठेवून असतो.  "बरं बाबा, तू मोठा, झाले?" एकदा हा उपचार पार पडला की झाले. दोघेही आता ओळखून असतात कोण कुठे आहे ते. जन्मभर.

कुत्र्याची महिला तिथे असेल तर सीन एकदम वेगळा. मग मात्र मारामारी करीन पण ही माझीच. जीवघेण्या वाटणाऱ्या मारामाऱ्या होतात मग. जीव घेत नाहीत पण जीवघेण्या जखमा करायला मागेपुढे पाहत नाहीत. स्त्रीचा प्रताप असा असतो बघा.

कुत्रे आपला इलाखा बनवतात आणि त्याचे रक्षण करतात. माणूसही तसाच. इथे दोघांचे छान जुळते आणि कुत्रा राखणदार होतो. मेंढपाळ कुत्रे पाळतात आणि मेंढ्यांचे रक्षण आणि त्यांचा सांभाळ कुत्रा करतो. अगदी माणूस तिथे नसला तरी.

a

माणसासारखेच काही कुत्र्यांना सतत कुरवाळून घ्यायला आवडते तर काही कुत्र्यांना हात सुद्धा लावलेला आवडत नाही. माणसा सारखेच गुरगुरून फक्त काही दाखवतात तर काही सरळ हल्ला करतात. "ए बार्किंग डॉग नेव्हर बाईट्स" किंवा "हिज बार्किंग इज वर्स दॅन हिज बाईट", ही म्हण म्हणून ठीक आहे तर अनुभव कशाला घ्यायचा?

आपला इलाखा कुत्र्याला एकदम प्यारा असतो, आणि तो दुसऱ्याच्या तसल्याच इलाख्यात तो अतिशय अस्वस्थ होतो. इतका की दुसऱ्याच्या राज्यातून जाताना त्याची शेपटी अगदी खाली खाली होते. त्यांत पुन्हा दुसऱ्याच्या इलाख्यांत जर  सापडला तर सगळा शूरपणा खल्लास. कधी एकदाचा बाहेर पडतो आहे असे वाटते त्याला. त्यांत तो कुत्रा भटका असावा. दिवसांत चारपाच तरी राज्यातून जाणे त्याला भाग पडते. लोळण घेणे हा त्याचा स्वभावच होतो.

पण एकदा का तो आपल्या इलाख्यांत शिरला की मग पहा, शेपटी वर, मान ताठ. माणसाने हे कुत्र्यांचे वागणे लक्षपूर्वक पाहून ठेवले आहे, म्हणूनच खूप म्हणी कुत्र्यांच्या वरून आल्या आहेत.

"अपनी गलीमें कुत्ता शेर". "हर कुत्ते का दिन आता है".

a

एवढेच काय सिनेमावाले काही मागे राहिले नाहीत. "कमीने, कुत्ते, में तेरा खून पी जाऊंगा", "तुझे कुत्ते की मौत दूंगा", "मेरे पैर चाटनेवाला कुत्ता मुझपर भौंक रहा है आज".  वगैरे वगैरे.

म्हणजे कुत्रा इमानदार, पण त्याचा, तो याला कमीना झाला! पाहिले काय आपला कुत्रा नसला की कसे असते ते.

आमच्या वालचंद कॉलेजमध्ये एक कुत्र्यांची जोडी होती, एकाच रंगाची. दिवसभर इथे तिथे टाइम पास करून रात्री यायची क्लब मध्ये जेवायला. कोणी वाढायचे, कोणी नाही, पण म्हणून त्यांनी कधी बेईमानी केली नाही. रात्री उशिरा पिक्चर बघून आल्यावर "कोण ते आले? कुठे होता एवढा वेळ? जा आता झोपा गुमान", असे म्हणून स्वागत करीत. पण परवलीची शिट्टी वाजवली की लगेच ओळखत आणि रुम पर्यंत सोडायला येत.

चार पाच वर्षांत बरीच मुलेबाळे झाली त्यांना पण त्यांची संख्या काही मर्यादेबाहेर गेली नाही. कुत्र्यांच्या स्वभावाचा रिसर्च तिथेच केला आम्ही पहिल्यांदा. अजूनही कितीतरी अभ्यासक होते आमच्यांत, त्यांनी तर खूप खोलांत जाऊन केला.

त्या दोन म्हणी अगदी पक्क्या झाल्या या आमच्या रिसर्च मुळे. "हर कुत्ते का दिन आता है" ही म्हण तर अगदी पक्की बसली डोक्यांत.

आणि "अपनी गली में कुत्ता शेर" ही म्हण तर नुसती पक्कीच नाही झाली, प्रत्यक्ष आचरणांत आणून उपयोगी पडली.

असे असते बघा कुत्र्यांचे.

# भविष्यवाणी

साल १९७४, ठिकाण दादर बीच वरचे इराण्याचे हॉटेल, वेळ संध्याकाळची, साधारण सातची. चार आणे टाकून लावायची रेकॉर्ड ज्यूक बॉक्स वर चालू आहे. कुणीतरी चांगल्या पाच सहा चे पैसे टाकून ठेवलेले आहेत.

बावीस तेवीसच्या वर्षांची चार पाच मुले तिथे बसलेली असतात. टाइम पास चालू असतो. जस्ट इंजिनीयर झालेली, कोणी कुठे "लागलेले" कोणी अजून शोधताहेत काय काम करायचे आहे ते. एनर्जी तर भरपूर पण अजून पुरेसे आऊटलेट न मिळालेली. गप्पाटप्पा चालू असतात. अजून नोकरी नाही मिळालेली तर लग्न वगैरेचा सवालच येत नाही.

कॉलेजच्या हॉस्टेल मधल्या तबला टाईमपास ची हौस अजून गेलेली नाही. गप्पांचे विषय तर अफाट, अगदी पिक्चर च्या गाण्यापासून ते इंदिरा गांधीने काय करायला पाहिजे होते ते अमेरिका जायला कशी असेल असे. कोणत्याही विषयाची अडचण कधीच नव्हती तर ती आता कशी असणार?

बहुतेक लोक "बहुश्रुत" आणि काही तर चिरोची पुस्तके कोळून प्यालेले. तुझा हात बघू, तुझा हात बघू म्हणून एकमेकांची फिरकी घेणे हा तर हातचा मळ.

त्यांत राणे सारखा डोक्याने आणि अंगाने पहिलवान असलेला माणूस समोर, माणूसच की, त्याला मुलगा कोण म्हणणार?

हा बाबा वालचंदला होता फर्स्ट यरला आमच्या बरोबर, म्हणजे माझ्याबरोबर नाही तरी कॉलेज मेट. नंतर मुंबईला ट्रान्सफर घेतली त्याने. तो बढाया मारत होता आणि इतर आम्ही ऐकत होतो. परेलला कुठेतरी कोणी प्रसिद्ध ज्योतिषी रहातात. त्यांच्या कडे जाऊन आला एकदा एका मित्राबरोबर आणि आपले भविष्य हात दाखवून आणि कुंडली दाखवून विचारून घेतले. कुंडली कशी मिळाली, तर त्या ज्योतिषी बाबाकडे भूजपत्रावर लिहिलेल्या असंख्य कुंडल्या आहेत एका खोलीत, जगातल्या कोणत्याही माणसाची कुंडली तिथे मिळते. आम्ही आपले ऐकत होतो. मग पैसे द्यायची वेळ आली तेंव्हा त्याने त्या ज्योतिष्याला एक चेक दिला आणि कटले तिथून ते दोघे. चेक एका बंद बँकेच्या बंद अकाउंटचा होता म्हणून सांगितले त्याने. ऐकून आम्हाला जे हसू येत होते ते पाहून आजूबाजूची मुले पाहात होती आमच्या कडे.

ज्योतिषी होता तर त्याला कसे कळले नाही की हा अवलिया त्याला टांग मारणार आहे म्हणून?

राणेची ही कला खरोखर अफाट होती आणि ज्या कॉन्फिडन्सने तो सांगायचा की कोणाची बिशाद नाही म्हणायची की तो टिंगल करतो आहे

म्हणून. एकदा मला त्याने सांगितले की तू मोठा कलाकार होणार आहेस आणि जग तुझे कौतुक करील म्हणून. मी फक्त बरं बरं म्हणून मान डोलावली. मग त्याला विचारले की अगोदर का नाही सांगितलेस, इथे इंजिनियरिंग मध्ये चार पाच वर्षे घातल्यावर (झक मारल्यावर) सांगतो आहेस. तर म्हणाला तुझ्या भविष्यात इंजिनीयर होणेच होते.

याच बाबाने मला एकदा सांगितले मी मला दोन मुलगे होणार आहेत म्हणून. ते सुद्धा हात बघून. आणि म्हणे ते दोघे खूप प्रसिद्ध होणार आहेत. इथे लग्नाचा विचारसुद्धा झाला नव्हता आणि भविष्य दोन मुलगे, मुलगे बरं का, मुले नाहीत. पण तेरा वर्षांनी हे खरे झाले. दोन मुलगे आहेत. आता प्रसिद्ध कसे, कशांत आणि कधी होणार आहेत त्यांची वाट पाहतो आहे. म्हणजे बघा, काडी टाकून गेला मनांत, आता ते विसरले जाणार नाही.

असेच कुणीतरी सेमिनारच्या मधल्या वेळेत सांगितले की तू ऐंशी पंच्याऐंशी वर्षे जगणार आहेस म्हणून. असले कॅज्युअल भविष्य कोणी सिरियसली घेतो का?

साल २०२३. पंचाहत्तर वयाचा झालो. अमृत महोत्सवी झालो. अजून शरीर धडधाकट आहे. थोडी गुडघ्यांची कुरबुर चालते पण ठीक आहे. कालच गाडी चालवत बोरीवलीला जाऊन आलो. काहीही अडचण आली नाही.

a

गाडीतून उतरल्यावर जरा गुडघे किटकीट करतात. कधीतरी वाचले होते की कोणीतरी महान भविष्यवेत्त्याने सांगितले आहे ती ऐंशी वर्षांच्या वरच्या लोकांना आता कुठलाही टॅक्स लागणार नाही म्हणून. देव त्याचे कल्याण करो. भविष्यवाले कधीच नेमके सांगत नाहीत.

साल २०२८. आता या वर्षी आपण ऐंशी वर्षांचे होणार. आत्ता कुठे मार्च सुरू झाला आहे. आपला दिनक्रम अगदी व्यवस्थित चालतो आहे. म्हणजे त्यांत चालण्यासारखे काय असते. सूर्य उगवतो, सूर्य मावळतो. पण अजून कानांनी ऐकू तर येते आहे ना. आणि बोटे अजूनही मोबाईलच्या कीबोर्ड वर चूक करीत का असेना चालताहेत. त्या भविष्याच्या जवळ आलो.

ऑक्टोबर संपून नोव्हेंबर लागायला आला आहे. कधी कधी त्या भविष्याची आठवण आता यायला लागली आहे. त्याने सांगितले की ऐंशी पंच्याऐंशी वर्षे म्हणून. ऐंशीचे वर्ष तर गाठले. आता काय? आज पर्यंत कधी चिंता नाही केली पुढची, मग आता का असे वाटतेय?

एखादी गोष्ट अशी असते की ती अचानक झाली तर काहीच वाटत नाही, पण होणार असे डिक्लेयर झालेले असले की मग दिवस दिवस मोजला जातो. रिटायर होण्याआधी असेच वाटले होते. परीक्षेचा रिझल्ट लागण्याची तारीख जाहीर झाली कीच मार्कांचे आणि क्लासचे टेन्शन येते. भविष्य ऐकलेच नाही

तर टेन्शन येणारच नाही की येईल? एकदा हा किडा शिरला डोक्यांत की कितीही करा नाहीच जात बाहेर.

साल २०३१. त्र्याऐंशीवे वर्ष चालू आहे. काल जरा पाय घसरला, कसातरी तोल सांभाळता सांभाळता शेवटी पडलोच खाली. एक सणक गेली डोक्यांत. जरावेळ अंधार झाला. नंतर डोळे उघडले तर स्वच्छ पांढरा प्रकाश. कुठे आहे मी? "हे बघा, बाबांनी डोळे उघडले", कानावर पडले. मोठा चिरंजीव होता, मी थोडा हसण्याचा प्रयत्न केला, पण काहीतरी विचित्रच झाले वाटते. त्यांना बहुतेक वाटले की मला खूप दुखते आहे म्हणून. कोणीतरी तिथे आले आणि माझ्या पायावर कोणाचा तरी हात पडला. पुन्हा एक सणक गेली डोक्यांत आणि मी पुन्हा डोळे मिटले.

म्हणजे भविष्य खरी होतात का? की व्हायचे ते होणार असते आणि आपण ते सांगितलेल्याशी जोडून बघतो? गेले वर्ष दोन वर्षेभर हाच विषय माझ्या डोक्यांत का घोळत राहिला आहे? हे भविष्य खरोखरच खरे निघणार का? की आता आपण पार होणार? त्या भविष्य वाल्याने असे का सांगितले? आपण तर काही विचारले नव्हते. नसता किडा डोक्यांत शिरून बसला.

सगळा जन्म आपण ज्योतिष्याची टिंगल केली, भविष्य वगैरे भाकडकथा आहेत असे सांगितले आणि मानले, मग आता का अस्वस्थ होतो आहे? आतून

a

आपला विश्वास होता की काय? की ती काय होणार याची चिंता? मनात खोलवर दडून बसलेली? ती आता बाहेर येते आहे की काय?

मग जर यातून व्यवस्थित बाहेर पडलो आणि त्यांनी सांगितल्या प्रमाणे पंचाऐंशी वर्षे पार केली तर भविष्य खोटे निघाले असे मानणार का? बरं, पंचाऐंशी वर्षे जगणार असे त्याने भविष्य सांगितले, पण कसे ते नाही सांगितले. नुसती आयुष्याची लांबी का सांगतात? ते कसे जाणार आहे ते का नाही सांगत?

आणि मुळांत विचारायला गेले कोण होते? आपणहून येऊन सांगितलेन त्याने? मजेत का असेना पण एक खिळा मारून गेला. आता काय कान बंद करून घ्यायचे? मग उपाय काय? काही नाही. ऐकले ते विसरायचा स्विच आपल्याकडे नाही. नाहीतर भविष्यवाणी कधीच इरेझ करून टाकली असती.

ते तर शक्य नाही. पण विसरणेच बेस्ट.

# गणित शिकल्याचे परिणाम

तसे आपण बऱ्याच भाषा शिकलो आहोत. आजकाल बऱ्याच जणांना चार पाच भाषा येतातच. भाषा म्हटली की ती वाचायची आणि लिहायची पद्धत आलीच. प्रत्येक भाषेला स्वतःची मुळाक्षरे आणि अंक असतात. ते पहिल्यांदा शिकणे आवश्यक.

काहीच भाषा अश्या की त्यांना मुळाक्षरे लागत नाहीत. एक म्हणजे शरीरभाषा, बॉडी लँग्वेज अथवा कायनेसिक्स आणि दुसरी म्हणजे गणित.

बॉडी लँग्वेज हा एक मोठाच विषय आहे. तो नंतर विस्ताराने पाहू.

गणित ही अशी एक भाषा आहे की जी म्हटली तर अत्यावश्यक आणि म्हटली तर अगदी अनावश्यक. अगदी नर्सरी पासून हिची पायाभरणी सुरू होते. एक, दोन, तीन, चार अशी तिची मुळाक्षरे. तिचे व्याकरण आणि वापर करायची शक्ती मुद्दाम मिळवायला लागते.

शाळेपर्यंत बेरजा, वजाबाक्या, गुणाकार भागाकार करता करता भूमिती, अंकगणित आणि बीजगणित शिकता शिकता काही लोकांच्या तरी नाकी नऊ येतात.

नाकी नऊ आले तर परीक्षे पुरता गणिताचा नाद सोडून कसे तरी पास होणे जमू शकते. परीक्षा सोडली तरी इतर आयुष्यांत मात्र ते गणित आपला साथ सोडत नाही. कमीत कमी पैसे तरी मोजता आले पाहिजेत ना?

सायन्स कॉलेज नंतर गणिताची भाषा एक उंचच उंच भरारी घेते. इंटिग्रेशन, डिफरनशीयेशन, निरनिराळ्या सिरीज, त्या भूमिती मध्यल्या कर्वज, ते पार्शल इंटिग्रेशन आणि पार्शल डिफरनशीयेशन समजून घेता घेता महारथींचेही नाक पार घासून जाते. या पुढच्या करियरचा पाया असणार म्हणून करावे तर लागतेच पण आपल्याला याचा आयुष्यांत काय उपयोग होणार आहे अशी एक निराशादायक लहर ही मनांत येऊन जातेच. पण "पोचलेल्या" लोकांसाठी हा एक स्कोरिंग चा चान्स असतो. मास्टर्स किंवा इंजिनीयर होण्यासाठी मात्र हा डोंगर चढावाच लागतो.

आता आम्ही काही मास्टर्स होण्याकडे नजर वळविली नाही पण इंजिनीयर तर व्हायची अतीव इच्छा होती. त्यामुळे डोंगर चढलोच. वळसे वळसे घेत.

इंजिनीयरिंगला प्रवेश घेतल्यानंतर अहिमहि सारखे गणिताचे पाच पेपर पुढे ठाकले. एखादी गोष्ट समजून घ्यायची तर तिचे तुकडे पाडावेत म्हणजे लौकर समजते असे शिकविल्यानंतर पार्शल डिफरनशीयेशन करावे असे समजले.

a

तसेच पार्शल इंटिग्रेशन केल्यावर ठराविकच गोष्टी एकत्र कश्या कराव्यात ते ही हळूहळू समजले. सिरीज कश्या आणि का निर्माण होतात आणि आपल्या आयुष्यांत त्यांचे स्थान कोणते हेही समजले. गणिताचे व्याकरण संस्कृतपेक्षाही क्लिष्ट कसे आहे हेही समजले.

गणित ही भाषा शास्त्रज्ञांची, ते कुठल्याही क्रियेच्या इक्वेशन मांडू शकतात, अगदी माणसाने कसे चालावे याच्याही. शास्त्राचे अध्ययन करतांना एखाद्या गोष्टीचे विवरण कसे करावे, त्यातील व्हेरीएबल कोणती आणि कॉन्स्टंट कोणते, इंपीरिकल (राजा म्हणतो म्हणून) फॉर्म्युला मांडून आणि ऑब्झरव्हेशन करून मग कॉन्स्टंटस कसे शोधावेत की मग तो फॉर्म्युला पुढे काय होणार ते कळण्यासाठी वापरता येतो हे सगळे समजायला बरीच एनर्जी खर्च करावी लागली. तेवढ्या एनर्जींत आमचे हॉस्टेल आरामांत एखादा वर्ष चालू शकले असते.

पण हे सर्व आवश्यक होते आणि शिकलो.

गणित शिकविणाऱ्या गुरुजींना आम्ही साष्टांग दंडवत नेहमीच आणि लगेच घालतो, अजूनही. अश्या विषयांत कसे समजवून सांगायचे आणि शिवाय त्या सर्व विद्यार्थ्यांना पार कसे करायचे हे निश्चितच महान कार्य आहे.

a

आमच्या गणितात सिलॅबस प्रमाणे आठ प्रश्न असणार म्हणजे असणारच. त्यातील काही प्रश्न तासभर सोडविण्याचा प्रयत्न केल्यानंतर ते प्रश्न आकड्यांच्या आणि इक्वेशन्स च्या जंगलात घेऊन जातील प्लस आणि मायनसच्या ट्रॅप मध्ये पोचवतील आणि मग......, तिथे जंगलांत जाऊन अडकलेल्या योद्ध्यांचे विचार अगदीच दुर्लक्षिण्यासारखे नव्हते.

हां. असेही लोक होते की जे अश्या प्रश्नपत्रिकेकडे मिटक्या मारत पहात. शिवाय स्कोरिंग ही करत. त्या लोकांचाही आम्ही अजूनही  साष्टांग दंडवत अधिक त्यांची आरती असा दुहेरी सत्कार करीत असतो.

तर चारच सोडवा आणि पास होण्याचा प्रयत्न करा असा मौलिक सल्ला त्या जंगलांत जाऊन आलेल्या अनुभवी लोकांनी सांगितल्यामुळे आमच्या वाट्याला चार किंवा तीनच प्रश्न उरले. आता खरी कसोटी होती. चुकूनही चुकणे अजिबात चालण्यासारखे आणि परवडण्यासारखे नव्हते. खरे तर चारच प्रश्न सोडवून पास होणाऱ्या व्यक्तीला तेवढ्या प्रमाणात मार्क वाढवून द्यायला नकोत का? पण तसा रुल नसल्यामुळे मिळाले ते आपले असे गोड मानून घेणेच उरले आमच्या हातात.

झालो एकदाचे इंजिनीयर आणि लागलो एकदाचे करियर करायला. आतातरी गणित पिच्छा सोडील, तर नाही, ते आमच्या बरोबरच चालत राहिले.

डिझाइन करतांना फॉर्म्युले वापरून आणि गणिते करूनच आकार ठरवायचे. पण नशिबाने आता काही महान लोकांनी छानपैकी पॅकेज तयार केली होती. फक्त आपले आकडे टाका, उत्तर तयार!

शास्त्रे सोडून इतर ठिकाणी ही गणिताचा चांगलाच उपयोग करता येतो तेही हळूहळू समजायला लागले. पण हे आम्ही सोडून इतरांनाही समजायला लागल्यामुळे थोडीशी अडचण व्हायला लागली. आपली टीम इंटिग्रेट करून काबिल करावी तर त्या टीम मध्ये पार्शल दिफरनशिएशन होऊन भांडणे व्हायला लागावीत आणि मग पार्शल इंटिग्रेशन करून महिरपी कंस व्हावेत अश्या गोष्टी व्हायला लागल्या.

सगळेच गणितात पार झालेले असल्यामुळे त्यांचे कॉन्स्टंट आमच्या कॉन्स्टंटसशी जुळता जुळेनात. पगारांतली वाढ ही एक सिरीज असून जेवढी वाढवावी तेवढी कमी कमी होत जाते असे एक निरुत्तर करणारे उत्तर दर वर्षाच्या शेवटी मिळायला लागले.

घरी काय किंवा कामाच्या ठिकाणी काय, सप्लाय आणि डिमांड यांचे गुणोत्तर टेंडिंग तो झिरो आणि काम करणाऱ्या लोकांच्या अपेक्षा टेंडिंग ती इन्फिनिटी अश्या अवस्थेत कॉन्स्टंट राहू लागले.

घर चालवताना डिमांड वाढत वाढत इंफिनिटीपेक्षा मोठ्या होत जाणार की काय याची शक्यता इंफायनीटली वाढत जाताना आमचा उत्साह टेंडिंग तो झिरो व्हायला लागला.

हे टेंडिंग टू समथिंग हा एक अजब प्रकार आहे. प्रत्यक्ष पोचत तर नाही तिकडे पण जवळ जवळ मात्र जातो. जसे टेंडिंग टू ब्रिलीयन्स, टेंडिंग टू वर्क, टेंडिंग तू बी हेल्पफुल असे.

कोणतीही सिरीज कशी हळूहळू कमीकमी वाढत जाते तसे आमचे उत्पन्नाचेही होऊ लागले. म्हणजे आपले उत्पन्न ही एक सिरीज असते ते एवढ्या उशिराने समजले.

फायदेही झाले गणित शिकल्याने. इंफायनाईट गोष्टींचा ध्यास धरला की एनर्जीही तेवढीच इंफायनाईट लागेल असे आमच्या साहेबवर्गास जाणवू लागल्याने अपेक्षा, त्यांच्या आमच्याकडून, उलटे नव्हे, फायनाईट राहू लागल्या आणि आम्हाला काहीतरी करून दाखविता येऊ लागले. जमले तेवढे आपल्या ब्रॅकेट मध्ये दाखवले.

आता रिटायर झाल्यावर टीव्ही वर डिस्कव्हरी सायन्सचे प्रोग्रॅम पहातो. त्यातही ॲस्ट्रोनॉमीचे ज्यास्त. त्यांत दाखवतात की प्रोफेसर आणि ॲस्ट्रोनॉमर्स

a

अजूनही खडू फळा वापरून गणिताच्या भाषेतच आपले शोध सिद्ध करतात. एकदा त्या फळयाचा फोटो किंवा त्यावर लिहितानाचा व्हिडीओ बघा. जर ती भाषा समजली तर तर सांगणारे ते आणि ऐकणारे तुम्ही किती महान आहात ते कळेल.

रोबोटिक्स, स्पेसक्राफ्ट ट्रॅजेक्टरी, ग्रह ताऱ्यांचे फिरणे, तो महान फॉर्म्युला e=mc^2, क्रियांचे अल्गोरिथम, स्पेक्ट्रम वरून अफाट अंतरावरच्या गोष्टीच्या प्रॉपर्टी शोधणे, रेल्वेगाड्या ड्रायव्हरखेरीज चालविताना, विमाने ड्रोन, मिसाईल बरोबर पाहिजे तिथेच जातील असे पाहतांना, आपले बँक अकाउंट दुसऱ्याच्या नावेच होणार नाही ते नक्की करतांना, आपला इन्कमटॅक्स रिफंड आपल्याच खात्यात येईल असे करतांना गणिताचाच उपयोग होतो हे पाहून आता बरे वाटते. आता हे सर्व शिकण्याचा काय उपयोग असा प्रश्नही मनांत आता येत नाही.

म्हणजे गणित शिकलो ते अगदीच वाया गेले नाही. चांगले परिणामही झाले.

यातच सर्व आले.

# फायनल

१८ जून १९७१, संध्याकाळचे आठ वाजले आहेत. फोनची रिंग वाजते. ज्यास्त करून यावेळी फोन वडिलांनाच येतात, म्हणून त्यांनीच फोन घेतला. फोन वरचे ऐकले आणि फोन खाली ठेवला आणि मला हाक मारली. माझे हृदय घशाशी आले होते आणि छाती इतकी धडधडत होती की त्याने सगळे अंग थरथरते की काय असे वाटत होते.

मी गेलो आणि वडिलांसमोर उभा राहिलो. नजर जमिनीकडे. वडिलांनी पाहिले. आता काहीही ऐकायची तयारी झाली होती. "कॉंग्रॅचुलेशन्स, फर्स्ट क्लास मिळाला आहे", वडील म्हणाले. एकदम टेन्शन गेल्यावर लोखंडी तार कशी लुळी पडते त्याचा अनुभव आला मला. घामाने भिजलेला माझा हात हातात घेऊन वडिलांनी मला कॉंग्रॅचुलेट केले. आई ऐकतच होती. गेली स्वयंपाकघरांत.

बी ई मेक च्या परीक्षेचा निकाल लागला होता आणि पेपरांत यायच्या अगोदर त्यांच्या पुण्याच्या एडिटर मित्राने फोन केला होता. झाऽले. एकदाच फायनल परीक्षा पास होऊन सुटलो होतो.

एकदा त्या बातमीच्या लाटेचा भर ओसरल्यावर मग जीवात जीव आल्यावर जरा जरा आजूबाजूच्या जगाची जाणीव व्हायला लागली. आई

आली स्वयंपाकघरातून साखर दिली हातावर सगळ्यांच्या. मग मला काही राहवेना, पुन्हा फोन केला वडिलांच्या मित्राला. आता आवाज थोडासा स्थिर झाला होता. माझ्या इतर मित्रांचे रोल नंबर होते माझ्याकडे. त्यांनी पहिल्यांदाच सांगून टाकले की निकाल मेकॅनिकलचा १०० टक्के आणि सिव्हिलचा ९८ टक्के लागला आहे म्हणून. इलेक्ट्रिकलचा नव्हता त्यांत, पण असाच असणार होता. पण त्यांनी फक्त माझाच रोल नंबर पाहिला होता, बाकीचे शोधणे मला अलाउड नव्हते त्यांच्या पेपरच्या पॉलिसीमुळे.

म्हणजे सगळी बॅच पार झाली होती. आमचा नंबर फर्स्ट क्लास मध्ये लागला होता. झाऽले, आपले घोडे गंगास्नान करून आऽले. बास, आता चिंता नाही करायची.

डिटेल निकाल दुसऱ्या दिवशी पेपरांत आला. मेकॅनिकलला सगळे पार झाले होते. फक्त काहीच जण सेकंड क्लास मध्ये होते.

कॉलेजने ही एक बॅच पुढे पाठवून दिली होती इंडस्ट्रीमध्ये. पुस्तकी ज्ञान तर मिळाले होते, आता ते व्यवहारांत आणायचे कसे ते बघायचे. त्यावेळी फोन करणे अवघड, टेलेक्स वगैरे काय असते याचा काहीच पत्ता नव्हता. तार फक्त कोणीतरी जगाचा निरोप घेतल्यावरच करायची असते असा समज. मग इतरांची माहिती मिळावी ती कशी?

a

मग सरळ आईकडून हॉलिडे अलाऊन्स घेतला, दुसऱ्या दिवशी सकाळी चार कपडे एका पिशवीत टाकले आणि पुण्याची गाडी पकडली. एकट्याने जायची संवय लागलीच होती आता, उलटे एक्सपर्ट झालो होतो त्यांत.

मिरजेला मावशीकडे एक रात्र काढल्यावर आणि तिच्याकडून आणि तिच्या मिस्टरांकडून (मावशीच्या मिस्टरांना काय म्हणतात बरे?) कौतुक करून घेतल्यावर दुसऱ्या दिवशी कॉलेज मध्ये गेलो. नवीन वर्ष सुरू झाल्याची लगबग सुरू झालीच होती. FE पासून ते BE पर्यंतच्या लोकांची धावपळ आता बघतांना मजेचे वाटत होते. आपण मस्त बर्थवर पडून इतर पॅसेंजर जागेकरता धडपडतांना बघतांना जशी मजा वाटते तसे. सॉरी, उपमा चोरलेली आहे जोशीसरांच्याकडून.

नोटीस बोर्डावर डिटेल निकाल लावला होता. एक एक करून सगळ्या मित्र मंडळींची खबरबात घेतली. आमची कंडिशन फारशी वाईट नव्हती. वरच्याच्या वरच्या हाफ मध्ये बसत होतो. काही वीर मात्र थोडे नरमपणे पार झाले होते. चालायचेच. होते असे कधी कधी. मार्क बघून आता थोडे कसेतरी होत होतेच पण ती भीती राहिली नव्हती.

मार्कलिस्ट, कॉलेजचे सर्टिफिकेट आणि डिग्री सर्टिफिकेट पोस्टाने नंतर येणार होते. ठीक आहे, काय घाई आहे?

पुन्हा एकदा कॉलेज मध्ये चक्कर मारताना वेगळेच वाटत होते. मनाला मोकळेपणा वाटत होता.

बर्वे सरांच्या केबिनला कुलूप होते. चक्कर मारता मारता मेकॅनिकलच्या डिपार्टमेंट मध्ये जाऊन एकदा डोळे भरून पाहून घेतले. एकदा स्मिथीमध्ये जाऊन त्या आत्ता गार असलेल्या भट्ट्या पाहून घेतल्या, ते वर्कशॉप पाहून घेतले आणि मग पुन्हा उजळणी करायला त्या नोटीस बोर्डसमोर येऊन उभा राहिलो. सांगलीचे मिरजेचे तीन चार वर्गमित्र आणि बॅचमेट्स आले होते. एकमेकांना कॉंग्रॅचुलेट करून झाले.

अरे याचे असे कसे झाले आणि याचे किती चांगले झाले, अश्या प्रकारच्या गप्पा मारल्या आणि कँटीन मध्ये जाऊन ब्रेड उसळ आणि चहाचा फायनल स्वाद घेतला. नंतर एकदा पुन्हा बर्वे सरांच्या केबिन कडे गेलो, यावेळी उघडी होती. सर होते केबिन मध्ये. "नमस्कार, सर, मी......", "कौलगी, हं, किती मार्क मिळाले?". सांगितले. "हं, कॉंग्रॅचुलेशन्स!". अगदी हात हातात घेऊन त्यांनी कॉंग्रॅचुलेट केले. धन्य वाटले मला. त्यांची भीती तर नव्हतीच कधी, होता तो आत्यंतिक आदर.

तिथून बाहेर पडताना डोळ्यासमोरून चार वर्षे वगैरे काही गेली नाहीत. अजून ताजेच होते सगळे. विसरण्याचा तर प्रश्नच नव्हता. पण एक प्रकारचे अंतर

a

नक्कीच वाटत होते. आता हे आपले माजी कॉलेज झाले, इथे आता येऊ तर ते माहेरी आलेल्या लेकी सारखे, (लेकाला माहेर नसते, त्यामुळे त्याला काय वाटले पाहिजे तो अनुभव नाही). काही वर्षांनंतर तर माहेरी यायला आवडेल का हाही विचार येईल. आपले सासरच बरे, ते पर्मनंट तरी आहे.

कॉलेज कडून मार्कलिस्ट आली, प्रिन्सिपॉल सरांचे सर्टिफिकेट आले. नंतर डिग्री सर्टिफिकेटही आले पण ते आडनावात स्पेलिंग मिस्टेक करून. पण पुन्हा सरांना कळवल्यावर त्यांनी आमची परीक्षेच्या वेळची मानसिक अवस्था समजून घेऊन ते लगेच दुरुस्त करून पाठवून दिले.

कॉलेजने आपले काम केले. रफ दगडांना पैलू पाडून आकार आणले. आता त्या पैलूंना पॉलिश करायचे काम दुसरे करणार, आणि शिवाय पॉलीश केल्या बद्दल पैसेही देणार.

शेहेचाळीस विषय शिकविले, त्यांची परीक्षा घेतली आणि उत्तीर्ण करून दिले. आता किती विषय उपयोगाला येणार ते एक इंडस्त्रीच जाणे.

एक परीक्षांची भीती घालवली कॉलेजने हे काय कमी झाले? परीक्षा तर येणारच आणि त्यांना तोंड द्यायला लागणारच. मानसिक आणि शारीरिक

कणखरपणा दिला कॉलेजने. आर्थिक स्वातंत्र्य आणि आर्थिक जबाबदारी शिकवली.

सगळे लोक पास करून टाकून कॉलेजने एक पायंडा पाडला. नाहीतरी या लोकांना जगाला तोंड द्यायचेच आहे मग ते त्यांना इथे अडकवून काय होणार, त्यापेक्षा जाऊ देत बाहेरच्या जगांत आणि खाऊ देत टक्के टोणपे, टफ तरी होतील. आता जे इथे शिकतांना,त्याची परीक्षा देताना किटकीट करत होते तेच बाहेरून शिकतांना आणि परीक्षा देताना आनंदाने करतील, मग कळेल कॉलेज शिक्षणाचे महत्व.

आणि मग शिकलोच तसे करायला. आपल्याला मदत करायला आपल्याखेरीज कोणी येत नाही. गरज पडली, शिकून घ्या, कुठे ज्ञान मिळवायचे ते कॉलेजने सांगितले. पुष्कळ झाले की हे. चांगला मॅनेजर कोण असतो? ज्याला कुठे काय शोधायचे ते समजले तोच.

शेवटी फायनल अशी कधी नसतेच. एक फायनल म्हणजे दुसरी सुरुवात. आणि तिसऱ्या प्रश्नाचा जन्म. चक्र अविरत चालणारच.

a

# एकवीस ते बावीस

गेल्या वर्षी १४ मे चा दिवस चांगला होता. त्यादिवशी मित्रमैत्रिणींच्या आग्रहाने मी या वालचंद १९७१ च्या समूहांत सामील झालो.

मे १९७१ ला शेवटच्या परीक्षा पेपरनंतर कॉलेजला जो रामराम ठोकला होता त्यानंतर दोन तीन वर्गमित्र सोडून कोणाशीही संपर्क राहिला नव्हता. तसे मुंबईत भटकताना एक दोन जण भेटले होते, काही दोस्त मंडळींशी १९७४-७५ पर्यंत थोडा फार कॉन्टॅक्ट राहिला होता पण नंतर "दोन ओंडक्यांची होते सागरांत भेट, एक लाट तोडी त्यांना, पुन्हा नाही गाठ" या कवितेला अनुसरून बरीच तुटातुट झालीच होती. आता इंटरनेटवर का असेना पुन्हा भेटी झाल्या. एकमेकांची चौकशी करतांना, "तू काय केलेस, मी काय केले" आणि वालचंदच्या कॉलेज आणि होस्टेलच्या आठवणी काढण्यात एखादा महिना गेला. आपल्या जगाचा निरोप घेतलेल्या मित्रमंडळींच्या आठवणी काढून हळहळ व्यक्त करून झाली.

आता ग्रुप बनवून सेटल झाल्यावर आपण काहीतरी केले पाहिजे कॉलेज करता असा विचार बळावला. "काहीतरी"च्या विचार मंथनात एक मात्र दिसून आले की भले सत्तर बहात्तर वर्षे झाली असोत, सगळ्यांचे मेंदू मात्र एकदम तल्लख आहेत. काहीतरी करायच्या चर्चा चांगल्याच गरम गरम झाल्या. शाश्वत

a

काहीतरी करायचे म्हणून एक मियावाकी जंगल करावे, कॉलेजच्या थोड्याश्या जमिनीवर आणि कॉलेजला भेट द्यावे असा विचार हळूहळू पक्का होत चालला.

काय असावे, कसे असावे याची चर्चा अगदी व्यवस्थित मन लावून झाली. ग्रुपमध्ये असलेल्या टॅलेंट ला अनुसरून साधकबाधक चर्चा, म्हणजे काथ्याकूटच म्हणाना, झाला आणि एक प्लॅन तयार झाला.

तसे दोन हजार वीसचे वर्ष नेहमीप्रमाणे बोरिंगरित्या सुरू झाले होते. आणि नंतर एकदम जे काही फणफणले कोविद१९ च्या कृपेमुळे की काही बोलू नका. घरांत कैद असलेल्या चपळ बुद्धीच्या मनांना या मियावाकी जंगलाच्या विषयाने चांगलाच व्यायाम घडविला. त्याला जंगल न म्हणता O2 पार्क म्हणावे असे ठरले. त्याकरता जे काही तन मन धन लागेल ते गोळा करायची दिलदार इच्छा सगळ्यांनीच दाखवली.

हे प्रोजेक्ट थोडा वेळ घेणारे होते कारण कॉलेज आणि मग नंतर महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी यांच्या संमतीने पुढे जावे हेच योग्य होते आणि ती संमती मिळवायला थोडा वेळ लागणार होता. पत्रापत्री झालीच होती, भेटीगाठीही झाल्या होत्या. इथे आपल्या मित्र मंडळींचे हार्दिक आभार मानलेच पाहिजेत.

पण इथे वेळ वाया कोण घालवतो? तल्लख बुद्धिमत्ता, चपळ विचार सरणी आणि उत्साही लोक असतांना असा ग्रुप थंड राहणार कसा?

मग काय, एकमेकांचे पाय ओढणे, गाणी गाणे, बजावणे, गोष्टी लेख लिहिणे आणि आवडलेल्या गोष्टी शेयर करणे यांत मस्त वेळ जात होता. कोविद१९ ची भीती हळूहळू कमी होऊन आपण आपले गॅदरिंग करायलाच पाहिजे असा प्लॅन होतच होता. दोन हजार एकवीसच्या जानेवारी मध्ये करू म्हणून पूर्व तयारी सुरूही झाली होती.

तशी एकवीस सालची सुरुवात त्या मानाने बरी झाली. आपल्या घराबाहेर आणि गावाबाहेर जायचेही जमले, दोनतीन मित्रांना प्रत्यक्ष भेटणेही जमले. मग पुन्हा एकदा लाट आली आणि गॅदरिंगचा कार्यक्रम बारगळला. आत्ताची लाट थोडी जोराची आणि कमी वेळाची ठरली. पुन्हा एकदा घरबंद होऊन पाय ओढणे, चावाचावी करायची वेळ आली. थोडेसे ग्रुपवर भांडूनही बघितले. पण त्या भांडण्यांत काही मजा नाही हेच पुन्हा सिद्ध झाले.

दोन हजार एकवीस चे वर्ष संपता संपता पुन्हा एकदा त्या गॅदरिंग ची उर्मी उफाळून आली आहे. त्यांत कॉलेज आणि सोसायटीने मंजुरी दिल्यामुळे आमचा O2 पार्कचा प्रयोग यशस्वी होणार अशी चिन्हे दिसायला लागली आहेत. गॅदरिंग ची तयारी तर व्हेन्यू ठरविण्यापर्यंत गेलीच आहे. कोणी कोणी

कसे कसे जायचे याचे प्लॅनिंग करून तयार आहे. आता या दोन्ही गोष्टी होणारच हा विश्वास पक्का होत चालला आहे.

पण त्या व्हायरसला हे सर्व माहीत आहे की नाही ते कळत नाही. तो आपली सोंगे बदलत बसला आहे. आता म्हणे ओमीक्रॉन. ग्रीक बाराखडीतल्या सगळ्या मुळाक्षरांचा उपयोग करून झाल्यावर पुढे जोडाक्षरे ही वापरायचा त्याचा प्लॅन आहे की काय असे वाटू लागले आहे.

शत्रूचा योद्धा कितीही बळकट असला तरी पुढे पुढे त्याची शक्ती क्षीण होत जातेच तसे चालले आहे. आता माणूस जिंकणार की व्हायरस ते बघायचे.

कबड्डी खेळताना करायच्या चाली कराव्यात. कधी आक्रमक तर कधी डिफेन्स. व्हॅक्सीनेशन म्हणजे आक्रमण आणि १४४ कलम म्हणजे डिफेन्स. मधल्या चालींना मास्क, सोशल डिस्टंसिंग, हात धुणे वगैरे म्हणावे.

नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने असे म्हटले जाते, पण इथे नकटे कोण आहे, सगळी नाके लांबच्या लांब आणि कांदे सोलायला तयार अश्या धारेची आणि टोकाची आहेत. तर हे कोरोनाचे विघ्न या लांब नाकासाठी नाहीच. पण अजून एक साथीदार आहे चाल करणारा. त्याचे काय करावे. ऐन वेळी १४४ नंबरचा बडगा उगारला तर? पण बहुतेक मागचा अनुभव लक्षांत घेता सूर्य मावळल्यावरच हा बडगा उगारला जाईल.

मग त्या हॉटेलमध्येच झोपावे लागेल नाचून झाल्यावर रात्री. मला वाटते तसे सांगूनच ठेवावे हॉटेलला, उगाच ऐनवेळी अडचण नको यायला. एक तर बरेच जण "घट्ट" झालेले असतील. दुसरे म्हणजे त्राण राहिले नसेल.

आता हे दोन हजार एकविसावे वर्ष तर संपलेच आहे, येणारे दोन हजार बावीसावे वर्ष आम्हाला एकत्र येऊन दंगा करू देणार आणि आमचे ते O2 पार्कचे स्वप्न पूर्ण होणार, फक्त पहिली कुदळ कोणी आणि कधी मारायची एवढाच प्रश्न उरला आहे. खरे तर तो ही प्रश्न नाही, कारण आमच्यातले अमृत महोत्सवी हातच ती पहिली कुदळ मारतील.

दोन हजार पंचवीस च्या वर्षाची वाट पाहतो आहे. त्या वर्षाच्या जानेवारीत कॉलेजला पुन्हा भेट देणार आहे आणि त्या O2 पार्क मध्ये बसून छाती भरून ऑक्सिजन घेणार आहे, कॉलेजच्या मातीचा वास घेत.

बघाच तुम्ही. असेच होणार आणि ते पंचवीस सालचे गॅदरिंग होऊन अजून कितीतरी अमृत महोत्सवी इंजिनियर्स एकविसाव्या शतकाच्या चतुर्थीचे स्वागत करणार, आपल्या वालचंद कॉलेज मध्ये बसून. बघाच.

# आ बैल मुझे मार

चला, आमची ती बहू प्रतिक्षित प्रत्यक्ष भेट लांबणीवर पडली. आता होईल तेंव्हा होईल. मग आता टाइम पास करायला काय करावे बरे? सारखे फॉरवर्ड करावे तर लोक रुसतात. गाणी गावीत तर कान झाकून घेतात. लेख लिहून पोस्ट करावेत तर कोणी वाचत नाही. जंगलावर काथ्याकूट करावा तर "आता सगळे फायनल झाले आता त्यावर पुन्हा चर्चा नको" ऐकायला मिळते. इतक्या इथे लोकल मित्रांच्या गाठीभेटी घ्याव्यात तर सरकार ऐकत नाही. चालायला जावे तर पोलीस घरी जा सांगतात. समुद्रकिनारे, वाळूचे बीच, प्रॉमिनेड्स हद्दीबाहेर केली आहेत. फोन करून किती लोकांना किती वेळ बोअर करणार? बंधनांच्या चित्रविचित्र रूपांनी नुसता हैदोस आणि गोंधळ घातला आहे

छे, या करोनानेही अगदी वैताग आणला आहे. दर महिन्याला नवा अवतार!

पण आमचा स्वभाव पहिल्यापासून अगदी धाडसी आहे. आम्हाला नाही त्या गोष्टी करायचा आणि उकरून काढायचा अगदी छंद आहे, अगदी लहान असल्या पासून. त्याला काय करावे?

a

सगळे आपले व्यवस्थित चालत असताना आम्ही बोअर होतो. जीवनांत काहीतरी एक्साइटिंग असले पाहिजे. आमचा स्वभावच "आ बैल मुझे मार" असला देवाने आम्हाला दिला आहे.

बघा ना, आमच्या इकॉनॉमिकस च्या सरांनी मन लावून नोट्स करायला दिल्या आणि त्याच वापरा असे सांगितले. पण प्रश्नपत्रिका हातात पडताच आमचा असला स्वभाव उसळून आला. आम्ही आमच्या शब्दांत जी उत्तरे द्यायची ती दिली, आमच्या मते पूर्ण समजून घेऊन. पण जे व्हायचे तेच झाले, आमचा इकॉनॉमिकस कडे बघण्याचा दृष्टिकोन कुणाला आवडलाच नाही. मग काय दुसरे होणार?

एकदा इंजिनीयर झाल्यावर जगाकडे बघायची आमची दृष्टी अगदी नवी, ताजीतवानी होती. कोणताही प्रॉब्लेम येवो, आपण विचार करून, चिंतन, मनन करून त्यावर तोडगा शोधायचा असा आमचा पक्का निर्धार.

साहेब म्हणाले, आपण नवीन बोरिंग मिल डिझाइन करायची त्यासाठी आपले व्हर्टिकल टरेट लेथ आहे, त्याचा विस्तार करूया आणि आपले डिझाइन करूया. तेंव्हा हो म्हणालो पण साहेबांच्या केबिन मधून बाहेर आल्यावर तो डोक्यातला किडा काही स्वस्थ बसू देई ना. ड्रॉईंग बोर्डावर एक नवाच प्लॅन

काढला, दिलेल्या स्पेसिफिकेशनला धरून सगळया कंडिशन मीट होतील असे डिझाइन तयार केले.

आमच्या धाकट्या साहेबांना दाखविले. त्यांचा स्वभाव माझ्यासारखाच, त्यांनी ते पसंत केले आणि डिटेलिंग करायचा हिरवा सिग्नल दिला. केले डिटेलिंग, पार्ट ड्रॉईंग तयार झाली, फौंड्रीला रवाना झाली, त्याप्रमाणे कास्टिंग झाले आणि कास्टिंग यार्डात येऊन पोचले. आमचे मोठे साहेब आणखी तसल्याच मोठ्या साहेबांबरोबर सकाळी फॅक्टरीत आणि यार्डात राऊंड मारत असत. त्यांना हे नवीन कास्टिंग दिसले. जवळ जवळ त्यांच्या उंचीचे.

एकदम धडधडले त्यांच्या छातीत. आमच्या डिझाइन डिपार्टमेंट मध्ये येऊन त्यांनी बोलावले मला, म्हणाले स्केल मध्ये काही चूक झाली आहे का? मला आश्चर्य वाटले, मी म्हटले "नाही, कसल्या स्केल मध्ये?" तर त्या कास्टिंगच्या बद्दल त्यांनी विचारले. मग ऍसेंब्ली ड्रॉईंग मागितले आणि चांगला तासभर त्याची तपासणी आणि माझी खरडपट्टी काढली. "कुणी पाहिले आहे का हे ड्रॉईंग", त्यांनी विचारले. खाली ऍप्रूव्हलची सही होती.

मग डोके जरा शांत झाल्यावर ते म्हणाले, "दिसते तर अगदी प्रोपोर्शनल. मी खाली कास्टिंग बघून घाबरलो!". यानंतर काहीही अडचण न येता बोरिंग मिल बनली, गोदरेजच्या १९८०च्या प्रदर्शनात उभी राहिली आणि जागेवर

a

विकली गेली. आज चाळीस वर्षांनंतरही ती जमशेटपूरच्या टाटा रॉबिन्स फ्रेझर च्या फॅक्टरीत चालू आहे.

तर काय आमचा तो "आ बैल मुझे मार" चा किडा खूप जुना आहे.

असला आमचा स्वभाव नवीन डिझाइन करून इंडस्ट्रीमध्ये "फर्स्ट टाइम इन इंडिया" करायला उपयोगी पडला. न्यूक्लियर, फ्युएलिंग मशीन असो की जीएमआरटी च्या दुर्बिणीचे अँटेना असोत की जीएसएलव्ही रॉकेटचे बूस्टर बनवायचे प्लॅन्ट असो. त्यामुळे आमची करियर अगदी धडाक्याची झाली. काहीही म्हणजे काहीही जुने न वापरता नवीन निर्माण करायचा संधी आल्या.

असला आमचा "आ बैल मुझे मार" स्वभाव फक्त काही करियर मध्येच नव्हता आणि नाही. सगळीकडे तसेच. त्यामुळे बोलणी खावी लागली पण कधी कौतुकही आले वाट्याला. आमच्या घरच्या घरी दुरुस्त करायच्या स्वभावामुळे चांगलेच कान पिळून घेतले आहेत आम्ही. "धडमोड्या आणि कूडतोड्या" असे नाव पडले आम्हाला.

आता मात्र मुले मोठी झाली, त्यांना स्वतःची मते आली. आता आ बैल मुझे मार करू देतील की नाही यांत शंका आहे.

a

कोरोनाचेच घ्या ना. गेले वर्षभर घरबंदी झालो आहोत की. "उगाच बाहेर फिरून आजारी पडायला होईल, घरीच टाइम पास करा" या आदेशाची कोण वीर पुरुष अंमल बजावणी न करायला धजेल? ऐकावे लागते आता सगळ्यांचे. एक मात्र खरे की इतरांचे ऐकायला लागल्यापासून हमखास यश आता मिळायची शक्यता कमी झाली आहे.

आता ते टेस्टिंगचेच उदाहरण घ्याना. सगळे ठीकठाक आहे, काही दर्द नाही, पण इतर करतात म्हणून टेस्टिंग करून घेतल्यावर आणि ती पॉझिटिव्ह आल्यावर काय करायचे? आला का बैल आता मारायला? ते सुद्धा आमंत्रण देऊन!

तुम्हाला माहित आहे का, कोरोनाचा हा अवतार अगदी सर्दी पडसे झाल्यासारखा आहे आणि साधे सर्दी पडसे झाले तरी त्या टेस्ट पॉझिटिव्ह येतात ते. मग टेस्टच का करावी? एक तर आकडे वाढणार नाहींत आणि डोक्याला नसती कल्हई होणार नाही. "ना रहेगा बांस, न बजेगी बासुरी", उगाच बैलाला निमंत्रण कशाला द्यायचे.

खरा बैल अंगावर आला तर एक तर बाजूला होऊन टाळता येईल किंवा त्याची शिंगे धरून त्याला लोळविता येईल किंवा तो आपल्याला शिंगावर घेऊन

a

लोळवील. बैलाचा कसा सामना करायचा ते आपल्यावर आहे. आमचा तो दुसरा प्रकार आहे. बैलच हरले आहेत आत्ता पर्यंत.

बैल नाहीसा झाला तरी आमचा आ बैल मुझे मार स्वभाव कधी बदलणार आहे असे काही वाटत नाही. दुसरा बैल शोधील आमचा स्वभाव.

शेवटी स्वभावाला औषध नाही.

# लय आणि ताल

जराशी तुमच्या खास आवडीची गाणी आठवून पहा. तुमच्या लगेच लक्षांत येईल की ठेकेबाज, लयबद्ध, तालातली गाणी तुमच्या मनांत लगेच जाऊन बसतात.

का बरं असावे असे?

जेंव्हा आपण अजून निर्माण होत होतो तेंव्हा आपल्याला धक धक अशी लय ऐकू येत होती. आपल्या आईच्या हृदयाची. त्याच लयीत आपण जन्माला येण्याइतके मोठे झालो. नंतर नंतर आपलेच हृदय आईच्या हृदयाबरोबर जुगलबंदी करायला लागले आणि त्यातून निर्माण झाले बीट्स. आपला जन्म होई पर्यंत आपण त्याचा मन लावून अनुभव आणि आनंद  घेतला.

एकदा जन्म झाल्यावर ते आईच्या हृदयाचे स्पंदन ऐकू येईनासे झाले. कदाचित त्यामुळेच अस्वस्थ होऊन आपण रडायला लागलेले असू. मग कुणीतरी हातात घेऊन किंवा पाळण्यांत ठेवून झोके दिल्यावर पुन्हा आपल्याला लय सापडली आणि रडणे बंद झाले.

मग आपल्याला आजूबाजूच्या गोष्टींची ओळख व्हायला लागली आणि त्यांच्या लयीची सुद्धा.

लय आणि ताल आपल्या आजूबाजूलाच असतात. तिकडे कान गेला की ओळख पटते. रेल्वेगाडीच्या रुळांची खडखड आपल्याला तालात वाटते. बादलीत गळणारे नळाचे पाणीसुद्धा ताल धरते. घोडागाडीची टपटप एक नवाच उत्साह निर्माण करते.

आपले मन लय आणि ताल शोधतच असते.

मग आपण ती लय आणि तो ताल मुद्दाम उत्पन्न करतो. लय काय किंवा ताल काय, काळाचे भाग असतात. काळ तसा दिसत नाही की त्यांच्या वाहण्याची आपल्याला जाणीव होत नाही. म्हणून आपण काळाचे भाग करतो. अगदी काहीच हाताशी नसेल तर टाळ्या वाजवतो. लय आणि ताल आपल्या आयुष्याला अगदी आवश्यक आहेत.

सगळी तालवाद्ये काळाचे भाग करतात. त्यातून तबल्याचे ताल होतात, ढोलकीचा ठेका होतो आणि ड्रमची धडकती लय होते. लयीत किंवा तालात काळाचे तसे काही एकक, युनिट, नसते. एकाच काळाच्या युनिट मध्ये जास्त भाग केले की काळ भराभर पुढे गेलेला वाटतो. सगळे संगीत काळाच्या

a

ओघावर बेतलेले असते. आपले संगीतकार, मग ते शास्त्रीय संगीताचे असोत की लाईट म्युझिकचे असोत की सिने सृष्टीतले असोत या काळाच्या ओघाला आपल्याला पाहिजे तसे वळवून पाहिजे तो परिणाम घडवून आणतात.

आता आपल्याला सगळ्यांत सोपे वाटणारे संगीत म्हणजे चित्रपट संगीत. लहान बाळापासून पार वृद्धा पर्यंत त्याची मजल. मग अगदी आवडणारी गाणी चित्रपटातील असतील तर नवल काय?

संगीतकार लय ठेवताना काळाचे भाग करतो त्या म्हणजे मात्रा.

आपली भारतीय तालवाद्येच बघा, तबला, ढोलकी, पखवाज, मृदुंग, चिपळ्या किंवा फक्त टाळ्या. संगीतकार फक्त वाद्येच वापरतो असे नाही तर इतर वाद्यांनीही ताल निर्माण करतो.

आपले सगळे संगीतकार लयतालात माहीर आहेत. कुणाचे नाव घ्यावे आणि कुणाचे वगळावे? सगळेच ग्रेट आहेत, म्हणून नावेच नकोत घ्यायला.

आता काही ताल आणि त्यावरची आवडती गाणी बघूया. आता इथे आपण क्लिष्ट अश्या खोलांत नको जायला. एक तर बोरिंग होईल आणि दुसरे म्हणजे गाण्यातली सगळी मजा या चिरफाडीने नाहीशी होईल.

१ मार्च - धिं च्याक धिं च्याक

"लाखों हैं यहां दिलवाले"

"तारीफ करूँ क्या उसकी"

"मेरा जूता है जापानी"

२ घोडागाडी - टप टप टप तप

"मांगके साथ तुम्हारा मैने मांग लिया संसार"

"फिर वही दिल लाया हूँ"

३ वॉलट्झ - धिं तान तान

" जीना यहां, मरना यहां"

"मेरे नींदों में तुम, मेरे ख्वाबों में तुम"

४ तिनतिन ना धिंनाधिंना

"अपनी तो हर आह तूफान है"

"मुझे तुमसे कुछ भी न चाहिए"

५ धिंधिं ता धिंधिं ता

"ओ उमड़ घुमड़ कर आई रे घटा"

a

"चलत मुसाफिर मोह लियो रे पिंजरेवाली मुनिया"

६ धिंना धिंधिं ना

"आंसू भारी है ये जीवन की राहें"

"कितना हसीन है मौसम"

ही फक्त काही उदाहरणे आहेत. लाख लाख गाणी आहेत कानावरून गेलेली, किती आठवावीत? पण एक नक्की की जो संगीतकार पारंपारिक तालाला नवे रूप देऊन गाणे साकार करतो तो ज्यास्त लक्षांत रहातो.

नुसता दोनतारी चा वापर करून लय आणता येते ते कीर्तनकार दाखवतो. अगदी साउंड ऑफ म्युझिक मधले डो या डियर गाणे अथवा. नुसत्या एकतारीने भजन म्हणणारा आपल्याला भावतो.

कारण आपल्यातली ही लयीची आणि तालाची ओढ. कितीही औरंगजेब असलेला मनुष्य असू देत, तो कधी न कधी तालात डोलतोच इतकेच नव्हे तर हाताने आणि कधी पायाने तालही धरतो.

मूल बघा, जरा ताल धरला की डोलते. बालगाणी सगळी ठेक्यात असतात.

जसे जसे आपण खोलांत जाऊ तसे तसे लय आणि ताल ही खोलांत जातात. कधी खयाल ऐकला असेलच. विलंबित आणि अतिविलंबित ताल तो तबलजी कसा धरतो त्याचे फार आश्चर्य वाटते. आणि मग रागदारी संपवून तो पंडित चीज गायला सुरुवात करतो आणि एकदम काळ लौकर लौकर जातो आहे असे वाटते. द्रुत आणि अतिद्रुत अश्या लयीत तबलजीची बोटे सुद्धा दिसत नाहीत.

काळ वाहतो लयी प्रमाणे ते दिसते तिथे. आपले लाईफ ही असेच आहे की. पाहिजे तर स्लो जगावे, पाहिजे तर फास्ट. लय आणि ताल आपल्याला गती देतील.

कासवासारखे अतिविलंबीत जीवन जगावे किंवा चिमणीसारखे अतिद्रुत. पण एन्जॉय करावे हेच बेस्ट.

# एकुलता एक

आमच्या अगोदरच्या पिढीमध्ये कसे ऐसपैस कुटुंब असायचे. आई बाबा आणि सात आठ मुले. मोठे अजब जीवन होते त्यांचे. बाबा कुठेतरी काम करायचे आणि पैसे मिळवून आणायचे आणि त्यावर सगळे कुटुंब जगायचे. आई मुलांना सांभाळणारी एकुलती एक संस्था. बाबा कधीतरी मुलांची चौकशी करायचे. पण ही चौकशी व्हायची तेंव्हा सगळ्यांनाच जाचक व्हायची. अशी चौकशी जेवढी कमी तेवढे कुटुंब सुखी.

मुले आपली आपण एकमेकांना धरून ठेवायची आणि मोठी मुले आईचा भार थोडा कमी करायची. सगळ्यांत मोठी भावंडे तर धाकट्यांचे आई बाबाच जणू. पडले झडले, भांडणे, मुलेच मिटवायची आपसांत. सगळ्यांत मोठी किंवा पहिल्या दोन मुली असल्या तर त्या बाकीच्यांच्या आई आणि मावशीच असायच्या. शाळेत कोण जाते, काय करते तिथे आणि कितव्या इयत्तेत आहे असे कोणीही फारसे सिरीयसली घेत नव्हते अजून. त्यातल्या त्यात हुशार मुलेमुली वर्गांत चमकायच्या. पण फारसे कौतुक काही त्याच्या वाट्याला यायचे नाही.  अशी मुले शिकायची त्यांच्यातल्या ड्राइव्ह मुळे.

मग मुले शाळेत जायची, जमेल तसे शिकायची, हळूहळू मोठी व्हायची आणि मग मिळवती होऊन आई बाबांना मदत करायची. घरे स्वतःची असली

तर चांगलेच, नाहीतर  हळूहळू घराबाहेर पडून आपले जीवन सुरू करायची. मुली लौकर उजवून आपली जबाबदारी कमी करण्यावर मोठाच भर असायचा. मोठ्या मुली बाळंत झाल्या तरी त्यांच्या आयांना शेवटची शेंडेफळे होतच असायची.

दोन पिढ्यांमधले अंतर वीस एक वर्षांचेच असायचे. कधी कधी दोन भावंडांतले अंतरसुद्धा वीस वर्षांचे असायचे. मावश्या भाच्यांच्या पेक्षा लहान असायच्या. आमची आजोळे अशीच होती जवळजवळ. तशीच  सगळयांची सुखदुःखेही जवळजवळ सारखीच होती. घर कसे का असेना, सगळयांचा आधार असायचे.

मुले मोठी झाली आणि त्यांनी आपल्या लहानपणच्या आठवणी मधून बोध घेऊन आपली कुटुंबे छोटी ठेवण्याचा निर्णय घेतला. पण लग्न झाल्याझाल्या एक तरी मूल व्हायलाच पाहिजे तरी तर समाजाच्या हीन टीकेला तोंड द्यावे लागणार. पहिल्या वर्षी किंवा जास्तीत ज्यास्त दुसऱ्या वर्षी मूल झालेच पाहिजे असे त्यांच्या होणाऱ्या आजीआजोबांनाही वाटे. पण मुलांची संख्या दोन तीन वर आली. कधीबाही एखादे कुटुंब चार पाच मुलांचे व्हायचे पण ते अपघाताने, जुळी तिळी झाली म्हणून.

मग मुलांच्याकडे लक्ष ज्यास्त दिले जायला लागले. आई निर्मिती कार्या पासून जरा लौकर मोकळी व्हायला लागल्यामुळे तीच मुलांवर लक्ष ठेवू लागली तेही आपल्या सासू किंवा आईपेक्षा बरेच ज्यास्त. तसेच आईच थोडेफार शिकलेली असल्याने मुलांची शिक्षणे ज्यास्त कसून व्हायला लागली. चढाओढ वाढली. मुलांना ज्यास्त मार्क पडले पाहिजेत, सगळीकडे ती पहिली दुसरी आली पाहिजेत अशी आकांक्षा आणि मग इच्छा आई बाबांना वाटायला लागली. कसे काय हे होणार असा विचार फारसे कुणी करत नसे. अजून दोन तीन मुले असल्याने हा नाही तर तो चमकेल म्हणून आईबाबांना आशा असायची.

मग आली आमच्या नंतरची पिढी. आईबाबा दोघेही चांगले शिकलेले, दोघांनाही करियरची आस्था लागलेली आणि दोघेही एकाच प्रकारच्या कुटुंबातून आलेले त्यामुळे आई बाबांच्यातही एक प्रकारची चढाओढ लागलेली. आता मुले फक्त आपण असे "तसे" नाही आहोत हे सिद्ध करण्यासाठी एक मूल "होऊ-द्यायची". कितीतरी जोडप्यांनी तर निर्णयच घेऊन टाकलेला की आत्ता नकोच, नंतर जमले तर पाहू.

मग या पिढीतल्या मुलांकडे किती लक्ष दिले जाईल याचा विचारच करून बघा. आई, बाबा, दोन आज्या, दोन आजोबा, काका, काकू, मामा, मामी, मावश्या, सगळ्यांचे कॉसेंट्रेशन त्या बाळावर. त्याची प्रत्येक हालचाल, त्याची

a

प्रत्येक प्रगती, त्याचे बोलणे चालणे सगळे कडक नजरेखाली, पूर्णपणे डॉक्युमेंटेड. याच्या अलीकडच्या पिढीचे फोटोवर भागत होते, याचे व्हिडिओखेरीज कशातही भागत नाही.

एकुलते एक ते मूल, सगळ्यांचे कडक लक्ष त्याच्यावर, त्याची सेफ्टी अतुलनीय, त्याने इकडे तिकडे खेळण्यावरही मर्यादा, पडले झडले तर उचलायला दहा हात तयार. मग ते आत्मकेंद्रीत न होईल तर काय होईल? पुन्हा सगळ्या अपेक्षा आकाशापर्यंत पोचलेल्या मग त्याने काय करावे?

मनुष्याला देव गुणदोष देतो, प्रत्येकाला काही न काहीतरी प्लस मायनस देतो, त्यातच त्याने जगायचे असते हे सर्व सत्य आहे. मग ते मूल असेच असणार. पण आता एवढ्या अपेक्षांच्या ओझ्याखाली ते दबून जाणार. त्याला एक वर्षाचे झाल्याबरोबरच हत्ती, घोडे, ॲपल, मँगो ओळखता आले पाहिजेत. त्याला इवल्याश्या बालमुठीत पेन धरून ए बी सी डी काढता आले पाहिजे. त्याने आपल्या त्या मित्राच्या किंवा मैत्रिणीच्या मुलापेक्षा हुशार असलेच पाहिजे. त्याने ऑर्डर केल्याबरोबर गाणे गोष्टी सांगितल्याच पाहिजेत.

नर्सरीमध्ये त्याला सगळे "ए"च मिळाले पाहिजेत. दुसऱ्या तिसऱ्या वर्षी त्याला बाबांच्या बरोबर फुटबॉल खेळायला यायलाच पाहिजे आणि त्याला बॉल गोलमध्ये मारता आलाच पाहिजे किंवा बॅटने फोर आणि सिक्स मारता

a

आल्याच पाहिजेत. बाबांना हे जमते की नाही हा प्रश्न नाही, त्यांनी मुलांकरिता केवढे कष्ट घेतले आहेत! मुलांना मात्र आलेच पाहिजे!

तिसऱ्या वर्षी त्याला कोणत्या ना कोणत्या क्लासला घातलेच पाहिजे. आईबाबा भले रात्री नऊ दहाला घरी येत असोत, त्यांना याच्या कडे बघायला, खेळायला वेळ मिळो की ना मिळो, याने मात्र आज सकाळपासून कायकाय केले याची गोष्ट सांगितलीच पाहिजे. आई बाबांना वेळ असेल तेवढ्यांतच याने खेळून घेतले पाहिजे आणि शिवाय चांगले जिंकलेच पाहिजे. आईबाबांना वेळ असेल तेवढ्यातच ट्रीपला जायचे, मॉल मध्ये खेळायला जायचे. आणि हे सर्व अत्युत्तम क्वालिटीचे असले पाहिजे.

आजकाल आमच्या नातवंडाला फुटबॉलच्या क्लासला आणि हिंडायला फिरायला नेण्याचे काम आमच्याकडे आलेले आहे, त्यामुळे फुटबॉलच्या त्या बंदिस्त मैदानात आणि बागांत इतर आजी आजोबा नातवंडांना कसे वागवतात आणि आईबाबा त्यांच्या मुलांना कसे बघतात ते जरा जवळून निरीक्षण करण्याची संधी आली आहे.

आपले बाळ कसे आहे ते दुरून पाहिल्याशिवाय कळत नाही, इतरांमध्ये सोडले की कळते. काही आया आणि बाबा  बाहेरच्या बाकड्यावर बसून मुलाला किंवा मुलीला "गाईड" करत असतात. मागे पडले की "अरे यार, जोरसे

a

दौडो ना. आगे भागो" अशी इन्स्ट्रक्शन देतात. स्वतः कसे आहेत याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही.

आपल्या लाडक्यापेक्षा किंवा लाडकीपेक्षा इतर मुले पुढे जातात हे आता सहन करता आले पाहिजे. आपला अगदीच मागे पडत असेल तरी त्याला पेशन्स दाखविता आला पाहिजे. हळू हळू होणाऱ्या प्रगतीची वाट पाहता आली पाहिजे. मिडलिंग मूल जरी असले तरी आता समाधान आणि नंतर आशा असली पाहिजे.

नुकतेच शिवाजी पार्कवरच्या त्या मुलांच्या खेळबागेत एक आजोबा बघितले. एक बाळ होते त्यांच्या कडे. नात आहे का नातू हे न कळण्यासारखे रूप आणि कपडे होते त्या बाळाचे. अक्षरशः गुडघ्याएव्हढ्या उंचीचा "नातू" होता त्यांचा. पण त्याला आणले होते सहा ते बारा वयाच्या मुलांच्या झोन मध्ये. ते बाळ त्याच्या उंचीच्या पायऱ्यांवर चढायचा प्रयत्न करीत होते आणि हे आजोबा "चढ चढ लौकर" म्हणून "प्रोत्साहन" देत होते. या आबाला स्वतःला पटापट पावले सुद्धा टाकता येत नव्हती पण नातवाने गड काबीज केला पाहिजे अशी अपेक्षा. वर "याला असेच आवडते, ऐकतच नाही तो आमचे" अशी बढाई.

a

शेवटी न राहवून मी त्या आजोबांना सांगितले की मुलाला एक ते तीन वर्षाच्या झोन मध्ये घेऊन जा. आमचा चार वर्षाचा नातूच एकदा इथे ढकला ढकली मध्ये पडला होता एकदा तेही सांगितले. म्हटले ऍक्सिडेंट काही सांगून होत नाहीत आणि झाले तर जड जातात. शेवटी नाईलाजाने तो आबा नातवाला योग्य त्या झोन मध्ये घेऊन गेला. केवढी ही अपेक्षा! काय ते धोक्याकडे दुर्लक्ष!

पुढे जाऊन या नव्या पिढीचे कसे होणार त्याचा विचार करा. सगळेच कसेतरी यशस्वी होऊन जीवन जगतीलच. कोणीही टाकाऊ कधीच नसते. पण आई बाबांचे बघा. एकुलते एक मूल. जसे देवाने दिले तसेच रहाणार, त्याच्यात्याच्या प्लस पॉईंट मध्ये मिळविणार आणि त्याच्यात्याच्या मायनस पॉइंटमध्ये मागे पडणार.आईबाबांना हे सर्व मानावेच लागेल आणि ऍडजस्ट व्हावेच लागेल, स्वतः कितीही कर्तृत्ववान असले तरी.

पूर्वीच्या आईबाबांना एक आशा असायची की हे ना ते मूल चांगले यशस्वी होईल, अर्थात त्या काळच्या यशाच्या व्याख्येनुसार. आता तसे नाही होणार. एक मूल जसे होईल तेच खरे. आहे तसे मानून घ्यायलाच लागेल. पैश्याअडक्याची उणीव नाही पडणार कदाचित आणि त्याच्या बळावर कुठेतरी ढकलता येईल त्या मुलाला, पण पैशाने सगळ्या गोष्टी थोड्याच मिळतात?

a

मिळण्यासाठी पाहिजे श्रद्धा, सबुरी आणि प्रचंड पेशन्स. या नव्या आईबाबांना हे सर्व स्वीकारायलाच लागेल. मूल छान झाले, ब्राईट झाले, सगळीकडे चमकते आहे, देवाची कृपा. नाहीतर जन्मभर अडजस्टमेंट करावीच लागेल.

प्रगतीच्या या पाऊल खुणा आवडतात का? नुसते ज्यास्त पैसे मिळवता आले म्हणजे प्रगती का? बरं, तसे असो, पण त्याही प्रगतीची काहीतरी किंमत मोजायलाच लागेल. एक तर पैसेबिसे मिळवून टेन्शन मध्ये रहा आणि घराकडे दुर्लक्ष करा किंवा मुलाबाळांना छानसे वाढताना बघून सुखी व्हा. ज्याचा त्याचा चॉईस आहे. कदाचित तुम्हाला हे दोन्ही मिळेल मग तुमच्या सारखे सुखी तुम्हीच.

# माझ्या आवडीचे लेखक

दुसरी ते पाचवी पर्यंतची शाळेतली पुस्तके डोक्यावरून गेली होती. त्यांत काय लिहिलेले असते आणि त्याचे काय करायचे याचा पत्ताच नव्हता. आपले बाई सांगतात ते ऐकायचे आणि जमले तर ते पुस्तकांत कुठे आहे ते शोधायचे असला उपक्रम होता.

पाचवी पासून मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल, शास्त्र आणि गणित यांची पुस्तके हातात पडली. पहिल्या दिवसापासून शाळेत बाई किंवा सर पुस्तक उघडून कसे वाचायचे याचे धडे देत.

मराठी आणि हिंदी या भाषा, पण इतर मात्र फक्त मराठीतून छापलेली, भाषा अशी नसलेली, पुस्तके. भाषा आपल्याशी बोलतात, त्यांना भाव अलंकार आणि स्वभाव असतो ते जाणवायला लागले. गणित, शास्त्र आणि इतिहास भूगोलाची पुस्तके म्हणजे बाई किंवा सर जे सांगतात तसेच पुस्तकांत आहे हे चेक करायची साधने.

पाचवी पासून पुस्तके, म्हणजे मराठी आणि हिंदीची पुस्तके आपल्याशी बोलतात आणि त्यातले धडे आपल्याला वेगवेगळ्या जगात घेऊन जातात असे जाणवू लागले. धडे वाचायला थोडीशी गम्मत वाटायला लागली आणि हे

लिहिणारे लोक लक्षांत रहायला लागले. मग वाचायला सुरुवात झाली ती संवय शाळा, कॉलेज पार करून आतापर्यंत टिकून राहिली आहे.

तुम्हीच बघा, गणित, शास्त्र, इतिहास आणि भूगोल याच्या धड्यांचे लेखक आहेत का लक्षांत? ते धडे म्हणजे फक्त शिकविणारे नळ. त्यातून ज्ञान घ्यायचे आणि नळ विसरून जायचा.

मराठी आणि हिंदीचे लेखक आपल्याशी बोलायचे, त्यांचा आवाज आपल्याला ऐकू यायचा. "हे कोण असतील बरं?" कसे दिसत असतील, कसे बोलत असतील अशी उत्सुकता निर्माण झाली. त्यातून आवडीचे लेखक मनांत बसले घर करून.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, त्यांचा धडा विसराळूपणाचे वेड, अगदी पाचवी सहावीत वाचला. विसराळूपणावर मात करण्यासाठी काय काय उपाय केले ते आणि त्याचे काय काय परिणाम झाले ते यांचे वर्णन आमचे आठ नऊ वर्षाचे पोट दुखवून गेले हसून हसून.

झाकीर हुसेन यांची अब्बूखां की बकरी एक नवाच धडा शिकवून गेली. एक साधारण बकरी लांडग्याला रात्रभर तोंड देऊन शेवटी सकाळपर्यंत त्याच्याशी लढाई करत त्याला जेरीला आणते आणि मग दोघेही सकाळी दमून देह ठेवतात अशी ती गोष्ट एक चटका लावून गेली मनाला.

a

द मा मिरासदारांची "नाना नव्व्यांणव बाद" गोष्ट गावची भाषा आणि गावचा स्वभाव यावर रखरखीत प्रकाश टाकून गेली. अगदी साधा, कोणीही लक्ष न द्यावा,कोणीही आपली मुलगी त्याला बायको म्हणून न द्यावी, कोणीही त्याला सिरियसली न घ्यावे असा माणूस आपले मन रमवायला गोष्टी सांगायला सुरुवात करतो आणि आपल्या बरोबर ऐकणाऱ्याला आपल्या स्वप्नाच्या दुनियेत घेऊन जातो. कोणीतरी आपल्याला दादला म्हणावे अशी तीव्र आशा त्याच्या मनांत असते पण ते होत नाही. एका भल्या माणसाचा भलत्या वेळीच सल्ला ऐकून खोटे सांगणे सोडून देतो आणि मग आपले लग्न होण्याच्या बाबतीत निराशाच पदरी पडल्यावर आत्महत्याच करायला जातो, पण वाचतो. मग सगळा फोलपणा लक्षांत आल्यावर पुन्हा एकदा आपल्या परीकथा सांगायला सुरुवात करतो अशी ती गोष्ट.

व्यंकटेश माडगूळकरांची बनगरवाडी ही गोष्ट, म्हणजे दीर्घ कथाच किती वेळा वाचली तरी पुन्हा हातात पडल्यावर पुन्हा वाचली जाते. ग्रामीण जीवन कसे रेखायचे याचा तो उत्तम नमुनाच.

मराठी आणि हिंदी लेखकांच्या गोष्टी वाचतांना मध्येच इंग्रजी शिरली. मग त्यातले लेखकही ओळखीचे व्हायला लागले. पण फार गंभीर लिखाण आणि ते सुद्धा इंग्लिश मध्ये म्हटल्यावर तिथे हलक्या फुलक्या लेखांचे आणि गोष्टींचे लेखक आवडले.

जेम्स हॅडले चेझ, आर्थर हॅले, हॅरॉल्ड रॉबिन्स यांच्या कादंबऱ्या आणि पुस्तके वाचायला घेतली की खालीच ठेवली जात नाहीत. त्यातल्या त्यातही जेम्स हॅडले चेझ च्या गोष्टी म्हणजे एक सिनेमाच पाहतो आहे अश्या. एकदम कडक आणि किती व्यावहारिक! गुन्हेगारी, रोमान्स, हेरकथा, किती व्हरायटी होती त्यांत.

आपल्याकडले लेखकही काही कमी नाहीत. नारायण धारपांच्या विज्ञान गोष्टी, बाबुराव अर्नाळकरांच्या धनंजय आणि छोटू च्या गोष्टी ज्यांनी वाचल्या ते रंगून गेले त्यांत. पण काहीही म्हणा या गोष्टींमध्ये आपला भारतीयपणा काही वाटला नाही. गोष्टी मस्तच होत्या पण भाषांतरित केलेल्याच वाटल्या. पण लेखक म्हणून आवडले आपल्याला.

असे वाचून आपणही असेच लेखक व्हावे असे वाटायला लागले. शाळेत असताना एक दोन वेळा लेख लिहून बाईंना दाखविले आणि त्यांनी थोडेफार कौतुकही केले पण पहिला लेख प्रत्यक्ष वर्गाच्या वार्षिक पुस्तकांत हस्ताक्षरांत का होईना प्रसिद्ध झाला त्यावेळी धन्य वाटले. सातवीत असताना तो प्रसिद्ध झाला आणि एकच एक कॉपी असल्याने अगदी जपून जपून तो अंक घरी दाखवायला मिळाला.

आपण मोठ्या लेखकासारखे व्हायला कसे वाटेल आणि काय करावे लागेल याची थोडीशी कल्पना यायला लागली पण आवडत्या लेखकाच्या जवळपास सुद्धा पोचता येणार नाही हेही सरळ सरळ दिसायला लागले.

आता त्र्याहत्तर वर्षे झाली वयाला, त्यातली साठ तरी वाचायला उपयोगी पडली. किती लेखकांचे वाचले आणि किती त्यातले आवडले याची गणतीच करणे सोडून दिले आहे. कारण कुणा कुणाचे नाव घ्यावे. प्रत्येकाची वैशिष्ट्ये वेगळी, स्टाईल वेगळी, विषय वेगळे. काही वेळा तर लेखन अति सुंदर पण लेखकाचे नावच माहीत नाही असे होते आहे.

इंटरनेटच्या या जमान्यात छापील पुस्तके वाचायची कला नाहीशी होते आहे पण लेखन मात्र अनेकविध विषयांवर वाचायला मिळते आहे. आवडते लेखक आता अनाम झाले आहेत पण लेखन मात्र वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे.

आता लघुकथा, गोष्टी, दीर्घकथा, कादंबऱ्या, निबंध वाचण्याकडचा कल जरा कमी झाला आहे आणि त्याची जागा घेतली आहे ती शास्त्रीय लेखांनी. शाळेत गणित, विज्ञान, इतिहास भूगोल या विषयांचे लेखक अज्ञात होते तसे आजही शास्त्रीय लेखांचे जनक अज्ञात असतात.

पण आवडतात असे अज्ञात लेखक आणि त्यांचे लेख आता.

# ११ फेब्रुवारी २०२२, पृथ्वीचा अंत?

एका सनसनाटी टीव्ही बातमीचा आधार घेऊन आमच्या या ग्रुपवर पोस्ट आली आहे की ११ फेब्रुवारी २०२२ ला एक उपग्रह पृथ्वीवर येऊन आदळणार आहे आणि पृथ्वी नष्ट होणार आहे त्यामुळे सगळयांनी किराणा घेऊन ठेवावा आणि त्या तारखेच्या आत संपवावा!

आयडिया चांगली आहे. पटापट आपले लाईफ खर्च करुन टाकायला एकदम बेस्ट. पण ॲक्शन घ्यायच्या आधी हा काय प्रकार आहे ते जरासे माहीत असलेले बरे म्हणजे सगळी दौलत लुटवल्यावर जर पृथ्वी नष्ट झालीच नाही ११ फेब्रुवारी २०२२ला तर मग काय? कटोरा हातात घेऊन फिरायची वेळ यायची, "भिक्षा वाढा हो माई" म्हणत.

सूर्य एक मध्यम आकाराचा तारा आहे आणि त्याच्या बरोबर हा सोलर सिस्टीमचा गोतावळा आहे. जवळ जवळ एक घन प्रकाश वर्ष त्या सोलर सिस्टिमचा व्याप आहे. आठ मोठे ग्रह, शेकड्याने छोटे ग्रह, न मोजण्याइतके लघुग्रह आणि उरलेले इतर सामानसुमान मिळून ही सिस्टिम बनली आहे. एकटा सूर्य ९९.९ टक्के माल आपल्याकडे ठेवून आहे. उरलेल्या ०.१ टक्क्यांत सगळे बाकीचे बसवलेले आहे.

a

आपली जन्मदात्री पृथ्वी एक अगदी छोटासा ग्रह आहे सूर्याभोवती प्रदक्षिणा घालणारा. तिच्याकडे तिच्यापेक्षाही अगदी छोटा चंद्र आहे. पृथ्वी चंद्रापेक्षा जवळ जवळ ऐंशी पट जड आहे आणि चौपट व्यासाची आहे.

सूर्याभोवतो दोन पट्टे आहेत. एक मंगळानंतर आणि एक नेपच्यून नंतर. ते पट्टे छोट्या मोठ्या खडकांनी भरलेले आहेत पण इतके विरळ की दोन खडकांमध्ये शेकडो हजारो मैलांचे अंतर नेहमीच असते. हे खडक म्हणजे लघुग्रह सूर्याभोवतीच प्रदक्षिणा घालतात. पण ते लघुग्रह अगदी एका पातळीतच असतात असे नाही आणि अगदी घड्याळासारखे काटेकोर फिरतात असेही नाही. त्यामुळे त्यांची कधीबाही धडक होते आणि अजून लहान तुकडे होतात. ते तुकडे पुन्हा विखुरले जातात. कधीतरी जवळून जाणारा एखादा तारा हलवून जातो त्यांना.

मग हे तुकडे इकडे तिकडे फिरतांना मोठ्या ग्रहांजवळ येतात आणि ओढले जाऊन एक तर पडतात तरी त्यांच्या वर किंवा त्यांच्या वातावरणांत जळून जातात. आतल्या पट्ट्यांतले तुकडे खडकांचे असतात आणि बाहेरच्यातले बर्फाचे. आतल्या खडकांच्या उल्का होतात आणि बाहेरच्यांचे धूमकेतू.

१९९०चा काळ आठवतो का, शूमेकर आणि लेव्ही या दोन लोकांनी एक धूमकेतू पाहिला आणि त्याचा मागोवा घेतला. त्यांना असे दिसले की हा

धूमकेतू गुरू ग्रहांच्या अगदी जवळून जाणार आहे. मग सगळ्या जगातल्या खगोलशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले गेले त्याच्या कडे. तो धूमकेतू गुरू ग्रहाने पकडला आणि गुरू भोवतो प्रदक्षिणा घालता घालता त्याचे तुकडे झाले आणि गुरू ग्रहावर पडले. काहीही झाले नाही त्या ग्रहाला, फक्त काही दिवस त्याच्या ढगांवर काळे डाग पडले. पण या घटनेने खगोलशास्त्रज्ञ आणि खगोलनिरीक्षकांचे लक्ष वेधले गेले या लघुग्रहांकडे आणि त्याच्या पृथ्वीवर पडण्याच्या धोक्याकडे.

तेंव्हापासून त्याच्यावर "वॉच" ठेवला जातो आहे. जर एखादा आला पृथ्वीकडे तर आतातरी काहीच करता येणार नाही पण कमीतकमी कधी येणार आणि कधी आदळणार ते शोधता येईल. पुढेमागे त्यावर काहीतरी उपाय करता येईल ही एक भाबडी आशा आहे त्यामागे. दोन तीन नवे उपग्रह सोडले आहेत त्या लघुग्रहांवर "लक्ष" ठेवण्यासाठी. त्यामुळे झाले आहे काय की असंख्य लघुग्रह पृथ्वीची कक्षा ओलांडतात आणि म्हणून कधी न कधी ते पृथ्वीला भिडणार आहेतच असे नव्हे भीतीदायक सत्य पुढे आले आहे.

चला, आता घबराट पसरवायला अजून एक निमित्त झाले. माणसाला आपली प्रजाती वाचवायची आहे. टीव्ही चॅनेलांना नवीन काहीतरी सनसनाटी बातमी पाहिजे आहे. आपल्या ग्रुपवर पोस्ट करायला काहीतरी चटक मटक पाहिजेच आहे.

पृथ्वीवर दररोज चाळीस पन्नास टन वजनाच्या उल्का पडतात. अगदी दररोज. बहुतेक हवेत जळून जातात किंवा समुद्रात पडतात. माणसाला कळतही नाही आणि तो अज्ञानात सुखी रहातो.

पण या लघुग्रहांचा मागोवा घेतांना असे दिसले आहे की कितीतरी पृथ्वीच्या जवळून निघून जातात. त्यांना "नियर अर्थ ऑब्जेक्टस", "निओ", म्हणतात. असे मानले आहे की जे एक दशलक्ष मैलांवरून जातात ते निओ आणि त्याच्यावर ज्यास्त लक्ष ठेवायचे. चंद्र आपल्यापासून "फक्त" अडीच लाख मैलांवर आहे त्याची आपल्याला भीती नाही वाटत. एक दशलक्ष मैल म्हणजे चंद्रापेक्षा चारपट दूर.

दर महिन्याला नासा एक बातमीपत्र प्रसिद्ध करते त्यांत कोणते निओ या महिन्यांत भेट देऊन जाणार आहेत त्यांची सविस्तर माहिती असते. आता पर्यंत अनेक वेळा असे लहान मोठे निओ चंद्र आणि पृथ्वी याच्या मधून एवढेच नव्हे तर आपल्या जिओस्टेशनरी सॅटेलाईट च्या खालून पार झाले आहेत आणि आपल्याला त्याचा पत्ताही लागलेला नाही.

एक दहा वीस पन्नास शंभर मीटर आकाराचा उल्काखंड सत्यानाश करू शकतो हे तर उघड आहे. पण तो पृथ्वीला भिडण्याची शक्यता कोटी मध्ये एक

असते हेही उघड आहे. १५ फेब्रुवारी २०१३ ला आपल्या सकाळी नऊ दहाच्या सुमारास एक उल्काखंड रशियात पडला. आम्ही त्यावेळी आमच्या मोठ्या मुलाचे लग्न साजरे करत होतो. त्यादिवशी आम्ही टीव्ही बघायचा तर प्रश्नच नव्हता आणि इतरांनी पाहिला असेल की नाही तेही सांगता येत नाही.

आता ११ फेब्रुवारी २०२२ला येणारा हा पाव्हणा काय करतो ते बघायचे. बहुधा काही लाख मैलांवरून पार होईल त्यांच्या इतर बांधवांसारखा. पण अशी गॅरंटी थोडीच देता येते?

आम्ही प्रगत जरूर आहोत पण इतके प्रगत नाही की येणारा उल्काखंड टाळता यावा असे. दोन रुळांच्या मध्ये उभे राहून रेल्वे मला काहीच करणार नाही असे म्हणण्यासारखे आहे हे.

मग काय करावे? जावे का आजच्या आज किराणा दुकानांत आणि घेऊन ठेवावा का माल? आणि तो ११ फेब्रुवारी २०२२च्या आत संपवावा का? आपल्या ग्रुपवर पोस्ट करणाऱ्याने यावर सखोल विचार केलाच असेल. मग टाकावा त्याच्यावर विश्वास आणि झोकून द्यावे स्वतःला बिनधास्त.

काय, कशी आहे आयडिया?

# कानसेन की तानसेन?

या जगांत, जगांतच काय, या विश्वात, सर्वत्र हार्मनी भरून राहिली आहे. जिथे पाहावे तिथे स्वर ऐकू येतात. स्वर म्हणजे काय तर हवेत होणारी स्पंदने, प्रेशर वेव्हज. स्वर स्वतः स्वतंत्र असतो पण तो इतरांशी जुळवून घेतो तेंव्हा ते कानाला गोड लागते. जर स्वर एकमेकांशी जुळवून न घेता वागायला लागले की कानाला आवडत नाही.

कानाला आवडते ते संगीत, न आवडते तो कल्लोळ. पण आपला हा मेंदू कल्लोळातून संगीत शोधण्यात बडा माहीर आहे. स्वर निर्माण करणे अगदी लहानपणापासून येते. मनाच्या मूड प्रमाणे स्वर येतो. खूष असतांना आपोआप संगीत येते आणि नसतांना कल्लोळ.

सगळ्यांनाच संगीत समजते आणि ते एन्जॉयही करता येते. काहींना निर्माण करता येते आणि बहुतेकांना त्याचा आनंद घेता येतो. निर्माण करणारे ते तानसेन आणि आनंद घेणारे ते कानसेन. खरे तर सगळे जन्मजात तानसेनच असतात. खुश झाले की कसे गुणगुणायला लागतात. पाणी हा एक विशिष्ठ पदार्थ आहे. अंग पाण्याने भिजले की लगेच मनांत सारेगमप सुरू होते. डोक्यावर वर शॉवर किंवा तांब्या पडला की इकडे गाणे सुरू. सगळेच्या सगळे बाथरूम सिंगर असतात.

आता तो देव सर्वांना सगळया गोष्टी एकसारख्या देत नाही ना. त्यामुळे तो काही लोकांना गळा चांगला देतो, काहींना वाजवायची कला देतो आणि काहींना मुळापासून मांडायची, कंपोज करायची, कला देतो. कान मात्र अगदी सगळ्यांना देतो. ते सुद्धा असे की बारीकसा फरक कुणालाही लगेच ओळखता यावा. सगळे संगीत सम्राट तानसेन थोडेच असतात? त्याला लागते दैवी देणगी आणि अपार मेहेनत. हे कुणाकडे असते? अगदी थोडया लोकांकडे. मग तानसेन कमी आणि कानसेन असंख्य असे असणारच.

आपण उगाच दुसऱ्यांशी तुलना करतो बघा. देवाचा मान ठेवावा आणि आपण मोठे गायक नाही म्हणून सरळ मान्य करावे पण त्याच बरोबर त्याच देवाचा मान ठेवावा आणि आपण उत्तम कानसेन आहोतच हेही मान्य करावे. लक्षांत असू दे की ऐकायला कोणी नसेल तर गायक कुणाला सुनविणार?

भाऊ आणि ताई, श्रोता तेवढाच महान असतो जेवढा गायक.

प्रत्येकाला आपला आवाज आवडतोच. ठासून सांगतो आहे मी हे, कोणी कबूल करो वा ना करो. मग आपले गाणे आपल्याला आवडणार कसे नाही? जरा विचार करा, हे सर्व मोठमोठे गायक काय फक्त स्वतःसाठी गातात का?

a

नाही, ते तुमच्यासाठी गातात. तानसेन कानसेनासाठीच आहेत हे त्रिवार सत्य आहे.

मग भाऊ (किंवा ताई) डरायचे कशाला, मस्त मोकळ्या आवाजात गावे. उगाच दुसऱ्यांशी तुलना करत बसू नये आणि आपल्याला कमीही समजू नये. जरा विचार करा, बाळाचे रडणेसुद्धा आईला आणि बाबांना आणि आज्जीआजोबांना, सगळ्यांना गोड वाटते. ते मूल विचार करते का की माझे रडणे किंवा माझे गाणे इतरांना आवडेल का असा? किंवा कदाचित त्यांना आवडणार नाही म्हणून गप्प रहाते का? नाही ना? मग आमच्यात अशी उणीवबुद्धी का आली?

आपल्याला देवाने गाता गळा, मग तो कसा का असेना, दिला नाही म्हणून इतरांचा दुस्वास कशाला करायचा, कान तर दिले आहेत ना सगळ्यांना, मग झाले तर.

कानसेन प्रचंड संख्येने असल्याने आणि त्यांचे कान भलतेच तीक्ष्ण असल्याने ते चुका शोधतातच. त्यात काय, तो माणसाचा स्वभावच आहे. पण चुका म्हणजे तरी काय, पूर्वी ऐकलेल्या कशाच्याबरोबरची तुलनाच ना? मग सांगून पहा की काय चुकले ते सांगा आणि कसे बरोबर करायचे ते सांगा. असे सांगूनच पहा, बघा ते चूक काढणे बंद होते की नाही ते.

अहो, सगळे काय लता मंगेशकर किंवा आशा भोसले किंवा मोहमद रफी किंवा किशोर कुमार असतील का? आणि जर खरेच तसे झाले तर मग या दिग्गजांचे वैशिष्ट्य कसे उठून दिसणार? अशी तुलना करूच नये. त्यांचे स्टॅंडर्ड गाठायचा, त्यांची कॉपी करायचा प्रयत्न नक्की करावा, गाण्याचे कष्ट भरपूर घ्यावेत. पण आपल्याला कधीच कमी लेखू नये. जे तुमच्याकडे आहे ते त्यांच्याकडे नाही तेही पहावे.

उत्तम तानसेन, म्हणजे कुठल्यातरी ऐकीव उत्तम स्टॅंडर्डचा, होता येईल किंवा नाही होता येणार, पण उत्तम कानसेन व्हायला काहीच प्रयत्न करावे लागत नाहीत. हां, ऐकून ऐकून कंपॅरिझन छान करता येते आणि गुणदोष पटकन लक्षांत येतात. जरा जोर लावला तर परीक्षक होता येते आणि कॉमेंटेटर होता येते.

परीक्षक किंवा कॉमेंटेटर चा रोल करतांना हे लक्षांत ठेवले पाहिजे की समोरचा, ज्याचे परीक्षण आपण करत आहोत तो, खूप कष्ट घेऊन, प्रॅक्टिस करून स्वतः खूप इच्छाशक्ती दाखवून पुढे आलेला आहे. तो तुमचे परीक्षण ऐकतो आहे आणि तुमचेही परीक्षण करतो आहे. तो परीक्षक मोठा कानसेन झाला आहे पण तानसेन नसेल अजिबात. परीक्षकाने नीट ऐकून मग आपले मत द्यावे हेच अपेक्षित असेल. नुसते दोष दाखवणे म्हणजे परीक्षकांचे टॅलेंट नव्हे.

a

टीका करणे भारी सोपे. त्याला काही फारसे लागत नाही. टिप्पणी करायला काहीतरी ज्ञान, काहीतरी अनुभव लागतो. एक गायक दुसऱ्याचे परीक्षण नीट करू शकत असेलच असे नाही. तो कदाचित त्या दुसऱ्या गायकाची स्वतः बरोबर किंवा इतर कोणाशीही तुलना करीत असेल. त्यांत न्याय होतो का अन्याय हे टीव्ही वरच्या गाण्याच्या कार्यक्रमाची सिरीयल पाहून चांगले लक्षांत येते.

रहाता राहिला प्रश्न आपल्या गुणवत्तेचा. ती तर काय देवाची देणगी आहे. जशी आहे तशी आहे. पण मग म्हणून ती काय वाया घालवणार का? ते सुद्धा जग काय म्हणेल असा विचार करून? गुणवत्ता कधीच वाया घालवू नये. स्टेजवर नसले तरी बाथरूम मध्ये गायला काय अडचण आहे? आणि ऐकवायलाही काय अडचण आहे? मोठा टॅलेंटेड कानसेन असला तर कौतुक करील किंवा कान झाकून घेईल.

थोडेसे तानसेन आणि खूपसे कानसेन व्हावे. त्यांनी एन्जॉयच करता येईल. लोक काय, आज काही बोलतील उद्या विसरून जातील, आपली कला आपल्याकडेच राहील.

बेटर टू बी ए गुड "कानसेन" इफ नॉट या गुड "तानसेन".

शेवटचे वाक्य जोरांत सांगायला, ते सुद्धा इंग्रजीमध्ये, कशी मजा वाटते नाही?

# उंची आणि पॉवर

माणसाची उंची आणि त्याची पॉवर या देवाने व्यस्त प्रमाणात का दिल्या आहेत ते कळायला मार्ग नाही. पण एकंदरीत पाहिले आहे की माणूस, मग ती बाई असो की बुवा, आपल्या उंचीनुसार आपली पॉवर दाखवतो. इथे पॉवर म्हणजे फक्त शारीरिक शक्ती नव्हे तर एकंदरीत माणसाचे इम्प्रेशन, त्याचा इतरांवर पडणार प्रभाव, त्याला नेता मानून त्याच्या कडे वळणारे, त्याच्या बरोबर जाणारे इतर लोक असा व्यापक अर्थ घेतला पाहिजे.

सर्वसाधारणतः माणसाची उंची, शारीरिक उंची, साडेपाच फुटाच्या आजूबाजूला असते. मनुष्य जसजसा वयाने वाढत जातो तसतसा त्याला आपल्या उंचीचे भान यायला लागते. अगदी शाळेपासून, म्हणजे साधारणतः पाचवी सहावी पासून त्याची उंची त्याची ओळख बनायला लागते. अजून तो उंचीने आणि अंगापिंडाने वाढणार असतो पण तरीही त्याची उंची पहिल्यांदा त्याचे सोशल स्टेटस ठरविते.

पाचवी सहावी मध्ये मुले साडेचार ते पाच फूट उंची गाठतात. एखादा तेंव्हाच पाच सव्वापाच फूट उंची गाठतो आणि मग तो आपोआप लीडर बनतो. ठेंगू रहाणारी मुले बारक्या, टिंग्या अश्या नावाची धनी होतात. मग आपोआप ती फॉलोवर व्हायला लागतात किंवा त्याच्यावर ते लादले जाते.

मॅट्रिक होऊन कॉलेजमध्ये जाईपर्यंत त्यांची शारिरीक वाढ जवळ जवळ पूर्ण व्हायला लागलेली असते. अंगपिंड चांगले भरले आणि बळकट दिसणारे झाले तर त्या मुलांनाही लीडरशिप करावीशी वाटते. शरीर अगदी हट्टेकट्टे पण उंची कमी असे झाले की त्यांना तेंव्हापासूनच लीडर व्हायला झगडावे लागते. उंच मुलांकडे लीडरशिप लौकर जाते. मग उंचीने कमी असणाऱ्या लोकांच्या मनांत येते असूया आणि द्वेष. या दोन्ही भावना जन्मभर मनांत घर करून रहातात.

बौद्धिक वाढ आणि इतर गुण जरा बाजूला ठेवूया आत्ता.

उंचीने खुजी असणारी मुले मग आपली उंचीची उणीव इतर प्रकारे भरून काढायचा प्रयत्न करतात. टेचात रहाणे, उंच टाचांचे बूट घालणे, कपडे एकदम कडक, केसबीस टिपटॉप अशी रहायला लागतात. उंच मुलांचे सहसा असे होत नाही. त्यांची उंचीच त्यांना एक प्रकारची शान देऊन जाते.

माणूस हा एक पॅकेज आहे, शारीरिक आणि मानसिक वाढ सगळ्यांचीच होते पण उंच सडपातळ व्यक्ती लौकर इम्प्रेशन पाडतात. उंच व्यक्ती बहुधा डोके मान वाकवून चालतात आणि बहुधा नम्र स्वभावाच्या असतात. ठेंगू व्यक्ती ताठ

मान करून वावरणाऱ्या आणि आपला दरारा दाखविण्याकडे कल असलेल्या असतात.

एखादा उंचीने ताडमाड, अंगाने पिळदार आणि शक्ती असलेला आणि दणकट असाही होतो. त्याला डबल डोस मिळालेला असला तरीही बहुधा तो स्वभावाने मऊच असतो. या उलट देव एखाद्यावर अशी काहीच कृपा करत नाही. त्याला तो खुजा, हडकुळा आणि नाजूकच करतो. यालाही असाच डबल डोस देतो.

पण देव कधीच अन्याय करत नाही. त्या उंच धिप्पाड माणसाला उत्तम सेवक होईल असा स्वभाव देतो, इतरांचे रक्षण करण्याची, शक्तीची कामे करण्याची भावना देतो आणि त्या हडकुळया ठेंगण्या माणसाला अफाट बुद्धिमत्ता किंवा कमालीची कला देतो. दोघेही आपापल्या क्षेत्रात यशस्वी होतात.

शैक्षणिक जीवना नंतर पुढील आयुष्यातही ही बालपणी रुजलेली बीजेच टिकून राहतात. इंटरव्ह्यू घेतांना किंवा कामाची चर्चा करताना पाहिले असेल की उंच माणसे ज्यास्त नम्रपणे वागतात, आपली मते हळूवार मांडतात आणि सर्वसाधारणतः इतरांची मते लौकर स्वीकारतात. ठेंगू माणसे पहिल्यापासून

आपले इम्प्रेशन कसे पडेल, आपली मते कशी ठाशीव असतील आणि इतरांनी ती लगेच स्वीकारावी असा त्यांचा आग्रह कसा असेल अशी असतात.

ठेंगू माणसाची बरीच शक्ती आपले इम्प्रेशन पाडण्यांत खर्च होते आणि म्हणून तो सतत अस्वस्थ असतो. थोडासा रागीटही होतो आणि समोरच्याला खाली कसे ओढता येईल अशा वृत्तीचा होतो. त्यांत त्याचे काही चुकत नसते, तो आपली उंचीची उणीव भरून काढायला उत्सुक असतो.

असेही होते की शारीरिक उंचीने कमी असलेली माणसे बौद्धिक आणि कला याची उंची खूप ज्यास्त गाठतात. ज्यास्त करून असे लोक हेकट आणि अरेरावी असलेले होतात. आपला बॉस कसा होता ते आठवून पहा. उंच माणसे मृदू बॉस होतात आणि ठेंगू माणसे कडक बॉस होतात असे पाहिले आहे. आता आपल्याला आपला बॉस काही निवडता येत नाही पण आहे त्याच्याबरोबर कसे वागायचे रहायचे हे तर नक्की ठरवता येते. उंच असिस्टंट असतात ते कसे वावरतात ते बघितलेच असेल. मान वाकवून नम्रपणे वागतात. ठेंगणे असिस्टंट ज्यास्त टेचदार होतात.

जीवनातल्या सगळ्या क्षेत्रात उंची आणि शरीरयष्टी याचे वर्चस्व जाणवतेच. बहुतेक सगळे हुकूमशहा ठेंगणेच होते. बहुतेक चांगले नेते उंच होते.

a

लग्नाच्या मार्केट मध्येही याचे प्रतिबिंब दिसते की नाही ते तुम्हीच सांगा. उंचीने मध्यम किंवा थोडी कमीच असलेली मुले आपल्या वधू कश्या निवडतात? उंच मुलांना कशी ज्यास्त फ्रीडम मिळते आपली वधू निवडायला? मुलींना सहसा उंचच वर का पसंत पडतात? उत्तम शिकलेल्या आणि व्यवस्थित करियर सुरू असलेल्या ठेंगण्या वरांनाही पाहिजे तशी वधू मिळवायला खूप इंटरव्ह्यू का घ्यायला लागतात? ठेंगण्या मुलींना पाहिजे तो वर मिळवायला कशी फारशी अडचण येत नाही पण उंच मुलींना त्या कितीही छान दिसणाऱ्या असल्या तरी असेच बरेच इंटरव्ह्यू का द्यायला आणि घ्यायला लागतात? इथे बुद्धिमत्ता, कला, शिक्षण यांच्या पेक्षा दिसणे, उंची, धडधाकट पणा यांनाच प्रिफरन्स मिळतो असे दिसते का?

आपल्याला आवडो किंवा न आवडो, फरक पडतोच. ठेंगणी ठुसकी बाई आणि तिचा उंच धिप्पाड नवरा बघायला कसे वाटतात? काही विशेष वाटत नाही त्यांत. उलट उंच सुंदर बाई आणि तिचा ठेंगू नवरा बघायला कसा वाटतो? थोडे वेगळे वाटते की नाही? एकमेकांच्या आवडीनिवडी प्रमाणे त्यांनी लग्न केलेले असते, काही विशेष गुणही असतात त्यांच्यांत. एकमेकांना पसंत करूनच लग्न झालेले असते त्यांचे. वस्तुतः त्यांना जीवशास्त्राच्या नियमाप्रमाणे मुले एकाच उंचीची आणि चणीची होण्याची शक्यता असते पण तरीही काहीतरी खटकतेच, हो ना?

a

खरेतर असे असू नये. शेवटी मनुष्यप्राणी सगळीकडे एकच असतो पण असे होताना दिसतेच. आता उंची, धडधाकट पणा, तीव्र किंवा मंद बुद्धी, हाताचे कसब, कला कुसर या सर्व देवाच्या देणग्या आहेत, आपण काही करू नाही त्यांत. एकदा देवाने दिलेली उंची, शरीरयष्टी आणि बुद्धिमत्ता आपण काही बदलू शकत नाही, पण जे मिळाले त्याचा स्वीकार आदरपूर्वक का न करावा?

दुसऱ्याचे शेत, कुंपणा पलीकडली बाग, दुसऱ्याचे धन, दुसऱ्याची बायकामुले, दुसऱ्याची कलाकुसर, दुसऱ्याची बुद्धिमत्ता याचा दुस्वास का करावा?

सगळे हे बरोबर आहे हो, कळते सगळे पण वळत नाही त्याला काय करावे?

# स्त्री शक्ति

सर्वशक्तिमान ईश्वराने जीवसृष्टी तयार केली आणि त्यांत कालांतराने स्त्री पुरुष निर्माण केले. देव सुद्धा प्रयोग करून बघतो. केलेल्या प्रयोगाला चांगला वेळही देतो आणि नंतर नाही जमत दिसले की तो प्रयोग नष्ट करून दुसरा करतो.

बघा ना, पहिल्यांदा रसायन शास्त्र वापरून जैविक रसायने केली. मग त्यांची सरमिसळ करून आपल्या सारख्या प्रती करण्याची त्यांची शक्ती वाढवली. प्रति काही एक सारख्या होईनात. शिवाय वातावरण सतत बदलत राहिले होते. त्या बदलांना तोंड देण्यासाठी केलेल्या प्रती आपोआप बदलण्याची व्यवस्था करून पाहिली. पण त्यानेही फारसे योग्य जीवन निर्माण होत नाही असे पाहिल्यानंतर काहीतरी वेगळे पाहिजे म्हणून स्पेशलायझेशन करायला सुरुवात केली.

एक पुरुषवर्ग केला आणि दुसरा स्त्रीवर्ग. त्यांनी आपापले विशेष गुण एकत्र करून अंडबीजे निर्माण करायची आणि मग त्यांचे मीलन घडवून वैशिष्ट्यपूर्ण जीवबीज तयार करायचे असे केले. स्त्री आणि पुरुष झाले तयार तिथे. अगदी स्पेशल. स्वतःहून नवीन जीव निर्माण करायची त्यांची क्षमता नाहीशी झाली आणि एकत्र आल्याखेरीज नवीन जीव निर्माण करणे त्यांना अशक्य झाले.

a

आता वेगवेगळे जगणे तर शक्य होते पण नवीन जीव निर्माण करायची उर्मी ही देवाने त्यांना दिली. स्त्री आणि पुरुषांमध्ये आकर्षण होईल असे केले. अर्थात त्याच्या करता विशेष गुण दोघांनाही दिले पण वेगवेगळे. नव्व्याण्णव टक्के शरीर एकसारखेच दिले पण तो उरलेला एक टक्का विशेष गुण म्हणून दिला.

स्त्रीलाच फक्त अंडे निर्माण करायची आणि ते शरीराबाहेर किंवा आंत पूर्ण विकसित करून मग शरीराबाहेर काढण्याची शक्ती दिली. अर्थात त्यामुळे होणाऱ्या संततीला आईची ओढ आणि भावबंध होईल त्यांत काय नवल. पुरुषाने एकदा आपले बीज स्त्रीला प्रदान केले की त्याचे काम संपले. पण त्या प्रदानानंतर आपल्या स्त्रीचे रक्षण करावे आणि तिचा प्रतिपाळ करावा ही उर्मी मात्र त्याने बहुतेक पुरुषांना दिली.

स्त्रिया शुक्रावरून येतात आणि पुरुष मंगळावरून अशी एक गमतीची म्हण आहे. त्यातच दोघांच्या स्वभावाचे रहस्य लपले आहे. स्त्री एक गृहप्रेमी, आपल्या बालकांना जीवापाड जपणारी आणि आपले घर हे विश्व असलेली तर पुरुष हिंडणारा, अन्न गोळा करणारा आणि त्यासाठी युद्धे करणारा आणि युद्धासाठी शक्ती कमावणारा असा झाला आहे. हे सर्व सापेक्ष आहे हे मान्य आहे पण बहुतांशी असेच दिसते म्हणून तो स्वभावधर्म म्हणून मानायला हरकत नाही.

a

भले पुरुष ज्यास्त दणकट, ज्यास्त रागीट, ज्यास्त उतावळा आणि ज्यास्त भांडखोर असेल पण त्याला हे गुण नसतील तर तो आपले अलिखित कर्तव्य कसे करणार? आणि स्त्री ही प्रेमळ, थोडी नाजूक, खूप संयम असलेली आणि क्षमाशील नसेल तर तीही तिची अलिखित कर्तव्ये कशी करणार?

स्त्रीची शक्ति तिच्या आकर्षणात आणि पुरुषाचे आकर्षण त्याच्या शक्तीत असते असे म्हटले जाते. पुरुष भले बाहेरच्या जगाचा राजा किंवा सम्राट असो, घरांत पाऊल टाकले की त्याने ते सर्व विसरावे आणि घरच्या सम्राज्ञीला शरण जावे हेच उत्तम.

जेंव्हा एका व्यक्तीला आपली कर्तव्ये पूर्ण करता येत नाहीत तेंव्हा दुसरी व्यक्ती साथीदार म्हणून धावून येते. स्त्री जशी लक्ष्मी, सरस्वती, सीता, पार्वती असते तशी वेळ आली तर चंडी, काली, दुर्गा होऊ शकते आणि तिच्या पतीला जे जमले नाही ते करून दाखवते. या उलटही होऊ शकते बाहेरचा तो शक्तिमान, भांडखोर, उतावळा रागीट पुरुष घरी आल्यावर जर शांत झाला नाही तर ही पार्वती त्याला अगदी सरळ करायला अगदी समर्थ असते. मग शांत रूप घेऊन मुलाबाळांशी खेळणे त्यांचे संगोपन करणे आणि घरच्या स्वामिनीला थोडातरी विश्राम देणे हे त्याचेही कर्तव्य होते. प्रसंगी अगदी नाट्य, नृत्य, गायन, चित्रकला दाखवून आपल्या स्त्रीचे मनोरंजन करणे त्याचे काम होते.

आणि ते पुनर्निर्माण करण्याचे परम कर्तव्य, ते तर जीवनाचे मुख्य सार, ते केलेच पाहिजे. त्याकरता स्त्री आणि पुरुष यांना एकत्र यावेच लागते. आता त्या स्त्रीची शक्ती परम कोटीला जाते की नाही ते बघा. बाहेरच्या जगात सम्राट, अभिजात राजा वगैरे असलेला हा पुरुष घरात स्त्रीशी लाडीगोडी करतोच की नाही. आता ती त्याला बरोबर आपल्या बोटावर नाचवते की नाही, सांगा बरे. तिलाही माहीत आहे की आपले काम झाल्यावर तो पुन्हा आपल्या वळणावर जाणार आहे म्हणून. मग आल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून का न घ्यावा?

तसे असो. पण काही काही गोष्टी ज्या स्त्रियाच चांगल्या करू शकतात तिथे त्यांची शक्तीही दिसून येईल. खूप नाजूक काम, खूप पेशन्स लागणारे काम या गोष्टी स्त्रियांनीच कराव्यात. घर सांभाळणे एखादा पुरुष करील सुद्धा आणि त्याची स्त्री त्याने करायची घराबाहेरची कामे करील सुद्धा. पण हे त्यामानाने थोडे विरळाच होते आतापर्यंत. आता सारे बदलले, अहो जग पुढे गेले. आता स्त्री पुरुष एकाच गाडीची दोन चाके आहेत, तर ती एकसारखी नसली तर गाडी उलटणारच. स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा देऊन सगळी कर्तव्ये करते आहे असे दिसते आता. कोणी आता दुसऱ्यापेक्षा कमी नाही. स्त्री ही पुरुषाला तुल्यबळ आहे.

पण ती अशी कधी नव्हती?

a

अति स्पेशलायझेशन झाले की त्याचे वाईट परिणाम दिसायला लागतात. घरात डांबली गेली म्हणून स्त्रीची आणि घराबाहेर करायची कामे म्हणून पुरुषांची, अशी त्या स्त्री पुरुषांची शक्ती कमी नाही झाली. वैशिष्ठय वाढले. समाज म्हणजे सोयीस्कर नियम करणारा एक घोळका. तो सोयीस्कर नियम करून आणि त्या नियमाआडून खऱ्या खोट्या प्रवृत्ती तयार करतो.

शेवटी मनुष्यजातीला काय पाहिजे? वंशवृद्धी, बालसंगोपन, पुरेसे निर्वाहाचे साधन आणि जीवनाची शांती, हेच ना? मग स्त्री पुरुष भेदभाव करून आणि त्यांना निरनिराळे गुणदोष चिकटवून आणि निरनिराळी कर्तव्ये जोडून देऊन कसे हे साध्य होणार. अगदी पशुपक्ष्यांच्या पातळीवर जाऊ नये, पण एकदा तरी बघावे त्यांच्या कडे की ते असा भेदभाव करतात का. निसर्ग पारश्यालिटी करत नाही कधी. निसर्गाला जाणणे म्हणजेच स्त्री शक्तीचा आदर करणे नव्हे काय?

वंदन करायचे तर दोघांच्या वैशिष्ट्यांचे करावे. फक्त स्त्रीशक्तीचा मुद्दाम एका दिवशीच उल्लेख करून आणि तिला एकाच दिवशी वंदन करून आपण उलटेच करीत नाही का? एकाच दिवसाची ती देवी असते का कधी?

# लक्ष्मी आणि सरस्वती

या दोन्ही देवी महान. दोघीही आपल्या आपल्या क्षेत्रात प्रगल्भ. दोघींचे भक्त असंख्य आणि दोघींच्या लीला आश्चर्यकारक आणि अफाट.

पण.....

दोघींचे स्वभाव भिन्न आणि त्यामुळे दोघींच्या भक्तांचे स्वभाव तसेच अगदी भिन्न.

आपण देवींना योग्य तो आदर दाखवलाच पाहिजे आणि मान राखलाच पाहिजे. म्हणून आम्ही त्यांना कधीच एकेरीने संबोधत नाही. लक्ष्मीबाई आणि सरस्वतीबाई असेच म्हणतो.

काय कारण असेल ते अजिबात उलगडत नाही पण या दोघी देवी एकाच ठिकाणी सुखाने नांदताहेत असे मात्र फारसे दिसून येत नाही.

तसेच त्यांचे पतीही. त्यांनाही आपल्या पत्नींमुळे महत्व येते. गणेशाची सरस्वतीपती बुद्धी देवता म्हणून आपण पूजा करतो तेवढी विष्णूची लक्ष्मीपती म्हणून करतो.

कुबेराला देवांचा सावकार म्हणतात, अतीव श्रीमंती आहे त्याच्याकडे असे मानतात पण कुणी त्याची देव म्हणून पूजा नाही करत. ज्ञानाखेरीज फक्त धनाला किंमत नाही.

सरस्वतीबाईंचे भक्त अध्ययन, अध्यापन, लेखन, वाचन, चिंतन, मनन आणि अश्या कार्यांत मग्न आणि वाहून घेतलेले दिसतात. ही कार्ये करतांना जगण्यासाठी लक्ष्मीबाईंचीही मदत लागते हे ही लक्षांत असू देत.

लक्ष्मीबाईंचे भक्त कामकाज, धनवृद्धी, सोने नाणे, घरदार, नोकरी धंदा, कर्ज व्याज, एक्सचेंज रेट, शेयरबाजाराचा चढ उतार आणि अश्या या कार्यांत मग्न आणि वाहून घेतलेले दिसतात. ही कार्ये करतांना सरस्वतीबाईंचीही मदत लागते हे ही लक्षांत असू देत.

वस्तुतः दोघी देवी एकमेकांना पूरक आणि त्यांची कृपा सगळ्यांनाच पाहिजे. एकाच देवीचे भक्त असून कोणी यशस्वी होऊ शकणार नाही.

बहुधा बुद्धिजीवींची संतती बुद्धिजीवी होते आणि धनजीवींची धनजीवी. पण असे असलेच पाहिजे असे मात्र नाही.

आमचे कार्यक्षेत्र डिझाइन आणि डेव्हलपमेंट हे होते आणि त्यांत अध्ययन, अध्यापन, वाचन, चिंतन आणि मनन हेच प्रमुख कार्य होते. नवे इंजिनीयर रुजू झाले की त्यांना पॉलिश करून डिझाइन ड्रॉईंग मध्ये पारंगत करायचे. मग त्यांना निरनिराळ्या विषयांची गोडी लावायची आणि वर्ष दोन वर्षानंतर ते शिकून तरबेज होण्यापर्यंत आले की कामाची गोडी लावायची. हा असायचा प्लॅन.

कॉलेजमधून बाहेर पडलेले लोक पाहिल्यांदा मोठ्ठी डोकी झालेले असतातच. आम्ही सुद्धा होतो तसे. त्यांच्या फुग्यातली हवा बाहेर काढून टाकून त्यांना पुन्हा सरस्वतीपूजक करवायचे काम माझ्याकडे ट्रेनिंग मॅनेजर म्हणून आले होते. मुले सगळी हुशार असायची, अमुक गोष्ट शिकून घ्या म्हटले की आठवड्याभरात शिकून घ्यायची. सरस्वतीबाईंची चांगली भक्त होती ती मुले.

मग वर्षाभरा नंतर ट्रेनिंग संपले आणि कायमची झाली की हीच मुले त्यांच्या पगारावरून चुळबुळ करायला लागायची, त्यांच्या इतर पियर्स बरोबर तुलना करायला लागायची. इथे ते मानसिक द्वंद्व सुरू व्हायचे. आमच्या क्षेत्रांत पगार टाकाऊ नव्हते तरी इतर नवीन लाईन्स पेक्षा थोडेसे कमीच होते. पण आमची लाईन स्थिर, अभ्यासू लोकांच्यासाठी आणि थोड्या प्रमाणांत हुशार पण आळशी लोकांसाठी बेस्ट होती.

बाहेर इतर लाईन्समध्ये एकदा एक वैशिष्ठय शिकले की त्याचा कारखान्यासारखा वापर करून बऱ्यापैकी धन दौलत कमवायची संधी असायची. पण तिथे बुद्धिवान हुशार लोकांना त्याच्या बुद्धिपेक्षा त्यांच्या आऊटपुटला ज्यास्त महत्व असायचे आणि नवे काही शिकायला मिळायच्या संधी फार कमी. आणि तिथे बुद्धीला कोणी महत्व देत नाही फारसे. सगळा जोर काम करण्यावर आणि आपल्या मालकाला पैसे मिळवून देण्यावर.

आमच्या लाईन मध्ये मात्र सतत शिकायला आणि बुद्धीची चमक दाखवायला खूप वाव होता, पेपर्स लिहिणे, लेक्चर्स द्यायला आमंत्रणे, सेमिनार कॉन्फरन्सेस मध्ये भाग याला खूप संधी यायच्या आणि अश्या लोकांचे कौतुक व्हायची शक्यता तर बरीच ज्यास्त होती. एखाद्या विशेष बौद्धिक कामगिरीबद्दल बक्षीस मिळायचे आणि नाव नोटीस बोर्डावर झळकायचे.

मग असे ते लोक दुसरीकडे जाऊ का नको असा सल्ला मागायला आले की त्यांना विचारावेसे वाटायचे की तुम्हाला लक्ष्मीबाई ज्यास्त आवडतात की सरस्वतीबाई?

या दोघी देवींपासून जरासे अंतर सोडून पाहिले आणि विचार केला तर कळते की दोघी वेगळ्या नाहीत आणि एकमेकींना पूरकच आहेत.

जेवढा सरस्वतीपूजक प्राध्यापक पूजनीय आहे तेवढाच यशस्वी लक्ष्मीपूजक कारखानदार आणि उद्योगपती ही आहे. कोणीही ऐकेकट्या देवीचे भक्त नाहीत. तरीसुद्धा...

सरस्वतीबाईंचे भक्त होण्यासाठी लक्ष्मीबाईंचा कृपाहस्त पाहिजेच डोक्यावर आपल्या. नुसते शारीरिक कष्ट करून ज्ञान मिळवायचे दिवस राहिले नाहीत आता.

काही लोकांना वाटते की पैसे खर्च करून काहीही मिळवता येते. येते का खरंच? नुसते पैसे खर्च करून पुस्तकघाण्या, अभ्यासापासून दूर आणि काहीही कुतूहल न दाखविणाऱ्या माणसाला डिग्री विकत घेता येईल पण ज्ञान कसे मिळणार? आणि पैसे टाकून ज्ञान किंवा ज्ञानी विकत घेऊ पाहणाऱ्याला त्या ज्ञानी माणसाचे अंतरंगातले ज्ञान कसे मिळणार? त्यांना त्याचे डोके मिळेल कदाचित पण मन कसे मिळणार?

अभ्यासू ज्ञानी पण अधन प्राध्यापक सर्वत्र पूजिला जातो तसा धनवान पण अज्ञानी पुरुष पूजिला जातो का?

जगांत फार थोडी उदाहरणे मिळतील की जिथे लक्ष्मीबाई आणि सरस्वतीबाई एकत्र येऊन आणि राहून एखाद्याच्या घरी पाणी भरताहेत असे.

श्रीमंत प्रोफेसर सहसा नाही बघायला मिळत, श्रीमंत ऋषी ही नाही दिसणार आणि तसेच विद्वान लक्ष्मीपतीही तसाच विरळाच.

लक्ष्मी आणि सरस्वती या दोन्ही देवी महान. दोघीही आपल्या आपल्या क्षेत्रात प्रगल्भ. दोघींचे भक्त असंख्य आणि दोघींच्या लीला आश्चर्यकारक आणि अफाट.

पण तरीसुद्धा त्यांना एकत्र राहणे फारसे आवडत नाही हेच खरे.

# संमेलनाच्या पूर्वसंध्येला

वालचंद १९७१ च्या संमेलनाची वेळ जवळ आली. आता संमेलन होणार आणि मित्रमंडळी प्रत्यक्ष भेटणार यांत काही शंका राहिली नाही.

दोन वर्षे फक्त व्हाट्सएप वरून एकमेकांशी संपर्क साधल्यावर आणि आपली उत्कंठा अस्मानापर्यंत उंचावल्यानंतर आता उत्सुकता जवळ जवळ तुटे पर्यंत ताणल्या नंतर आता "भेटीलागी जीवा लागलीसे आस" असे झाले आहे.

गेल्या आठवड्यापर्यंत "तू कसा जाणार, तू कसा जाणार" चे प्लॅन शेअर झाले. कुठे रहावे, काय काय करावे याची चर्चा झाली. हे हॉटेल पर्ल आहे तरी कुठे आणि तिथे कसे जाता येईल याचे गूगल मॅप वापरून परीक्षण चालू आहे.

आता तो संमेलनाचा मूड व्यवस्थित सेट झाल्यावर पुन्हा कॉलेजच्या दिवसांची, त्या मेस ची, त्या संध्याकाळच्या हॉटेलांची आणि तिथे काय काय मिळत होते याची चर्चा होणे स्वाभाविक आहे. प्रत्येक हॉस्टेलवाला यातून गेलेला आहे आणि अजून त्या आठवणी काल सारख्या ताज्याच आहेत.

गेले दोन दिवस तर आपली मंडळी यांत पूर्ण बुडून गेली आहेत असे दिसते. त्यावेळचे स्नॅक्स आता मिळतील की नाही ते वेगळे पण त्यावेळचे मेनू मात्र पूर्ण चर्चित झाले आहेत.

a

मंडळी जरा बघा.

आपण चांगले सत्तर वर्षाचे झालो आहोत, आपले लग्न कधीच झाले आहे, मुलेबाळे अगदी मोठी झाली आहेत आणि काही नातवंडेही आता कॉलेज हॉस्टेल च्या उंबरठ्यावर पोचली आहेत हेही विसरत चालले आहोत. पन्नास पंचावन्न वर्षांपूर्वीच्या आठवणीत अगदी बुडून गेलो आहोत हेच आजचे आपले जग झाले आहे.

बघा जरा. फक्त चार पाच वर्षे आपल्या आयुष्यांत किती महत्वाची ठरतात ते. आजही कॉलेज म्हटले की वालचंद कॉलेजच आठवते, पूर्वीची सायन्स कॉलेज आणि ओल्या शाळा थोड्या मागेच पडतात.

आता ते संमेलन होईल तेंव्हा आपले साथीदार ओळखायचे कसे हे एक बघण्यासारखे असेल. नाही म्हटले तरी गेल्या दोन वर्षांत फोनवरून आणि व्हिडीओ कॉल करून थोडा बहुत अदमास घेतलाच आहे. पण प्रत्यक्ष आमने सामने भेटणे हे विशेषच.

एक पाहिले आहे, की फोन वर बोलतांना प्रत्येकाची लकब आहे तशीच आहे, आवाज भले थोडा बदलला असेल पण स्टाईल तशीच. आणि मी

वालचंदचा अशी कॉल केल्यावर ओळख करून दिल्यावर जी काही आपुलकीचा भाव दिसला आहे त्याला तोड नाही.

येत्या चोवीस तारखेला आमने सामने भेटल्यावर पहिल्यांदा काय करायचे ते अजून ठरलेले नाही. फोन वर बोलतांना मित्रभाव होताच पण व्हाट्सएपच्या चर्चा करताना थोडा युद्धाचा भाव ही आला होता. "मेरा घोडा तेरे घोडेसे सफेद ही है" आणि आपले मत दामटून पुढे केलेलेही आहे.

आपले मत, आपले विचार, आपली आवड आपली निवड श्रेष्ठ कशी आणि इतर येडे कसे हेही दाखवून झालेले आहे. आपण ते बरोबर आणि इतर सर्व चूक असेही करून झालेले आहे. एकमेकांना चावणेही झालेले आहे, पण ते दुरून.

आता ज्याला चावलो किंवा ज्याच्याकडून चावून घेतले तो प्रत्यक्ष समोर उभा राहिल्यावर काय करायचे?

काही नाही करायचे. आपला हात पुढे करायचा, शेकहॅण्ड करायचा आणि चावणे विसरून त्याला मस्त एक स्माईल द्यायचे. चावणे काय, हॉस्टेलवाल्याचा स्वभावधर्म आहे. तो कसा जाणार? पण तोच हॉस्टेलवाला

संध्याकाळी ड्रीमलॅन्ड, अशोक किंवा मधुबन मध्ये जायला अगदी आवडत होता आणि लाईन मारायला जातांना आपला साथीदारच होता.

बघूया, आता तेच होते की नाही ते. बहुतेक तेच होणार, तो किंवा ती थोडे वयस्कर झालेले आहेत, त्यांचेही गुडघे गेलेले आहेत आणि ते ही थोडासे ढेपाळलेले असतील, नव्हे आहेतच.

काही लोक आपापल्या बायकांना घेऊन येणार आहेत! बायका त्यांच्या नवऱ्यांना घेऊन येणार की नाही ते माहीत नाही. देव त्यांना, म्हणजे त्या नवऱ्यांना आणि त्या बायकांना नीट सांभाळो! नंतर त्यांनी त्यांची गुपिते उघड झाली की तक्रार करायची नाही आणि आपल्या बायकांना किंवा नवऱ्यांना कसे समजवायचे हे एक मोठेच काम त्यांच्याकडे असेल.

पंचवीस तारखेला आपापले मुखवटे धारण करायचे आहेत. फुल पॅन्ट, फुल शर्ट, टाय असा साहेबी फॉर्मल पोशाख करून व्यवस्थित बसायचे आहे. आपली पावले दिसता कामाची नाहीत. बूट चढवून या असे आग्रहाचे निमंत्रण आलेच आहे. आपल्या सरांचे फॉर्मल सत्कार करायचे आहेत आणि त्यांना फॉर्मल ग्रीटिंग द्यायची आहेत. फॉर्मल प्रश्नांना फॉर्मल उत्तरे द्यायची आहेत.

ज्या वर्गांनी आपल्याला टेन्शन आणले आणि ज्या वर्कशॉपनी आपल्याला मातीत घोसळले त्यांना फॉर्मल नमस्कार करायचा आहे. आता त्या परीक्षेच्या ड्रॉईंगहॉलची भीती राहिली नसेल पण थोडेसे पोटात डुचमळायला लागले ते ती चांगली साइन समजावी. आपण अगदीच दगडी झालेले नाही आहोत हेच सिद्ध होईल.

ज्या हॉस्टेलनी बिनधास्तपणा शिकवला आणि ज्या हॉस्टेलनी आमचे अंगप्रत्यंग आणि अंगविक्षेप पाहिले आहेत त्या हॉस्टेलना फॉर्मल टूर करून फॉर्मल "हाय" करायचे आहे. ज्या मेसमध्ये रागावून पुऱ्यांची फेकाफेक केली होती त्या मेस मध्ये सभ्यपणे बसून सभ्यपणे जेवण करायचे आहे.

का नाही? त्या कॉलेजने आणि हॉस्टेलने हेही शिकवलेच होते की.

पण, "सर पे बुढापा है मगर दिल तो जवां है, देख इधर देख तेरा ध्यान कहाँ है।" हेच दिसणार यात काही शंका नाही.

# पुढचा पार्ट

आपले संमेलन छान झाले. तीस चाळीस बॅच वाले आले संमेलनाला. म्हणजे जवळ जवळ पन्नास टक्के की! आपल्या परीक्षांना पासिंग पर्सेनटेज चाळीस टक्के होते. मग त्या स्टॅंडर्डने बॅच बऱ्यापैकी पास झाली.

डिग्री मिळाल्याची सुवर्ण जयंती झाली. आता पुढे कसे कसे करायचे हा प्लॅन केला पाहिजे. संमेलनाची पूर्वतयारी करताना आपल्या गावातल्या लोकांच्या भेटीगाठी घेतल्या होत्या. त्यांतही उत्साह चांगलाच होता. पण ती पूर्वतयारीच वाटली असेल.

पण मंडळी अगदी तसेच नाही ते. दोन वर्षांनी भेटलेल्या या इंजिनियर्सना आता हे पुढे नेणे आवडणार आहे असेच वाटते. आपापल्या गावात लोक एकमेकांना हा ग्रुप व्हायच्या आधी सुद्धा भेटतच होते. ते बहुतेक चालू राहील.

कोल्हापूरच्या आठ मित्रांनी बगिच्यातली एक मीट केली सुद्धा. त्याच उत्साहाने सगळे भेटले, गप्पा हाणल्या आणि फोटो काढून ग्रुप वर टाकले. ठीक आहे, मागच्यासारखे सुवर्ण जयंतीचे लक्ष्य नाही आता पण पुन्हा एकदा भेटण्याची इच्छा तर दिसतेच आहे.

अजून एक बघा, सुवर्ण जयंतीचा कार्यक्रम इतका मोठा होता की सगळ्या लोकांना इतर सगळ्या लोकांबरोबर वन ऑन वन असे बोलता आले नव्हते. शिवाय आत्ता पर्यंत एखादी व्यक्ती आता कशी दिसते किंवा वागते बोलते हे माहीत नव्हते. आता तरी माहित झाले असेल आणि पुढच्या छोट्या भेटीमध्ये होत राहील. एकमेकांना समजून घेण्याची तयारी झाली असेल.

ग्रुप वरच्या चर्चा ब्लाइंड होत्या. वादविवाद नक्की झाले पण त्या व्यक्ती आमने सामने आल्या नव्हत्या, त्यांचा आजचा स्वभाव, वागणूक कळत नव्हती. तो अडसर आता दूर झाला आहे.

बऱ्याच लोकांनी प्रत्यक्ष भेट घेतल्याने आतापर्यंतचे गैरसमज आणि त्यामुले होणारे विनाकारण वाद आता व्हायचे नाहीत. शुद्ध मनाने एखादा विषय किंवा प्लॅन चर्चेला घेता येऊ शकेल आता.

आपल्या कॉलेजकरता काहीतरी करावे ही इच्छा अजून दिसते आहे. ही वाट काही सोपी नाही, अडथळे असतील, नक्की काय आणि कसे करावे यावर चर्चा होईल आणि कदाचित सर्वसंमत मार्गही निघेल. आणि बहुतेक एकमत व्हायला अडचणी कमी येतील.

a

आपण निरनिराळ्या पद्धतीने काही करू शकतो. आपल्या अनुभवांचा उपयोग करून कॉलेज मधून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांना गाईड करू शकतो. पैसे देणे हाच काही एकुलता एक मार्ग नाही. पदवी उपरांत शिक्षणाची दिशा दाखवू शकतो. इंडस्ट्री डायनॅमिक असतेच व आपणही काही कमी डायनॅमिक नाही. आपणही स्वतःला कसे बदलले ते नवीन ग्रॅज्युएट्सना दाखवू शकतो.

कुणाला शिकविण्यासाठी लागणारा अनुभव आपल्यापाशीही आहे. त्याचा उपयोग करून आता अस्तित्वात नसलेले काहीतरी नवे प्लॅन करून नंतर करून दाखवू शकतो. कॉलेजला आपली गरज अजिबात नाही पण नवीन पदवीधर आपल्या गाईडन्सचा फायदा घेऊ शकतात. कॉलेजच्या संदर्भात एवढे करणे हेही काही कमी नाही.

कोणी म्हणेल की हे सर्व युटोपीयन विचार आहेत आणि अति आदर्शवाद आहे म्हणून. पण करणे आपल्या हाती आहे आणि ते कम्पलसरी नाही आणि म्हणून मोकळ्या मनाने केले जाऊ शकते.

आज आपल्या माजी शिक्षकांकडे बघा. बहुतेक सर्व काहीतरी नवे करण्याच्या प्रयत्नांत आहेत. आपणही तसे करू शकतो.

समजा असले काहीच करायचे नसले तर टाइमपास म्हणून हा ग्रुप जिवंत ठेवू शकतो. पन्नाशी झाली आता साठीचा प्लॅन करू शकतो. अगदीच पडून राहिल्या सारखे वागायचे काहीच कारण दिसत नाही.

आपल्या ह्या सुवर्ण जयंतीच्या कार्यक्रमांत वावरतांना मलातरी म्हाताऱ्यासारखे वाटले नाही. उलट वय कमी होऊन पुन्हा विशीत गेल्यासारखे वाटले. कारण उघड आहे, आमचे उत्साही शिक्षक. त्यांच्या पुढे आम्ही म्हातारे झालो असे वाटणेच अशक्य होते.

हाच धागा पुढे धरून आपण वाटचाल करावी हेच बेस्ट. ग्रुप जिवंत कसा राहील हे बघूया. आपल्या ओळखी अजून दाट करूया. आपण एकमेकांना अजून जवळून कसे समजून घेता येईल ते पाहूया. प्रत्यक्ष भेटींमुळे एकमेकांबद्दलचे गैरसमज दूर झाले असतील. आता अजून दृढ मैत्रीसंबंध होतील आणि आपण ज्याला सिनर्जी किंवा सिंक्रोनिझम म्हणतात तसे आपली शक्ती वायफळ चर्चा आणि वादविवादात न घालवता तिचे एकीकरण करून विसंवादाला पूर्णविराम देऊ.

आत्ताच माझ्या डोळ्यासमोर आपल्या ग्रॅज्युएशनचा हीरक महोत्सव दिसतो आहे. त्यावेळी काय काय करता येईल त्याची स्वप्ने आता मला

a

पडायला लागणार आहेत. मी तरी त्यावेळी सुपर सिनियर झालेलो असणार आहे. शरीर कदाचित नसेल पण मन तल्लख असणारच आहे.

मग नवीन काहीतरी करायची स्वप्ने का न बघावीत?

भाई, समय चलते रहता है। हम भी चलते रहेंगे। यहां रुकना किसको है? आगे बढ़तेही रहेंगे।

a

# अग्रणी नदीची "शैक्षणिक सहल"

श्रीरंग कौलगी, बी ई मेक, वालचंद १९७१ बॅच

गेल्या वर्षांपासून आपल्या विलास चौथईंनी केलेल्या अग्रणी नदीच्या पुनरुज्जीवनाचे वर्णन वाचल्यापासून ते पहायलाच पाहिजे अश्या उत्सुकतेने आम्ही अगदी भारावून गेलो होतो.

आता चान्स मिळाला. वालचंद १९७१च्या बॅचचा सुवर्ण जयंती उत्सव साजरा करायचा प्लॅन झाला आणि सांगलीला जायचाही. आता हे साधलेच पाहिजे म्हणून चौथाईना अगदी भंडावून सोडले होते आणि त्यांनीही मोठ्या दिलाने ते कबूल केले होते.

मार्चच्या २२ तारखेला सांगलीत ते सुद्धा विश्रामबागला दाखल झाल्यावर मागे अनेक वेळा केलेल्या आग्रही मागणीनुसार चौथाईंनी २३ तारखेला तिथे न्यायचे कबूल केले आणि प्लॅन ठरला. राघवेंद्र राव, एस एम कुलकर्णी, मी आणि चौथाई तर होतोच. अशोक केडगेही तयार होते. अशोक केडगेंची गाडी घेऊन जावे असे ठरले.

मग २३ मार्चला दुपारी दोन वाजता आम्ही पाचजण विश्रामबागेहून निघालो. कारने जाताना विश्रामबाग मिरज परिसराचीही आपोआप पहाणी

झाली. मिरज पंढरपूर रस्त्याने जाऊन कवठे महांकाळ पर्यंत मुख्य रस्त्याने आणि मग नेहमीच्या रस्त्याने जायचे होते. चौथाई सारखे आमचे साथीदार गाईड असतांना काय प्रॉब्लेम? त्यांच्या ओळखी असंख्य. त्याने तिथले स्थानिक लोक आमचे गाईड होतील याची व्यवस्था केलीच होती.

जाताजाता कोकणातून नागपूरला जाणारा नवा हायवे लागला. सुंदर रुंद रस्ता, खड्डे नाहीत. कवठे महांकाळ पर्यंत अगदी सुलभ आणि फास्ट आलो.

प्रत्यक्ष अग्रणी नदी नव्हे तर तिच्या उपनद्यांवर बांधलेले बंधारे पहायचे होते. जवळ गेल्यावर गाडी कुठेतरी उभी करून थोडेसे अंतर चालत जाऊन प्रत्यक्ष साईट वर जायचे होते.

पहिला बंधारा बघितल्यावर त्याचे डिटेल्स चौथाईंनी आम्हाला समजावून सांगितले. नदीचे रुंदीकरण करून काढलेला माल किनाऱ्यावर रचून किनारे उंच केलेले आहेत म्हणजे पावसाळ्यांत पूर आल्यावर पाणी आजूबाजूच्या शेतात पसरणार नाही याची व्यवस्था केली आहे. वरच्या बंधाऱ्याच्या पायाच्या लेव्हलला खालच्या बंधाऱ्यांची टॉप लेव्हल यावी असा प्लॅन केला आहे. त्यामुळे नदीत सलग पाणी रहाते.

पहिल्या बंधाऱ्याला डॉ. राजेंद्रसिंघ राणा यांचे मार्गदर्शन होते. कुठल्याही कामाची चतुःसूत्री, संत, राज, जन आणि महाजन असली की कामे पूर्णत्वाला येतात. संत म्हणजे इथे दूरदृष्टी, व्हिजन, राज म्हणजे शासन ते तर आपल्या बरोबर पाहिजेच, महाजन म्हणजे सपोर्ट करणारी मंडळी आणि जन म्हणजे जनता जी कामाचे फळ चाखणार आहे. इथे हे सर्व एकत्र आलेले दिसतात.

बंधारा बांधतांना शासन, स्थानिक लोक, आणि स्वतः चौथाई सल्लागार आणि गाईड म्हणून अशी टीम काम करीत असे. बंधारातल्या पाण्यांत पाईप टाकून पाणी उचलायचे नाही अशी कायदेशीर अटच होती या प्रोजेक्टमध्ये. तसा बॉण्डच घेतला होता स्थानिक लोकांकडून. पाणी सगळयांचे असेल अशी योजना होती.



बंधाऱ्यांचे बांधकाम करतांना फाउंडेशन आणि बंधारा याची क्वालिटी उत्कृष्ट ठेवण्या बद्दल विशेष लक्ष दिलेच होते. कारण अजून या प्रोजेक्टमध्ये स्थानिक लोक आणि शासन यांचा कॉन्फिडन्स मिळविणे आणि वाढवणे

अतिशय आवश्यक गोष्ट होती. फाउंडेशनचे बांधकाम तपासताना शासकीय क्वालिटी कंट्रोलचे अधिकारी हजर असत आणि त्यांनी काम उत्कृष्ट असल्याची पावती कशी दिली ते चौथाईंनी सांगितले.



बहुधा अश्या प्रकारच्या प्रोजेक्टमध्ये थोडासा अविश्वास स्थानिकच काय पण शासनही कधीकधी दाखवते. पण पहिली पहिली कामे उत्कृष्ट झाली. कोरडी ठाक अग्रणी नदी पहिल्या पावसाळ्यानंतर पाणी धरून ठेवू लागली. त्यामुळे वॉटर टेबल वर आले आणि आजूबाजूच्या विहिरींना पाणी दिसू लागले.



a

एकदा पाणी दिसायला लागल्यानंतर विश्वास वाढला आणि अग्रणी नदीवर बंधारे होऊ लागले. कीर्ती वाढू लागली. आता स्थानिक लोक आपणहून आपल्या गावाजवळ बंधारा व्हावा अशी मागणी करू लागले आणि त्यासाठी श्रमदान आणि काम करायची ही तयारी दाखवू लागले.



आता अग्रणी नदीच्या उपनद्यांवरही असेच बंधारे बांधले आहेत. आम्ही पाहिलेले तीन त्यांच्या पैकीच. एकाचे नाव कोकळे आणि नदीचे नाव महांकाली. दुसरे दोन ही याच उपनदी वरचे. आठवणीतल्या काळांत दुष्काळी आणि म्हणून दुर्लक्षित अश्या या भागात आता हिरवळ दिसायला लागली आहे. विहिरींना पाणी रहायला लागले आहे. त्यामुळे इकडचे पीकपाणी आता वेगळे होईल असेही चित्र दिसते आहे.

a



गावाजवळच्या बंधाऱ्याला त्या गावाचे किंवा वस्तीचे नाव ठेवायचे, उदा. कोकळे पवार वस्ती, आणि त्या गावाने किंवा वस्तीने श्रमदानाचा सहभाग म्हणून कामाचा काही भाग, उदा. पाया मिळेपर्यंत खोदकाम, वाळू खडी स्वच्छ करून उपलब्ध करणे, काँक्रिट साठी आणि क्यूरिंग साठी पाणी उपलब्ध करायचे, असा आपला कामाचा वाटा उचलायचा अशी सिस्टिम रुळली.



a

गावातले सुशिक्षित तरुण भाग घेत होते. आमच्या बरोबर काहीजण येऊन त्यांच्या जवळच्या बंधाऱ्यांची माहिती अगदी मनापासून देत होते. असे तीन बंधारे वानगीदाखल पाहिले. दोन्ही ठिकाणी मार्चच्या शेवटच्या आठवड्यांत पाणी किती होते ते छायाचित्रांत दिसतेच आहे.



लोकसहभाग वाढल्यामुळे आणि विशेषतः लोकांचा आपल्या जवळ असाच बंधारा पाहिजे असा आग्रह वाढल्यानंतर अशी प्रोजेक्टस अजून यशस्वी होतील यांत काय संशय?

बंधारा बांधून झाल्यावर शेजारच्या पट्ट्यात आंब्याची आणि इतर झाडे लावून हा प्रदेश कायमस्वरूपी पाणी धरून राहील अशीही योजना राबवली आहे.

a

बंधाऱ्यावर उभे राहून पाणी आणि हिरवळ बघताना डोळे निवतात आणि मन अगदी प्रसन्न होते असे अनुभवले आहे या शैक्षणिक सहलीत.

बंधाऱ्यांबरोबर आजूबाजूच्या बोडक्या डोंगरांवर हिरवळ व्हावी या हेतूने केलेला मियावाकी जंगलाचा प्रयोग पहायचे भाग्य आम्हाला लाभले. एका डोंगराच्या उतारावर चर खोदून पावसाचे पाणी तिथेच जिरेल अशी व्यवस्था केली आहे.

कवठे महांकाळ तालुक्यातले नांगोळे हे ते गाव. तिथे "कंन्टिन्युअस कंटूर ट्रेंच", सलग समतल चर, करून पाणी तिथेच जिरेल असा प्रयत्न केला आहे.



डोंगरावर दोन तीन ठिकाणी मियावाकी पद्धतीने रोपे लावली आहेत. ते जवळून पहाता आले. आता दीड वर्ष झाले आहे. रोपे लावताना मियावाकी पद्धतीने खोल चर खोदून त्यांत मल्चिंग म्हणून उपलब्ध असलेला उसाचा पालापाचोळा, शेतीत वाया जाणाऱ्या वनस्पती वापरून मल्चिंग केले आहे.



पाण्यासाठी ड्रिप इरिगेशन करून पाणी ज्यास्तीत ज्यास्त कसे उपयोगी पडेल ते पाहिले आहे. काही बाजूच्या रोपांना बाटली भरून पाणी पाजण्याची व्यवस्था केली आहे. आमच्या बरोबर आलेला स्थानिक तरुण वेळोवेळी येऊन पाणी बरोबर येते आहे ना, बाटली भरलेली आहे ना याची पहाणी करतो. असे लक्ष ठेवल्याने नवीन रोपांची आबाळ होत नाही.



अजून झाडे पूर्ण वाढायची आहेत पण आताच दुरून डोंगरावर हिरवळ दिसते आहे.



झाडे पूर्ण वाढल्यावर नक्कीच हा डोंगर हिरवागार दिसणार यांत काही शंका नाही. लोकांचा सहभाग आणि उत्साहच अशी प्रोजेक्ट्स करायला कारणीभूत होतो.

आमची ही सहल अगदी सफल झाली असे म्हणायला पाहीजे. येत्या काळांत हा दुष्काळी म्हणून प्रसिद्ध असलेला भाग सुजल सुफल होईल यात काहीच शंका नाही.

संध्याकाळ होईपर्यंत डोळे निवले होते, मन प्रसन्न झाले होते, गाडी दमली होती, पाय बोलत होते आणि पोटात कावळे कावकाव करत होते. मग काय?

येतांना भजी कुठे मिळतील याचा दहा डोळे शोध घेत होते. शेवटी भजी नाही तरी वडापावची गाडी दिसली. अर्ध्या तासाचा मुक्काम ठोकला तिथेच.

वडापाव खाऊन आत्मा आणि चहा पिऊन जीव संतुष्ट झाल्यावर निघालो परत यायला.



संध्याकाळी आठ साडेआठ पर्यंत आलो परत विश्रामबागला.

आमच्या या सहलीत विलास चौथाई आणि अशोक केडगे यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या उत्साहामुळेच ही ट्रिप शक्य झाली.

आपल्या इतर वर्गमित्रांना मी आग्रहाची विनंती करीन तर शक्य होईल तेंव्हा त्यांनी ही प्रोजेक्ट्स जरूर पहावीत.

# राम

रामाचा जन्म झाला आजच्या दिवशी. रामायणाचे पुस्तक वाचले नसेल अशी व्यक्ती विरळाच असेल. दशरथ राजाला आणि त्याच्या चार राण्यांना देवांच्या आणि ऋषींच्या आशीर्वादाने चार पुत्र झाले. राम ज्येष्ठ. मागोमाग लक्ष्मण आणि शत्रुघ्न आणि नंतर भरत. एकाच वयाची चार भावंडे काही दिवसांचेच त्यांच्या जन्मांत अंतर. एकमेकांना धरून रहाणारी.

रामायणाचे पुस्तक खंड आहेत, विदर्भ मराठवाडा बुक कंपनीचे. फार छान भाषांतर केलेले. पडले आमच्या हातात. मग केली पारायणे. त्यांत रामाच्या जन्माच्या वेळचे ग्रहदर्शन दिले आहे. रामाची जन्मरास कर्क. मग लक्ष्मण आणि शत्रुघ्नाची सिंह असणार एक दोन दिवसानंतर. भरताची कन्या किंवा तूळ. पण फक्त राम आणि लक्ष्मण यांच्याच जन्मवेळांचे सखोल वर्णन केले आहे. आणि दोघांचा स्वभाव त्यांच्या जन्मराशींना अनुसरून असल्याचे दिसते. राम शांत, पेशंट, लौकर न रागावणारा आणि लक्ष्मण अधीर, पटकन चिडणारा आणि थोडा उतावळा. स्वभाव वर्णन जुळते इथे.

रामायण हे उत्तम साहित्य तर आहेच पण विचार करायला लावेल असे अनेक प्रसंग त्यांत वर्णिले आहेत. राम आणि लक्ष्मण ज्यास्त जवळचे झाले. भरत आपल्या आजोळी दूर केकय देशांत बऱ्याच वेळा रहात असे. शत्रुघ्नाचे

वर्णन रामायणात फारसे दिसून येत नाही. पण चारही राजपुत्र लोकांचे आणि मातापित्यांचे अगदी लाडके होते.

रामाचे बालहट्ट, त्याचे बालपणीचे वर्णन " ठुमक चलत रामचंद्र बाजत पैंजनिया" या सूरदासाच्या गीतात किती गोडपणे केलेले आहे! रामाचे धैर्य, त्यांची कुशाग्र बुद्धी आणि त्याचा अचलपणा श्रेष्ठ ऋषी विश्वामित्रांनी ओळखला आणि त्यालाच आपल्या पंखाखाली घेऊन शिक्षणसमृद्ध करायचे ठरविले. लक्ष्मण रामाखेरीज वेगळा राहूच शकत नव्हता तेंव्हा तोही या ज्ञानयज्ञांत सामील झाला सर्व शस्त्रे, शास्त्रे आणि इतर ज्ञान यांत हे दोन बंधू पारंगत झाले.

ऋषी मुनींचा दक्षिणेकडे जाण्याचा प्रयत्न चालूच होता. युध्दाने नाही तर बुद्धीने त्यांनी हळूहळू तशी प्रगती केलीच होती. अगस्त्यमुनी खूप अगोदर दक्षिणेला पोहोचले होते. तिथला समुद्र रिकामा करायचे कार्य त्यांनी केलेच होते.

उत्तरेला ऋषी मुनी आपली कर्मकांडे करण्यात गुंतले होते. त्यांचे यज्ञ आणि वैकल्ये सुरूच होती.

आदिवासी जनतेला यांचे कार्यक्रम समजायचे नाहीत आणि त्यामुळे त्या कार्यक्रमांत विघ्ने आणणे हाच त्यांचा कार्यक्रम झाला होता. त्याला विरोध म्हणून रामलक्ष्मण बरोबर घेऊन विश्वामित्र ऋषी आपला कार्यभाग साधत होते.

नियम आणि धर्माचा अर्थ त्या त्या परिस्थितीत लावायचा हेही शिक्षण त्यांनी त्या बंधूंना दिले होते. त्यामुळे त्राटिकेसारख्या स्त्रीचा घात कसा आणि का करावा हेही विश्वामित्रांनी द्विधा मनोवृत्तीत असलेल्या रामलक्ष्मणाना समजावून सांगितले आणि स्त्रीवध करवला. हे शिक्षण अश्या गुरूकडून अश्या शिष्यांनी घेतले तर ते सुविद्य आणि सुयोग्य रीतीने उपयोग करणारे होतील यांत काही आश्चर्य नाही.

हे शिक्षण सुरू असताना विश्वामित्रांनी विशेष शस्त्रास्त्रे यांचे सखोल ज्ञान दिलेच होते. शिवधनुष्याचे गूढ गुपित त्या राजपुत्रांना माहीत झालेच असणार होते. मग ते मोडलेले धनुष्य बरोबर कसे हाताळावे ते इतर राजांना माहीत नसतां या राजपुत्रांना मात्र त्याचे इंगित ज्ञात होते. धनुर्भंग झाला आणि राजपुत्रांची राजकन्यांबरोबर लग्ने झाली.

त्यावेळच्या प्रथे प्रमाणे ऋषी मुनी जरी अरण्यांत रहात होते तरी राजांशी त्यांचा संवाद चांगला होता आणि काय होते आहे आणि काय करायला पाहीजे याचेही चर्चासत्र होत होते. दक्षिणेला प्रगती करण्यासाठी फक्त बुद्धिबळ पुरेसे

नव्हते पण बाहूबळाची निकडीची गरज होती. ते कोण देणार? राजे आणि त्यांचे राजपुत्र. दशरथाचा राम थोड्या उतारवयांत झालेला पुत्र. त्याला अश्या कामासाठी सोडणे त्याच्या जीवावर आलेच होते. रामासारखा विश्वामित्रांचा शिष्य योग्य होताच आणि त्याची शक्ती, बुद्धी आणि विचार क्षमता या कार्यासाठी अगदी बरोबर होता. पण वृद्ध दशरथाला पुत्र मोहातून सोडवून कसे राजी करायचे हाही प्रश्न होताच.

कदाचित याच कारणाने ते भरतकांड झाले असेल असेही विचार रामायण वाचतांना मनांत येतात. सगळे असे विचार त्यांत प्रकट केलेले नाहीत पण अंदाज करता येतो. असो. जे दिसते रामायणाच्या कथेत त्याप्रमाणे राम चौदा वर्षे वनात जायला तयार झाला, सीताही तयार झाली, लक्ष्मण वेगळा राहणार नव्हताच. तिघे जायला तयार झाले. भरत आणि शत्रुघ्नाचा काय विचार होता हे कुठेच नोंदलेले दिसत नाही. पितृनिधनानंतर भरताला सगळे समजल्यावर त्याने त्याची प्रतिक्रिया दाखवली. पण नंतर रामाची आणि त्याची भेट झाल्यानंतर रामाने नीट समजावले असेल आणि मग तो रामाच्या नावाने राजकार्य करायला तयार झाला असेल. त्यावरून मुख्य कार्य काय आणि त्यासाठी काय सोडावे हे त्या बंधूंना स्पष्ट असावे असे मानता येईल.

एकदा दक्षिणेला जायचे ठरवल्यावर मग रामाची प्रगती भेटलेल्या ऋषी मुनींच्या सल्ल्याने होत राहिली. विंध्य पर्वताच्या दक्षिणेला येऊन पंचवटीत

मोठा मुक्काम केला त्यांनी. इथेच खरेतर ते कार्य संपले असते. दक्षिणेचा मार्ग दाखवून दिला होता, शिरकाव केला होता. विरोध करणाऱ्या आदिवासींना मागे लोटले होते. पूर्वकाळांत होऊन गेलेल्या घटना पुन्हा जाग्या झाल्या नसत्या तर रामायण इथेच थांबले असते. पण तसे झाले नाही.

रावण लंकेचा आणि पर्यायाने दक्षिणेचा राजा होता. त्याला रामाने आपल्या खर आणि दूषण यांचा फक्त तीन तासांत केलेला संहार आश्चर्यचकित करून गेला असेल. आपल्या राज्यावरचे असे आक्रमण कोणता राजा सहन करील? शिवाय त्याच्या बहिणीचा धिक्कार करून तिला विरुप केल्याची सल असेलच त्याला. आपले नियम लावून आदिवासींच्या नियमांचा भंग केलेला हा राम शत्रूच झाला होता रावणाला. त्याचे काय करावे हे मात्र उमगले नव्हते त्याला. त्याचे पत्नीहरण करून त्याला अपमानित आणि खजील करायचे असा विचार रावणाने केला असेल?

रावणाचा बंधू मारीच. त्याने रामाच्या बाणांचा आणि अस्त्रांचा प्रसाद घेतला होता आणि मग विरक्त होऊन तो पश्चिम तटावर योगसाधना करत बसलेला होता. रावणाला त्याने खूप समजावले पण आता रावण हट्टाला पेटला होता. मग ते सीताकांड, लंकाकांड आणि रावणवधकांड झाले. विभीषणाने रावणाला खूप समजावून आणि आपल्या आणि त्यांच्या नियमातील फरक

जाणवून देऊनही रावणाने त्याचे मानले नाही आणि आपल्या मतावर ठाम राहिला. विभीषण तटस्थ न राहता रामाला जाऊन मिळाला.

हे राजकारण किती बरोबर आणि किती चुकीचे हा वादविवाद आपण करणार नाही. इथे मतमतांतरे खूप असतील आणि चर्चा फारच हिंसक होऊ शकते.

रामाने रावणाचा वध केला, सीता सोडवली, तिचे चारित्र्य तपासून पाहिले, अयोध्येला गेला, राजा झाला आणि राज्य करू लागला. राम कितीही शुद्ध अंतःकरणाचा असला तरी त्याची प्रजा नव्हती तशी. सीतात्याग रामाने स्वहस्ते नाही केला पण लक्ष्मणाला हे अवघड काम दिले. नंतर तिचे पुत्र मात्र आपले मानून स्वीकारले. मग त्यावेळी लोक काय म्हणाले याचा उल्लेख कुठेच वाचता येत नाही.

सीता आपली आपले आयुष्य जगून पृथ्वीत मिळून गेली. राम आपल्या बंधू लक्ष्मणाबरोबर जीवनकार्य संपवून शरयू नदीशी समरूप झाला. रामायण संपले इथे.

रामाचे अयोध्येला परत आल्यावरचे कार्य फारसे उत्कटपणे दिसून येत नाही. रामाचे सगळे मोठेपण त्याच्या दक्षिणमार्ग प्रचलित आणि प्रशस्त

करण्याच्या आणि दक्षिणेतल्या राजांचे अस्तित्व नाहीसे करण्यांतच दिसून येते. विभीषण लंकेचा राजा झाला तसाच सुग्रीवही पण दोघे रामाचे आधीनच राहिले.

आर्यसंस्कृतीचा दक्षिण प्रवेश अजून प्रशस्त झाला असे म्हणता येईल.

अर्थात हे सर्व विवरण ऐकीवच आहे. नंतरच्या कवी आणि कथाकारांनी आपले विचार घुसवलेच असतील या कथानकात. तसे म्हटले तर बहुधा आपण डोळे मिटून विश्वास ठेवतो अश्या कथांवर.

रामाचा दक्षिणप्रवेश झाला नसता तर काय झाले असते? कोणी दुसरा राजा पराक्रम गाजवून आला असता आणि जिंकली असती त्याने दक्षिण दिशा. पण नाही झाले ना असे?

म्हणून राम आपला लाडका देव झाला. आणि देवांचे जन्मोत्सव आपण उत्साहाने साजरे करतो. त्यांची आठवण आपल्या मनात कायम रहाते.

# बस नंबर ग्यारह

मैंने चलना शुरू किया तब मेरी उम्र लगभग एक साल की थी। तबसे अब तक चलता आया हूँ। पहले तीन साल कोई अपने पैरपर चलता है क्या? माँ या पिताजीकी गोदपे सवार ही चलते हैं। लेकिन मेरी बहन मुझसे केवल दो साल छोटी थी तो मैंने मेरा वो हक छोड़ दिया था। ऐसा नही की मैं अपने पैरपर दो सालकी उम्र से ही चलता आया हूँ। लेकिन जबसे याद बस गयी मनमें तबसे, पांच छह सालकी उमरसे, मैंने अपनी माँ या पिताजीको कष्ट थोड़ा कमही दिया होगा। मैंने कुछ बढ़ा चढ़ाके कहा हो तो वे मुझे बड़े दिलसे क्षमाही करेंगे।

सात आठ की उमरसे सब जगह पैदल जानाही ठीक था। वैसे कोई जगह बहुत दूर नही थी। अमदावादमें मेरी इस्कूल थोड़ी दूर थी और वहां बससे जाते थे। लेकिन मेरी इस्कूलसे मेरी माँ की इस्कूल नजदीक थी। तो वहां चलकेही जाते थे।

मुंबईमें आनेके बाद मेरी शाला दस बीस मिनट की दूरीपर थी, पैदल जाते हुए। तो उस शालामें चलकेही जाते थे। पाँचवी कक्षा से ग्यारहवी कक्षा तक शाला गिरगावमें थी। थोड़ी दूर। आठवी कक्षासे बस का पीछा छोड़ दिया और अपनी ग्यारह नंबरकी बस, अर्थात अपने चरण कमल का उपयोग करना शुरू किया। एक तो बसके लिए स्टॉप पर रुकना बच गया और अपने ढंगसे देखते

फिरते चलना बहुत भा गया। उपरसे बस की टिकट के पैसे बच गए। और चिजोंपर खर्च करनेके लिए।

वैसे चलती का नाम "ग्यारह नंबरकी बस" हो ये पहले नही सुना था। बहुत साल बाद किसीने ये समझाया। क्यों न हो, इस बस तो कोई टिकट नही लगता, जब चाहो रुकती है और जब चाहो चलती है। मुंबईमें साइंस कॉलेज घरसे काफी दूर था और वहां अपनी ग्यारह नंबरकी बस का जाना थोड़ा कठिन था, तो वो दो साल छोड़ देंगे।

इंजीनियर बननेके लिए सांगली पहुचा तो रहना होस्टल में था और कॉलेज पांच मिनट की दूरीपर। तो वहां चलना ही ठीक था। हमारे पैर तो ताक़दवर होते चले जा रहे थे और चलनेकी मनीषा भी थी। तो चलते चलते दस बारह किलोमीटर आरामसे जाते थे हम लोग।

कोई कहे कि चलना क्यों जो बस, ट्रेन, रिक्शा या साइकिल साथ हो? लेकिन चलने जैसा अच्छा कोई दूसरा व्यायाम नही। केवल दो तीन किलोमीटर चलनेसे जो कैलोरी व्यय होती है वो एक घंटा वजन उठानेसे नही होती ये हमने आजकल बहुत बार सुना है। तीन चार किलोमीटर की त्रिज्या में चलना केवल संभव ही नही पर बहुत ही गुणकारक होता है। उपरसे ये ऐरोबिक व्यायाम है, शरीरको बहुत उपकारक है।

a

मेरे जैसा पौने दो मीटर ऊंचा व्यक्ति छह किलोमीटर हर घंटेमें चल सकता है। हाँ, ये हर व्यक्ति, उसकी तबियत और उसकी इच्छा पर निर्भर करता है। एक कदम लगभग एक मीटर का हो और वो व्यक्ति एक मिनट में सौ कदम चले तो सौ मीटर हर मिनट में काट लेगा। अर्थात हर कोई यह गति कायम नही रख सकता। थोड़ा एडजस्ट करके पांच किलोमीटर तो चल ही सकता है।

अपनी बिल्डिंग को चक्कर मारते चलना बहुत लोग पसंद करते हैं, लेकिन मेरे अनुभवसे खुले रास्तेपर चलना ज्यादा श्रेयस्कर है क्योंकि गोल गोल चक्कर लगानेसे आंखे ओर मन थक जाते है, यह खुले रास्तेपर नही होता। वहां बदलते दृश्य अपनी आंखें और मन दोनोंको फ्रेश रखते हैं।

कोई प्रोब्लेम हो और विचार करनेकी जरूरत पड़े तो पैदल चलते विचार बहुत सहज किया जा सकता है। मैंने सुना पढ़ा है कि कितनेही लोगोंको चलते चलते नई कल्पनाएं सूझी हैं। चलने की गति और विचार करनेकी गति मिलजुल जाती है और विचारचक्र अधिक फलदायी होता है।

अब तो सत्तर के पार बूढ़े हो गये। अब चलना जितना चाहे उतना कर तो नही सकते। लेकिन पहलेकी आदत अभी गयी नही। आजभी तीन चार किलोमीटर दूर जाना हो तो चलकेही जानेको मन करता है। थोडासा संभलके चलना पड़ता है। लेकिन दूसरोंको सलाह तो जरूर दे सकते है। अपने सर पर सफेद बाल जो रहे अब।

तो भाइयों और बहनों, जीवन चलनेका नाम, चलते रहो सुबहो शाम। यही बेहतर है।

# "रूळ"लेल्या वाटा

काही काही वेळा वाटते की आपण वयाने वाढलो पण मनाने नाहीच. ज्या आवडी नवव्या दहाव्या वर्षी होत्या त्या आजही आहेत आणि तेवढ्याच इंटेन्स आहेत. खरे म्हणजे आपले शिक्षण झाले आहे, नोकरीधंदा झाला आहे, लग्न झाले आहे, मुलेबाळे झाली आहेत, त्यांनाही मुलेबाळे झाली आहेत, रिटायर होऊनही चांगली तेरा चौदा वर्षे झाली आहेत मग आता मोठ्या म्हाताऱ्या प्रमाणे रहायला आणि वागायला पाहिजे.

पण जमत नाही आतासुध्दा.

आता हेच बघा ना, लहानपणी, म्हणजे नऊ एक वर्षाचा असतांना ट्रॅम मधून हिंडायची संवय लागली. ट्रॅम म्हणजे रूळगाडीच. फक्त रस्त्यावरून अंथरलेल्या रुळांवरून चालणारी. पण ती जी काही घुसली मनांत घट्ट की अजून बाहेर जात नाही. तिची मोठी बहीण रेल्वे तशीच. ती ही या ट्रॅम सारखीच तिथेच घट्ट घर करून बसली आहे. नवव्या वर्षी ट्रॅम चे रूळ घुसले मनांत, त्यांच्या त्या क्रॉसिंग आणि सांध्यांसकट, ते काय आम्हाला सोडून जात नाहीत.

सकाळची शाळा झाली, घरी आलो, जेवण वगैरे झाले की आई झोपायची आणि आम्ही बाहेरच्या खोलीमध्ये ट्रॅमचे रूळ आखायचे. दोन चिमटीत दोन

टोके चपटी केलेल्या दोन मऊ पेन्सिली धरायच्या. दोन्ही अंगठे जुळवायचे की ट्रॅमच्या रुळांची गेज तयार व्हायची. मग मागे मागे सरकत ट्रॅम चा रूट काढायचा. कधी दोन तीन सुद्धा. तेही सांधे क्रॉसिंग सकट. माझी शाळेची बॅग म्हणजे एक बॉक्स होती. ती आमची डबल डेकर ट्रॅम. मग दुपारभर ट्रॅम ट्रॅम खेळत बसायचे.

त्याचवेळी तबल्याच्या क्लासला जायचे असायचे संध्याकाळी. तिथे जाताना रेल्वेचा पूल लागायचा. त्याच्या कोपऱ्यात उभे राहून खालून जाणाऱ्या रेल्वे गाड्या बघत बसायचे. पण ते क्लास मधून परत येताना कारण जाताना वेळेवर जायचे असायचे ना. एकदा गाड्या बघत उभे राहिले की वेळेची शुद्ध नसायची. एकदा तर माझी आई अजून कसा आला नाही म्हणून शोधायला बाहेर पडली होती. बहीण तिच्या नाचाच्या क्लासनंतर कधीच घरी पोचली होती.

हे रेल्वेचे खूळ तेंव्हा जे लागले ते आजतागायत काही गेले नाही. रेल्वेने जाताना खिडकीची जागाच पाहिजे, हेही खूळ अजून जात नाही. पुणे मुंबई रेल्वे प्रवास तसा कमीच केला पण जेव्हा केला तेंव्हा खिडकीत बसायची जागा नाही मिळाली तर खिडकीत उभे राहून मात्र केला. काही पाय दुखले नाहीत की कंटाळा आला नाही. पुणे मिरज रेल्वेचा प्रवास खूपच चित्तवेधक आहे कारण

ही रेल्वे सारखी वळणे घेत चढत उतरत जाते त्यामुळे बाहेरचे दृश्य कधीच कंटाळवाणे होत नाही.

रेल्वे इंजिनियरिंग नावाचा विषय मेकॅनिकलला कधीच नव्हता पण आम्ही रंगवालांचे रेल्वे इंजिनियरिंगचे पुस्तक संग्रही ठेवले होते आत्ता आत्ता पर्यंत. अजूनही वाचायला दुसरे काही सुचले नाही की रेल्वेची माहिती सर्च करतो, दहा पंधरा साईट्स मिळतात, दोन चार दिवस मस्त जातात.

सांगली ते मिरज ब्रॉडगेजचे काम सुरू असताना नेहमी जाऊन "पहाणी" करत असू आम्ही दोन तीन हॉस्टेलवाले. आमच्या सारखीच इतरांना गोडी लावली आम्ही या विषयांत. रूळ कसे घालतात, सांधे कसे बनवतात, सिग्नलकसे चालतात हे आमचे जिव्हाळयाचे विषय.

रेल्वे जगभर सगळीकडे आहे. मग ते जंगलातून लाकूड बाहेर काढण्यासाठी असो की पॅसेंजर दीडशे दोनशे किलोमीटर स्पीडने इकडून तिकडे न्यायचे असोत. खरे तर रेल्वे किती नाजूक असते, रुळांना जरा काही झाले की झालीच डिरेलमेंट. आणि वाट एकदम फिक्स्ड, इकडे तिकडे जायला अजिबात वाव नाही. जिथे रूळ जातील तिथेच जाऊ शकणार. एवढी बंधने असूनही रेल्वेच्या वाहतुकीला पर्याय नाही असेच म्हणावे लागेल. जड माल वाहतूक

एकतर रेल्वेने किंवा बोटीनेच करता येते. माल वाहतूक असो की पॅसेंजर वाहतूक, खर्च सगळ्यांत कमी रेल्वेलाच येतो.

पण पहिला खर्चही रेल्वेलाच ज्यास्त येतो. बांधणी करायला जागा, सर्व्हे, मातीकाम आणि मग रूळ अंथरणे. मग सिग्नल वगैरे, स्टेशने, विजेची रेल्वे असेल तर विद्युतीकरण अशी कामे भरपूर असतात. खूप कॅपिटल इंटेनसिव्ह आहे ही सोय. तरीही एकदा चालू झाली की तिचे फायदे दिसून येतात.

आमच्या गावावरून रेल्वे गेली पाहीजे पण जमीन मात्र आम्ही देणार नाही अशी मागणी पाहिली की काय म्हणावे ते कळत नाही.

भारतात रेल्वे १८५३ मध्ये सुरू झाली म्हणजे पहिल्या स्वातंत्र्य युद्धाच्या अगोदर. पण एकदा ब्रिटिशांनी टाकून दिलेल्या लायनी आम्ही शंभर वर्षे वापरल्या त्यांत फारशी भरही न घालता. अगदी इंजिनियरिंग शिकायला गेलो ते इंग्रजांनी घातलेल्या पाऊणशे वर्ष जुन्या ट्रॅक वरून.

नंतर मात्र प्रगती चांगली होते आहे. तरीही भारतासारख्या मोठ्या देशांत रेल्वे अजूनही सगळीकडे पोचली नाहीये. नागालँड मध्ये आता आता रेल्वे सुरू होते आहे. काश्मीरमध्ये तर निसर्गाचीच आव्हाने इतकी प्रचंड आहेत की प्रगती सावकाशच होणार.

ते जाऊ द्या, आमची पुणे मिरज लाईन डब्लिंग आणि विजेची व्हायला पन्नास वर्षे लागली आहेत. अजून कधी काम पूर्ण होईल ते सांगता येत नाहीत. बरोब्बर, तुम्ही बरोबर ओळखले, मी आपल्या त्या सुवर्ण जयंतीला येतांना रेल्वेच्या खिडकीत काचेला नाक लावून बसलो होतो हे सर्व बघत. जित्याची खोड दुसरे काय.

पण ज्या रेल्वेने कोकण रेल्वे सारखे काम धीराने पूर्ण केले त्यांच्यावर विश्वास टाकायला हरकत नाही. नव्या रेल्वे लाईन्स व्हायला आपल्याकडे मागणी नंतर पंधरा वीस वर्षे सहज लागतात. पण बहुतेक सगळ्या नव्या लायनी नव्या टेक्नॉलॉजीने बनत आहेत. पहिल्यांदा मालगाड्या आणि मग पॅसेंजर गाड्या ही पद्धत पुणे मिरज लाईनने मोडून काढली. पहिलीच गाडी एक्सप्रेस म्हणून गेली.

प्रगती होतच असते सगळ्या क्षेत्रात. रेल्वेतही अशीच होते. नवीन रेल्वे इंजिन पाहिली की कसे छान वाटते. तशी पूर्वीची स्टीम इंजिनेही अचंबित करणारीच होती. पण आताची डिझेल इंजिने "पर्यावरण प्रेमी" असा बॅच लावून फिरताहेत असे बघून छान वाटले.

आता बघू नवीन प्रगती काय होते रेल्वेत ती. कालच वाचले आहे की ग्रॅव्हिटी एसिस्ट करून रिजनेरेशन वर चालणारी रेल्वे येणार आहे म्हणून. येऊ दे आमच्या आयुष्यांतच, अजून काहीतरी नवीन बघायला मिळेल.

आपली आवड एकदम घट्ट आहे बरे. अशी तशी नाही जाणार ती. उलट वाढतच जाईल.

# "यंत्र"मुग्ध

असा कोणी एक दाखवा की जो एक जेसीबी काम करत असताना बघत उभा रहात नाही. आता त्या जेसीबीच्या कामात बघण्यासारखे काय असते ते कोणीही सांगावे. वस्तुतः जेसीबी म्हणजे एक मॅन्युअल रोबोच असतो की नाही? माणसासारखेच त्याचे हात चालतात. तो केबिन मध्ये बसलेला त्याचा ऑपरेटर दोन तीन लिव्हर हलवून त्याच्या भल्यामोठ्या हाताने काय काय करू शकतो ते मात्र आश्चर्यकारक असते यांत काही संशय नाही.

माणसाच्या हातासारखे त्या जेसीबीचे दंड, कोपर आणि हात असतात. पण ते विशिष्ट प्रकारे वळवून ज्या हालचाली करता येतात त्या स्तिमित करणाऱ्या असतात. त्याचेच त्या बघणाऱ्यांना कौतुक वाटते. ते बघतांना आतला माणूसच हे करवतो आहे इथे लक्ष जात नाही.

तशीच ती उंच टॉवर क्रेन. वरचा आर्म फक्त गोल फिरतो आणि त्यावरची क्रेन पुढे मागे होते आणि खालीवर होते. बास. तरीसुद्धा तो केबिन मधला माणूस टांगलेली बकेट किंवा बांधलेला जुडगा नेमक्या ठिकाणी कसा ठेवतो ते बघण्यासारखेच असते.

डॉक मधली तो कंटेनर उचलणारी क्रेन म्हणजे टॉवर क्रेन ची आज्जीच म्हणायची. कंटेनरशिप मधून कंटेनर बाहेर काढायचा आणि खाली पार्क केलेल्या ट्रक किंवा रेल्वे वॅगनवर बरोबर चार कोपरे मॅच करून ठेवायचा किंवा ट्रक, रेल्वे वॅगनवरचा उचलून बोटींत खोल खबदाडीत ठेवायचा हे त्या ऑपरेटरचे स्किल तोंडांत बोटे घालायला लावते.

एकदा स्टील प्लांट मधला वॅगन टिपलर बघायला मिळाला. एक मोठीच्या मोठी मालगाडी असते. तिच्यांत कोळसा किंवा चुनखडी किंवा असेच मटेरियल भरलेले असते. ते रिकामे करून घेण्यासाठी वॅगन टिपलर असतात. मालगाडीची ब्रेक  कपलिंग सोडवलेली असतात आणि एक इलेक्ट्रिक इंजिन किंवा शंटर इंजिन एक एक डबा टिपलर वर ढकलत असते. डबा टिपलर वर ठेवला आणि त्याचे कपलिंग सोडवले की बाकीची गाडी थोडी मागे जाते.

मग तो टिपलर आक्खा डबा उचलून एका हॉपर मध्ये पालथा करतो. पहिल्यांदा मी बघितले तेंव्हा साईड टिपलर होता तो. तो उचललेला डबा बघितल्यावर छाती दडपते पहिल्यांदा. दीडशे दोनशे टन वजनाचा डबा आकाशांत उचललेला दिसतो.

पण टिपलर असा डिझाइन केलेला असतो की डबा परत आणून ठेवला की काही मिलिमीटर अंतरात पुन्हा येतो. मग ती मालगाडी पुन्हा पुढे येते आणि

a

हा रिकामा डबा पुढे ढकलून नवा डबा टिपलर वर ठेवते. मग चक्र सुरू रहाते गाडी मोकळी होई पर्यंत.

दुसरे टिपलर गोल फिरतात आणि डबा रिकामा करतात. त्यांत तो उलटा झालेला डबा असाच छातीत दडपण आणतो. चुकून डबा खाली हॉपर मध्ये पडला तर?

असे डबे हॉपर मध्ये पडले आहेत टिपलर मधून निसटून. मोठाच प्रकार झालेला आहे तेंव्हा.

म्हणून काही टिपलर चालतांना बघण्याची मजा कमी होत नाही. डब्या मागून डबे पालथे होताना बघताना तासचे तास कसे निघून जातात ते कळत नाही.

ब्रिज बांधतांना बीम घेऊन येणारे मशीन जवळून काम करतांना पाहिले आहे का? अगोदर ठेवलेल्या बीमचा आधार घेऊन नव्या बीम पुढे पुढे ठेवत जाते. एवढी जड बीम बॅलन्स सांभाळून बरोबर काही मिलिमीटर अंतरांत ठेवणारी ही मशीन बघितली की मन कसे प्रसन्न होते.

a

आता बोट आणि तिचे इंजिन बघा, महाप्रचंड! त्याचे सगळे भाग तसे साधे पण मोठे.

रॉकेट जर जवळून पाहिले तर आश्चर्य वाटते ती एवढे मोठे रॉकेट पण त्यांचे इंजिन अगदी साधे असते. पण क्रायोजेनिक असल्यामुळे आणि अतिशय खात्रीचे असण्यासाठी ते क्लिष्ट होते. रॉकेट उडतांना बघायला आवडेल की नाही?

ऑटोमेशन मध्ये मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल इलेक्ट्रॉनिक असे मुख्य भाग असतात. असे ऑटोमॅटिक मशीन बऱ्याच कारखान्यांत विविध उपयोगांसाठी बसवतात. जिथे पुन्हा पुन्हा तेच तेच काम करायचे असेल तेंव्हा किंवा खूप धोक्याचे काम करायचे असेल तेंव्हा आणि अगदी जंतुसंसर्ग होऊ नये अश्या ठिकाणी काम करायचे असेल तर अशी ऑटोमेटेड मशीन अत्यावश्यक होतात.

ऑटोमॅटिक मशीन काम करतांना पहा. आपली तंद्रीच लागते बघतांना. निरनिराळी पॅकेजिंग मशिन्स आणि असेम्ब्ली मशीन या प्रकारात येतात. उदाहरण द्यायचे तर दाढीची कारट्रीज ब्लेड अश्या मशीनवर बनतात. एक एक स्टेशन असते आणि तिथे एक एक पार्ट येतो. एक पट्टा किंवा ज्याला नेस्ट

म्हणतात ते एक एक घर पुढे जाते आणि शेवटी सगळे पार्ट एकत्र येऊन दाढीचे कारट्रीज ब्लेड तयार होते. मिनिटाला एकशेवीस ब्लेड होतात तयार.

तसेच पॅकेजिंग मशीन ही एक एक स्टेप करत पूर्ण पॅकेज तयार करते. ही मशीन काम करत असताना बघणे अगदी छान असते.

लहान असोत की मोठी, मशीन आपले काम सुकर करतात आणि त्यांचे काम बघणेही आपल्याला एक वेगळाच आनंद देऊन जाते.

यंत्रे कधी साधी पण मोठी असतात किंवा लहान आणि क्लिष्ट असतात. पण म्हणून ती डिझाइन करायचे आणि बनवायचे कष्ट कमीजास्त नसतात.

मोठे रेल्वे इंजिन बघून "यंत्र"मुग्ध झाला नाही असा असामी भेटणार नाही. नुसते ते इंजिन गाडीपासून सोडताना, त्याला गोलावर फिरवताना आणि मग पुन्हा गाडीला जोडताना चार पाच डोकी तरी दिसतील बघत असलेली.

काही ग्रेट "यंत्रमुग्ध" लोक आहेत की जे अशी मशीन चालतांना बघण्यासाठी शेकडो किलोमीटर प्रवास करून जातात आणि त्या मशीनचे जवळून निरीक्षण करतात. तासनतास घालवतात बघण्यात आणि त्यांना उन्हापावसाचे काहीच वाटत नाही असे बघताना.

तुम्ही रेल्वे फॅन क्लब ऐकले आहेत का? ते ही याच प्रकारचे लोक. गाड्यांत हिंडून रेकॉर्डिंग करून यू ट्यूबवर पोस्ट करणारी ही जमात. तसेच हे यंत्रमुग्ध मानव निरनिराळ्या यंत्रांचे काम रेकॉर्ड करून मग पोस्ट करतात आणि इतरांना आपल्यासारखे करवतात.

मंत्रमुग्ध काय किंवा यंत्रमुग्ध काय, एकाच कॅटेगरीचे लोक आहेत हे. जगाच्या दृष्टीने चक्रम पण आपल्या छंदांत पूर्ण बुडून जाणारे.

a

# युगांचे चक्र

सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग ही चार युगे आहेत.

मला विचाराल तर माझे युगांचे मत असे आहे -

सत्ययुगांत पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण होत होती. एकपेशी जीव आत्ताच कुठे येऊ लागले होते. अजून बहुपेशीय जीव यायचे होते. या युगात जीव कितीही झगडले तरी मूळ वातावरण बिघडविण्याची त्यांची शक्तीच नव्हती.

त्रेतायुगात बहुपेशीय जीव निर्माण झाले होते आणि वातावरण बदलाला तोंड देत आपापल्या योनींना (स्पेशिजना) जुळविण्यासाठी धडपड चालू होती. अजून वातावरण बदल त्यांना मारक ठरत होते. वातावरणावर मात करण्याची त्यांची क्षमता नव्हती. पण वातावरण बदलाला तोंड देण्यासाठी स्वतःला बदलायची त्यांची धडपड सुरू होती. जमिनीवरचे जीव पाण्यांत आणि पाण्यातले जीव जमिनीवर येऊन टिकून रहायचा प्रयत्न करत होते. आपल्याला प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्यासाठी कुठेतरी लपून रहायची त्यांची वृत्ती होती. घरे, घरटी करून त्यांत सुरक्षित राहायचा प्रयत्न चालू होता.

a

द्वापारयुगांत ही धडपड बरीच यशस्वी होत चालली होती. जमिनीवर धोका असतांना झाडांवर रहावे किंवा जमिनीखाली बिळे करावीत किंवा धोक्यापासून दूर जावे एवढी क्षमता आली होती. आता मिळेल तिथे आपले राज्य करावे असा प्रयत्न सुरू झाला होता. टेरिटोरियल पक्षी, प्राणी, कीटक आणि मत्स्य वर्ग निर्माण झाला होता. झाडावरचे कपि कुळातले प्राणी जमिनीवर गट करून रहायला लागले होते. आपला इलाका सांभाळण्याची त्यांची वृत्ती झाली होती. फक्त निसर्गावर अवलंबून न राहता आपले अन्न आपणच निर्माण करावे अशी प्रेरणा झाली होती. निसर्गावर काबू करू पाहण्याची वृत्ती झाली होती. वानरांचे मनुष्यात रूपांतर होऊ लागले होते. शेती आणि मग वस्त्या गावे होऊ लागली होती. आपले गाव चालविण्यासाठी समाज निर्माण होऊ लागले होते. चतुष्पाद प्राणी जमले तर पाळायची कल्पना आली होती. मालकीच्या वस्तू मिळविण्याची आणि सांभाळण्याची स्पर्धा होऊ लागली होती. युद्धे होऊ लागली होती. युद्धे भीषण आणि जीवघेणी असतात हे कळूनही त्यांचे आकर्षण व्हायला लागले होते. इतर चतुष्पाद प्राण्यांनाही असेच गट घोळके करून इलाके, जागा राखायची स्फूर्ती मिळाली होती. निसर्गावर आणि वातावरणावर अवलंबून न रहाता आपल्याला सोयीस्कर असे कसे करता येईल यावर धडपड सुरू होती. एका प्राण्यांपेक्षा समाज कसा ज्यास्त बळकट असतो हे भान आले होते. हे सर्व फक्त मनुष्ययोनीलाच नव्हे तर इतर योनींना ही कळले होते.

a

कलियुग येता येता द्वापारयुगांत असलेला थोडासा समभाव लुप्त होत चालला होता. मानवयोनी इतर योनीपेक्षा दुबळी असूनही आपल्या बुद्धीने त्यांवर मात करू लागली होती. ज्या योनी न बदलता जश्या त्या तश्या राहिल्या त्यांना नगण्य मानून आपली योनीच पृथ्वीवर राज्य कसे करील याचा ध्यास लागला होता. निसर्ग आणि वातावरण आपल्यासाठी आहे आपण त्याच्यासाठी नाही ही वृत्ती प्रबळ झाली होती. आपण निसर्गाला हवे तसे वाकवू शकतो ही गुर्मी आली होती. निसर्गावर अवलंबून न राहता आपली पृथ्वीच कशी बदलता येईल याचा अभ्यास आणि निरीक्षण चालू होते. त्यातून आपले विश्व काही अविरत नाही, ते बदलणार आहे मग आपण काय करायचे हा विचार सुरू झाला होता. आपला इलाका कसा सांभाळायचा या चिंतेत इतर पर्यावरण आणि आपलेच भाईबंद कसे नष्ट होतील याची चिंताच राहिली नव्हती. आता आपण स्वतः हेच परमध्येय हेच जीवनाचे प्रिन्सिपल झाले होते.

चार युगानंतर पुन्हा चक्र तेच सुरू राहणार असले तर पुन्हा सत्ययुग यायला पाहिजे. म्हणजे पृथ्वीची स्थिती पुन्हा चार युगे मागे जायला पाहिजे. ते कसे होणार?

नैसर्गिक विध्वंस, मानवी विध्वंस किंवा अकल्पित काहीतरी घटना होऊनच.

ते कधी होईल ते सांगता येणार नाही. एक धूमकेतू किंवा लघुग्रह घडवेल असे किंवा मनुष्यजात हा विध्वंस घडवून आणील किंवा काहीतरी वैश्विक घटना होऊन पुन्हा सगळे रिसेट होईल.

पणे असेही होणार नाही. सूर्य वयस्कर होणार आहे आणि तो वेगळ्या दिशेने वाटचाल करणार आहे. मागच्या सत्ययुगाची पुढच्या सत्ययुगाशी काहीही तुलना करता येणार नाही.

अशी किती युगे आली आणि गेली हेही नक्की सांगता येणार नाही. कालगणना आजच्या सारखी पुढे असेल का आणि मागे होती का हेही पक्के सांगता येणार नाही.

युगाची व्याख्या पाच वर्षांपासून ते लाखो वर्षापर्यंत बदलत गेलेली आहे. मग त्यावेळची परिस्थिती कशी  होती याची कल्पना कशी येणार.

कोणते युग चांगले आणि कोणते वाईट असा प्रश्नच उद्भवत नाही. कारण चांगले काय आणि वाईट काय हे कसे ठरविणार?

तर मग आहे त्या परिस्थितीला अनुसरून राहाणेच योग्य असेल. एकपेशीय जीव होते त्यांना तरी चॉईस काय होता.

तर युगचक्रे चालतील आणि आपल्यावर परिणाम, चांगले किंवा वाईट असे म्हणायचेच नाही, करत रहातील. निसर्गावर मात केली असे म्हणणे किती खरे आहे ते दिसेलच.

शेवटी जीवसृष्टी निसर्गाने निर्माण केली, निसर्ग जीवसृष्टीने नव्हे हेच सत्य आणि पूर्ण सत्य आहे.

# वर्णांचे महत्व

तुम्हाला काय वाटते?

चातुर्वर्ण्य पद्धत वेदिक भारतात निर्माण झाली. सामाजिक कार्ये विभागली गेली.

ब्राम्हणांनी अध्ययन, अध्यापन करावे. क्षत्रियांनी संरक्षण, सांभाळ करावा. वैश्यांनी व्यापारउदीम, शेतीभाती, व्यवहारातील साधने पद्धती कराव्यात, मालाचे उत्पादन, उलाढाल करावी, त्यासाठी लागणारी साधने तयार करावीत. शूद्रांनी या सर्वांना सेवा द्यावी आणि त्यांना काम करण्यास व्यावहारिक अडचणी येणार नाहीत असे करावे.

यामुळे कामाची विभागणी झाली आणि समाजगाडा सुरळीत चालू लागला.

आपल्या कुवती प्रमाणे वर्ण स्वीकारावा आणि काम करून जगावे अशी पद्धत झाली. वर्ण जन्मतः नव्हे तर कर्मतः ठरे.

a

कामाची विभागणी झाल्याने प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट स्वतः शिकायची गरज राहिली नाही. शिवाय एका लोकसंघांत एका प्रकारचे काम करायची आणि त्यात पारंगत होऊन प्रगती करायची संधी मिळाली.

स्पेशलायझेशन झाल्यामुळे वेगवेगळे लोकसंघ वेगवेगळया विषयांत तरबेज झाले. आपले सोडून इतर कामासाठी दुसऱ्या संघांवर अवलंबून राहण्याची पाळी सर्वांवरच आली.

तेथून सुरू झाली लोकसंघांची चढाओढ. आपला संघच श्रेष्ठ आहे असे मानण्याची स्पर्धा लागली. इथे समाजव्यवस्था उताराला लागायची सुरुवात आणि लोकसंघात तेढ व्हायला मूळ धरू लागले.

वस्तुतः प्रत्येक लोकसंघाची दुसऱ्याला गरज होती आणि आजही आहे. पण एका संघाने वर्चस्वाचा आग्रह धरला तर इतरही तसेच करणार. हे न समजण्याइतकी लोकांची जाणं नव्हती का?

चढाओढीतून अत्याग्रह आणि अरेरावी सुरू होणे समाजाला घातकच होते.

अतिरेक इतका झाला की प्रत्येकाचा लोकसंघ जन्माने ठरविला जाऊ लागला, कर्माने नव्हे. त्यामुळे अपात्र व्यक्तींना त्यांच्याकडून न होऊ शकणारे काम दिले गेले, केवळ ते त्या लोकसंघात असल्याने.

पूर्वी ब्राम्हणांनी वागण्याचा अतिरेक केला, इतर कुणीही अध्ययन अध्यापन करूच नये असा आग्रह धरला. जो करील त्याला शिक्षा देण्यात येऊ लागली. समाज बिघडून गेला आणि क्रांती झाली. ब्राम्हणांची पत घसरली आणि ते फक्त भट भिक्षुकी करताच पात्र राहिले.

मग क्षत्रियांनी अतिरेक केला. शस्त्र आणि बळाच्या आधारे प्रजेला छळले. लोकांच्या भावना आणि मात्र न लक्षांत घेता आपलीच सत्ता त्यांनी लादली आणि आपल्या विचारानेच त्यांना वागायला लावले. पुन्हा क्रांती झाली आणि क्षत्रियांचा निप्पात झाला. ते फक्त नावाचेच राजे राहिले. राज्य चालविणे पुन्हा ब्राम्हणांच्या हातात आले.

मग वैश्यानी क्रांती केली. सगळा व्यापारउदीम हातात घेतला. ब्राम्हणांना आणि क्षत्रियांना अधीन केले. पैसा हेच सर्वकाही केले. पैसे हे व्यवहाराचे मूळ असल्याने आर्थिक सत्ता ज्यांच्या हाती तेच समाजाचे पुढारी. पैसे हेच सर्वकाही बाकी कशालाही किंमत देऊन मिळवता येते ही भावना बळावली. त्याचाही आता अतिरेक होतो आहे. आर्थिक बळाविरुद्ध कुरबुर सुरू झाली आहे.

क्रांतीच्या उंबरठ्यावर समाज येऊ लागला आहे. पण अजून वैष्यांचा काही निप्पात झालेला नाही. इतर सर्व त्यांच्या आधीन झाले आहेत पण अजून त्यांच्या विरुद्ध क्रांती काही झालेली नाही.

शूद्रांनी सेवा द्याव्यात हे पूर्वी मान्य होते. आता शूद्रांनीही जर क्रांती केली आणि त्यांचे काम टाकून दिले तर काय होईल? समाज गुडघे टेकील. त्यांच्याविना एक पाऊल काही टाकता येणार नाही. पावलोपावली अडायला होईल. समाजगाडा बंदच पडेल त्यांच्या सेवेवाचून.

मग सर्वांत पॉवरफुल कोणता वर्ण आहे? कोणी एक वर्ण आहे का सर्वात पॉवरफुल? तो असा कसा होऊ शकेल याचा विचार जर लोकांनी केला नाही तर क्रांत्या आणि त्यामुळे होणारा विध्वंस आणि विलय होते अपरिहार्य आहे.

आजच्या घडीला पाहिले तर बहुतेक कोणीही पारंपरिक काम करून जगताना दिसत नाही. शिक्षणाने आणि त्यातही विशेष शिक्षणाने आपोआपच आपले वर्ण ठरविले गेले आहेत. जन्माने कोणत्या संघांत होतो आणि कर्माने कोणत्या संघांत आहोत हेही आता बघावे.

a

आज हाऊस कीपिंग, बिझिनेस हाऊस, कारखाने, शाळा कॉलेजेस, सर्व्हिस इंडस्ट्री, फायनान्स, अकाउंटिंग, सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादी कामांची स्वरूपे काय दाखवतात?

शिक्षक, प्रोफेसर, रिसर्च, डिझाईन, आर्किटेक्चर, इत्यादी डोक्याची ब्राम्हणी कामे नाहीत काय?

फायनान्स, अकाउंटिंग, बँका, दुकाने, विक्रेते, शेतकरी, डेअरी, कुक्कुटपालन, पशुपालन, कामकरी, व्यापारी हे वैश्य नव्हेत काय?

मिलिटरी, पोलीस, होमगार्ड हे क्षत्रिय नव्हेत काय?

ड्रायव्हर्स, सफाईवाले, मोलकरणी, इत्यादी शूद्र नव्हेत काय?

या सर्वांत जन्मजात दुसऱ्या वर्णाचे लोक काम करीत नाहीत काय?

मग वर्णभेदाचा कुणाला इतका राग यायचे कारण काय?

ड्रायव्हर जन्माने ब्राम्हण असू शकतो तसेच प्रोफेसर क्षत्रिय किंवा वैश्यही असू शकतो.

हेच आज सामाजिक सत्य झाले आहे.

जन्मतः असणाऱ्या आपल्या संघाचे काही महत्व राहिले आहे का हेही बघायची आता वेळ आली आहे.

आता विचार करायची वेळ आली आहे की नवनवे जन्मजात लोकसंघ निर्माण करून आणि त्यांच्यांत इर्ष्येचे अंगार टाकून एकमेकांविरुद्ध उभे करण्यात आणि त्यांना एकमेकांविरुद्ध लढविण्यात कोणाचा स्वार्थ आहे ते आणि हे समाजासाठी आणि पुढे जाऊन राष्ट्रासाठी योग्य आहे का हे ठरवण्याची.

# कान्होबा

देवाने आपल्याला जी इंद्रिये दिली आहेत त्यांत कानाचे महत्व वादातीत आहे.  दिसणे आणि ऐकणे या आपल्या जगाच्या खिडक्या आहेत आणि या खिडक्या बंद झाल्या तर आपण जगापासून तुटूनच जाऊ.

ज्यावेळी आपण निर्माण होत असतो तेंव्हा जे अवयव अगदी पहिल्यांदा डेव्हलप होतात त्यांत डोळे आणि कान होतात असे ऐकले आहे. अर्थात निसर्गाने ही व्यवस्था आपले पुढचे आयुष्य मस्त जावे म्हणूनच केली असणार.

आपल्या मातेच्या गर्भाशयात जेंव्हा एम्बर्यो निर्माण होऊन विकसित होतो तेंव्हा डोके, डोळे आणि कान अगोदर तयार होऊ लागतात असे आपण जर ते विकसन पाहिले तर दिसेल.

कान हा बराच क्लिष्ट अवयव आहे आणि अति संवेदनशील आहे. आता इथे आपण कानाची रचना आणि त्याचे कार्य याची चर्चा नाही करणार. ती आपण डॉक्टरांवर सोडून देऊ.

जन्माच्या कितीतरी अगोदर कान जागृत होतात. आईच्या हृदयाचे ठोके आणि तिच्या शरीरातले आवाज त्याला जाणवतात असे सिद्ध झाले आहे.

साधारण गर्भाच्या पाचव्या महिन्यानंतर त्याला बाहेरचे आवाज थोडे थोडे ऐकू येतात आणि तो त्याला प्रतिसाद देतो असे ऐकले आहे. मोठे आवाज, फटाक्यांचे किंवा इतर यंत्रांचे आवाज गर्भाला ऐकू येतात आणि तो कधी कधी अवस्थ होतो असे डॉक्टर सांगतात.

खरे खोटे तो अभिमन्यूच जाणे पण कृष्णाने त्याच्या बहिणीला, सुभद्रेला, गंमत म्हणून चक्रव्यूहाची रचना सांगितली आणि अर्धे सांगून झाल्यावर तिला झोप लागली आणि पुढचे वर्णन ऐकायचे राहून गेले असे महाभारतातल्या गोष्टींत सांगितले आहे. आता तिला त्या चक्रव्यूहाचे वर्णन ऐकताना झोप आली हे अगदी नैसर्गिक आहे! पण तिचे पोटातले बाळ ऐकत होते आणि त्याला अर्धवट माहिती मिळाली.

आठ नऊ महिन्यांचा गर्भ बाहेरच्या आवाजाला प्रतिसाद देतो हे डॉक्टर दाखवून देतात. मोठा आवाज ऐकला तर तो गर्भ दचकतो आणि आईला ही ते जाणवते.

यावरून ऐकण्याचे महत्व दिसते.

a

एकदा जन्मले की ते बाळ आवाजाला प्रतिसाद देते, हुंकार देते आणि थोडे थोडे त्याच्या भाषेत बोलते सुद्धा.

कानाचे महत्व ऐकू येण्यात तर आहेच पण इतर गोष्टींकरताही कान उपयोगी पडतो. ऐकू येऊन पाहिजे तसे वागले नाही की कान धरून तसे वागविता येते. काही चूक केली तर कानच धरायला लावतात, ते का? वस्तुतः कानाचे वागण्यांत काहीही डायरेक्ट काम नसते, पण शिक्षा मात्र कानाला होते.

पूर्वीचे धनुर्धारी आपल्या भुजा "जानू", म्हणजे गुडघ्यापर्यंत असल्या तर ते उत्तम असे प्राचीन युद्धशास्त्रांत दिले आहे. मोठे धनुष्य ताणण्यासाठी मोठे बाहू पाहिजेतच. शिवाय धनुष्याची प्रत्यंचा, म्हणजे दोरी हो, आकर्ण म्हणजे कानापर्यंत ओढून बाण सोडला की तो ज्यास्त प्रभावी होतो म्हणे. म्हणजे इथेही कानाचे महत्व आहेच. फक्त त्या धनुर्धाऱ्याला त्या धनुष्याच्या दोरीपासून आपला कान वाचवता आला पाहिजे, नाहीतर तो दोरीच कान घेऊन जायची.

कान काय ऐकेल यावर त्याचा काय कंट्रोल असणार? तो आपला जे ऐकतो ते मेंदूला पोचवतो.

आता इथेही बघा, एखादी अमान्य गोष्ट ऐकायची नसेल किंवा ऐकायला लागली पण अमान्य असेल तर आपण कानावर हात ठेवतो. आपली जबाबदारी

झटकून टाकायची असेल तरी कानच झाकतो आपण, डोळे किंवा तोंड नाही. असे का बरं?

आता हा कान जन्मभर आपल्याला जगाशी संपर्क साधायला मदत करतो. अगदी वीस हर्ट्झ ते वीस हजार हर्ट्झ पर्यंत फ्रिक्वेन्सीस ऐकवतो. इतर प्राण्यांना याहून ज्यास्त ऐकू येते म्हणतात.

बिचारा पाहिजे ते आणि नको ते ऐकून ऐकून दमून जातो साठ सत्तर वर्षांपर्यंत आणि मग संपच करतो. बाहेरचे ऐकायला नकार द्यायला लागतो आणि आतलेच आवाज ऐकवतो.

वयाप्रमाणे कानाची निरनिराळ्या फ्रिक्वेन्सी ऐकायची ताकद कमी होते आणि आपल्याला स्वतःच्या कोषांत जाणे शक्य होते.

ज्याचे दोन्ही कान बंद पडले आहेत त्या व्यक्तीकडे बघा एकदा. कसा कमळासारखा आवाजाच्या चिखलात राहूनही विरक्त असल्यासारखा होतो ते.

कधी कधी हे ही छान असते. कारण बहिरेपणाचा फायदा घेऊन न ऐकण्यासारख्या गोष्टी कानाआड करता येतात आणि पाहिजे तेव्हढेच ऐकता येते. शिवाय ऐकू न आल्याने नको त्या कॉमेंट्स ऐकू येत नाहीत या एक मोठाच

फायदा आहे. अजून म्हणजे ऐकू आले नाही या सबबीने पुन्हा एकदा सांगायला सांगता येते आणि काही फरक असेल दुसऱ्यांदा  सांगण्यांत तर त्या सांगणाऱ्याला शब्दांत पकडता येते.

आपला दमलेला कान मग आपल्याला आतले आवाज ऐकवतो. मनाचे आणि शरीराचेही. निरनिराळ्या फ्रिक्वेन्सी पुन्हा ऐकू येतात पण त्या कायमच्च्या. कानात सुईं सुईं असे आवाज सतत ऐकू येतात, बाहेरचे ऐकू येईनासे होते. त्याला "टिनिटस" म्हणतात असे ऐकले आहे. मराठीत त्याला मृत्यूघंटा असे गंभीर आणि भीतीदायक नाव आहे असे ऐकले आहे.

त्याची कारणे काहीही असोत पण हे आतले आवाज कधीकधी अस्वस्थ करतात हे मात्र खरे. आपल्याच हृदयाचे ठोके ऐकू येतात, ते ही कधीकधी बेचैन करतात.

खरे तर आतला आवाज, म्हणजे मनाचा आतला आवाज ऐकू येणे चांगले आणि त्याचे पालन करणे अजूनच चांगले असे म्हणतात. मग आपण ऋषितुल्य होतो असे म्हणतात.

पण भाऊ, आजवर हे कसे करायचे ते काही समजले नाही. कान शरीरातला आतला आवाज ऐकतो आहे सतत पण मनाचा आतला आवाज कसा ऐकायचा ते कुणीतरी शिकविल्याखेरीज कसे जमणार?

मग ते शिकविणारा कोणीतरी गुरू मिळेपर्यंत आपला कानाचाच आतला आवाज ऐकत राहू. काहीतरी ऐकायला येते आहे ना, मग झाले तर.

a

# अग्निजिव्हा

आम्ही जेंव्हा कोल्हापूरला आमच्या आजोळी जायचो तेंव्हा आमची मामेभावंडे आम्हाला खेळता खेळता कोड्यांत टाकायची आणि उत्तर नाही आले तर खिल्ली उडवायची.

"दोन भाऊ शेजारी, भेट नाही संसारी", सांगा उत्तर. "चार बोगदे आहेत यात, नाही जात गाडी त्यांत", सांगा उत्तर.

अहो पहिले म्हणजे डोळे आणि दुसरे म्हणजे कान आणि नाक!

नंतरचे कोडे, " बत्तिस चिरे त्यांत नागीण फिरे", सांगा उत्तर. डोके खाजवून खाजवून केस गळायला लागल्यावर, असली कसली ही मुंबईची पोरे म्हणून उत्तर सांगायची, "जीभ". अरेच्चा, असे आहे का?

नागीण खरी. वळवळते भारी आणि लई विषारी, आणि हो की, बत्तीस चिरे म्हणजे ते बत्तीस पांढरे चिरे, तोंडातले.

जीभ, जिव्हा, जबान, जुबान, टंग काय वाटेल त्या नावाने ओळखा. आहे तीच आहे.

खरेतर शरीर शास्त्रा प्रमाणे जीभ म्हणजे खाल्लेले नीट चावण्या साठी देवाने दिलेले एक उलथणे आणि एकदाचे चावून झाले की नीट गिळण्यासाठी गाईड करणारा अवयव. एकदा खाणे गिळले की याचे, किंवा हिचे म्हणा, काम झाले.

पण एवढेच नाही करत जीभ. खाल्लेले कसे आहे, चव कशी, आवडते का, अजून पाहिजे का ते आपल्याला सांगणारी एक संज्ञा.

माणसाला बोलता यायला लागले कारण त्याची जीभ खूपच ज्यास्त लवचिक आणि वळवळी झाली हे असावे.

इतर प्राणी पहा. काही विशिष्ठ आवाजांपुढे त्यांची काही गती जात नाही. हां, काही पक्षी फक्त त्याच्या गळयातल्या स्वरयंत्राचा उपयोग करून खूप मोठी रेंज असलेले आवाज काढतात. पण त्यांची जीभ फारशी वळवळ करतांना दिसत नाही.

सस्तन प्राणी मात्र जिभेचा पुसण्याचे एक यंत्र म्हणून वापरतात खरे. मांजराच्या जातीच्या प्राण्यांची जीभ चांगली खरखरीत असते आणि ते नुसते चाटून भक्ष्यावरचे केस काढून टाकू शकतात.

आपल्या पिलांना आणि आपल्या साथीदाराला चाटून प्राणी आपलेपणा सिद्ध करतात हेही खरेच आहे. त्याने त्या प्राण्यांच्या लाळेतली विशिष्ठ द्रव्ये एक खूण सोडतात त्या चाटलेल्या पिलावर किंवा आपल्या साथीदारावर. मग हक्क बजावला जातो चाटणाऱ्याचा.

ते जाऊ दे, माणसाचे काय? या वळवळणाऱ्या जिभेमुळे शब्द बोलणे शक्य झाले आणि फक्त अंगविक्षेपापेक्षा आणि हालचाली, म्हणजे बॉडी लँग्वेजपेक्षा, खूपच ज्यास्त संवाद साधता यायला लागला. भाषांचा जन्म झाला, माणूस इतर प्राण्यांपेक्षा तुलनेने सर्वात अशक्त असूनही सर्व प्राण्यावर त्याने वर्चस्व गाजवले.

या वळवळणाऱ्या जिभेचा तोरा इतका वाढला की नाही नाही त्या जागी तिची लुडबुड सुरू झाली.

"लई जीब वळवळतीया, काय तरी करायला पायजे" असे विचार ऐकणाऱ्याच्या मनात यायला लागले.

जिकडे आपला काही संबंध नाही अश्या गोष्टीतही जिभेची वळवळ सुरू झाली.

"एकदा जबान दिली म्हणजे दिली, आता मागे फिरायचे न्हाय",

a

"मेरी बात गलत निकले तो मेरी जुबाँ काटकर रख दूंगा",

"ज्यास्त बडबड केलीस तर जीभ हासडून हातात देईन",

"जबाँ पे राम बगल में छुरी",

"एक लब्ज भी निकला तो जबान काटूंगा तेरी",

" मालिक, जरा जबान फिसल गई, माफ कीजिये ना",

इथे जीभ काहीही करत नाही बिचारी, पण तिचा भाव मात्र किती वधारला आहे बघा माणसाच्या स्वभावात.

आपला मान, आपली शान दाखविण्यासाठी जिभेचा उपयोग होतो आहे. भले राजा असो, किंवा डाकू असो, किंवा चोर असो, किंवा साधासुधा गरीब बिचारा माणूस असो, सगळे जिभेचा वापर करतात आपला स्वभाव सिद्ध करण्यासाठी.

a

राजे आणि डाकू, दोघेही आपले जिभेने दिलेले वचन पाळण्यासाठी प्रसिद्ध झाले आहेत. "प्राण जाय पर वचन न जाय", हे प्रिन्सिपल त्यांनी पाळले आहे अश्या कथा ऐकल्या आहेत.

जिभेला शिक्षा म्हणजे त्या व्यक्तीला दिलेली सर्वांत मोठी किंवा क्रूर शिक्षा असली पाहिजे, एक त्या मृत्युदंडापेक्षा थोडी कमी.

जीभ हासडणे कधी पाहिले नाही, पण भयंकरच असेल तो प्रकार. जीभ जोरात खेचून बाहेर येते का ते आम्ही तरी कधी ट्राय केले नाही. एक दोनदा करून बघितले लहान असताना पण दुखल्याबरोबर ताबडतोब तो प्रयोग बंद केला.

मग जीभ हासडून बाहेर काढणारी शिक्षा किती भयानक असेल.

जाऊ द्या, शिक्षेचा हा विषय फारच भीषण आहे. बंद करूया तो.

बोलण्यात जिभेचे जेवढे काम असते तेवढेच घशातल्या स्वरयंत्राचे, दातांचे आणि एकंदरीत तोंडाचे असते. पण गोड असो की कडू, शब्द आणि भाषा याचे श्रेय आणि दोष जिभेलाच जातात बघा.

कानाने काहीतरी बातमी ऐकली की जीभ वळवळायला लागते. का बरे असे? या वळवळत्या जिभांना लगाम घालायचे अजून कुणाला जमलेले दिसत नाही.

एक बोलण्याखेरीज दुसरे मोठा काम जिभेचे म्हणजे चव घेणे. इथे दैनंदिन व्यवहारात चव घेण्याचे काम तर जीभ करतेच.

काही लोकांना हे रसज्ञान खूपच तीव्र मिळते, देवाची देणगी म्हणून.  खाद्य आणि पेय इंडस्ट्री मध्ये टेस्टर्स नावाचे स्पेशालिस्ट असतात.

ते सिगारेट, चिरुट आणि  तंबाखू आणि तिची इतर प्रॉडक्ट्स असलेल्या कारखान्यातही असतात. तंबाखूजन्य पदार्थांनाही एक प्रकारची चव आणि स्वाद असतो तो जिभेला जाणवतो.

चहा, कॉफी, वाइन, मदिरा, इतर पेये यांच्या कारखान्यांत, रेडिमेड खाद्य पदार्थांच्या आणि सिगरेट वगैरेच्या कारखान्यांत या टेस्टर्स ना खूपच मानाची पदे असतात.

खरे तर टेस्टर्स हे काम खूपच सबजेक्टिव्ह आहे, त्याला काही मानदंड नसतात. टेस्टरला आवडली चव आणि स्वाद तर तो पदार्थ पुढे जातो नाहीतर

बॅचची बॅच सरळ ओतून दिली जाते. खाण्याच्या पदार्थाचे असेच. नुसत्या चवीने पदार्थाचे एजिंग आणि त्याची किंमत आणि व्हॅल्यू आणि प्रसिद्धी सांगणारे दर्दी आहेत.

मग जिव्हा इथे किती गंभीर काम करते ते पहा. तेही कमर्शियल क्वालिटीचे. आणि तो टेस्टर, त्याचे काय? दररोज शेकडो घोट पिऊन आणि शेकडो घास खाऊन आणि सिगारेट आणि चिरुटाचे शेकडो झुरके घेऊन त्याचे काय होत असेल?

एक रसज्ञान उत्तम आहे म्हणून जीभ त्याला रसातळाला ढकलत नाही का?

असो. तो टेस्टर जाणे आणि त्याला काम देणारे ते कारखानदार जाणोत.

जिभेला आपला स्वतःचा जीव आणि प्राण असतो का?

खरे बोलताना जीभ उत्तेजित होते तशी खोटे बोलताना जड का होत नाही? धडधडीत खोटे बोलताना जीभ अडखळत का नाही? तसे असते तर गुन्हे किती कमी झाले असते. खोटेनाटे आणि वाईट बोलणाऱ्या माणसाला विचारतात की त्याच्या, किंवा तिच्या, जिभेला काही हाड आहे की नाही म्हणून.

एकही हाड नसलेला हा अवयव किती भेदक असतो. जे तलवार करू शकत नाही ते जीभ सहज करते. जिव्हाताडन किंवा वाक् ताडन  ही एक मोठीच शिक्षा आहे, अगदी सहन न होणारी. जिव्हाताडन झालेल्या लोकांनी लढून प्राण दिले आहेत. त्यांतही जिव्हाताडन स्त्रीकडून असेल तर झालेच काम, ऐकणारा म्हणेल "ही पृथ्वी मला का घेत नाही पोटात अशी शिक्षा सहन करण्यापेक्षा".

असे म्हणतात की स्त्रीच्या शरीरात दोनशे सहा हाडे असतात, आणि पुरुषाच्या शरीरात दोनशे सात. कुठे असते हे वेगळे हाड? अर्थात जिभेलाच. अर्थ समजला ना नक्की?

जीभ जशी वळवळते तश्याच अग्नीच्या ज्वाळा लवलवतात. म्हणून अग्नीच्या ज्वालांनाही अग्निजिव्हा असेच म्हटले आहे. त्याही तेवढ्याच दाहक आणि भेदक असतात. दुरून दिसायला मोहक पण स्पर्श झाला की विनाश करणाऱ्या.

तर आपली ही बत्तीस चिऱ्यात वळवळणारी नागीण अशी असते बघा. जरा छेडून तरी बघा, कशी उसळून येईल तुमच्यावर ते.

# सिंहावलोकन

ऐकले आहे का हे काय असते ते? असे म्हणतात की सिंह, तो जंगलचा राजा, प्राण्यांचा देव, सवशक्तिमान मार्जार, जेंव्हा पुढे पुढे चालतो तेंव्हा थांबून पुन्हा पुन्हा मागे वळून बघतो. तेच सिंहावलोकन.

का बरे तो मागे वळून बघतो पुन्हा पुन्हा? जायचे तर असते पुढे, मग मागे काय झाले किंवा होते आहे याची त्याला का चिंता?

तिथेच तर गोम आहे भाऊ. सिंह सर्वशक्तिमान प्राणी खरा आणि तो जंगलचा राजा खरा, पण त्यालाही भीती असते सतत की माझ्यामागे कोणीतरी माझे राज्य हिसकावून घ्यायला टपून बसलेला नाहीना अशी.

एवढा उमदा दिसणारा हा जंगलचा राजा, त्याची आयाळ, त्याचे शक्ती दाखवणारे स्नायू, त्याची ती भेदक गर्जना, त्याचे आपल्या सिंहीणींचे राज्य, त्याचा तो भव्य इलाखा, सगळे त्याचे ते साम्राज्य, पण त्याच्याही मनांत सारखी भीती बसलेली असते की दोन तीन तसेच भावी सम्राट येतील, युद्ध करतील आणि त्याचे राज्य हिसकावून घेऊन त्याला परागंदा करतील.

a

अहो पण त्यानेही तेच केले होते ना हे राज्य, ह्या राण्या, हे युवराज आणि ह्या युवराज्ञी मिळवण्यासाठी. त्यानेही असेच पूर्वीच्या सम्राटाला हरविले होते आणि या राज्याचा ताबा घेतला होता.मग आपण जे केले तेच इतरही करतील याची त्याला खात्रीच असेल.

तो कसे विसरणार ते. म्हणून ती भीती आणि म्हणून ते सारखे मागे वळून पाहणे.

पण आम्ही मानव इतर शक्तिवान प्राण्यांना मोठाच मान देतो. त्यांच्या हालचाली, त्यांच्या दिसण्याला मोठ्याच कविकल्पना लावतो आणि त्यांना देवासारखे रूप आणि महत्व देतो.

आपली प्रगती किंवा अधोगती किती झाली आहे ते मोजायला आपण जे रिव्ह्यू घेतो त्याला सिंहावलोकनच म्हणतो.

आपण काय विचार करतो आणि सिंह काय विचार करतो यांत काही साम्य आहे का? का आपला त्या चुकांचा किंवा चांगल्या कामाचा रिव्ह्यू मस्त दिसावा आणि त्याला भारदस्त नाव असावे म्हणून आपण त्यालाही सिंहावलोकन असेच नाव दिले आहे?

a

जेवढा राजा किंवा सम्राट मोठा तेवढी त्याला वाटणारी भीती आणि चिंताही मोठी. आपलाच एखादा युवराज येऊन आपला खात्मा करील की काय अशीही भीती असतेच त्याला. सिंहांच्या राज्यांत युवराज त्याची आयाळ दिसायला लागली की कळपाबाहेर केला जातो. मग तीन तीन युवराज एकत्र येऊन संघ बनवतात. एकत्र रहातात आणि शिकार करतात.

शिकार करणे झाले की इतर कळप कुठे आहेत, त्यांचे सम्राट काय करत आहेत याची चौकशी सुरू होते आणि हे युवराज त्या सम्राटांना हाकलून देऊन आपले राज्य करणे जमते आहे का याचा प्रयत्न करत रहातात.

या भटक्या युवराज मंडळी पासून आपले राज्य कसे सांभाळायचे याचीच चिंता त्या सम्राटाला लागून रहाते. कधी कधी तो हल्ला परतवून लावतो कधी हरून नामशेष होतो. चिंताग्रस्त हा राजा म्हणून सारखे मागे वळून कोणी नाही ना येत आपल्यामागे म्हणून सारखा मागे वळून पहात असेल.

आम्ही त्याला भारदस्त असे सिंहावलोकन नाव दिले आहे.

पुरुषसिंह असेच चिंताग्रस्त असतील म्हणून त्यांनाही असेच सारखे मागे वळून पहायला लागत असेल बहुतेक. म्हणून ते सारखे मागे वळून बघत असतात. सारख्या रिव्ह्यू मिटिंग्ज घेत असतात. पुढे जावे का थांबून कोणी शत्रू

a

किंवा असेच युवराजांचे संघ आपल्यामागे लागले आहेत का ते पहाणे मोठेच काम होऊन बसते. सारखे मागे वळून पाहिल्याने आपली प्रगती खुंटते हे तो सिंहही बघत नाही आणि ते पुरुषसिंह ही बघत नाहीत.

एकदा तो राजा पराभूत झाला की मग त्याचा भाव अगदीच उतरतो. आपल्याच राण्या त्याला काहीही किंमत देईनाश्या होतात आणि तो अगदीच एकलकोंडा आणि हाकलून दिलेला माजी सम्राट होतो.

सम्राट सिंहाचे असे राज्य दोन किंवा तीनच वर्षे चालते. तो पर्यंत तो अगदी चैन करून घेतो. खायला प्रथमक्रम, मुले त्याची स्वतःच्या राण्यांवर सत्ता, एकूण आरामाचे जीवन चालते त्या दोन तीन वर्षांत. मग त्याच्या नशिबी उपासमार, निंदानालस्ती आणि एकलकोंडेपण ठरलेलेच. पुरुषसिंहांचे तसेच असते असे दिसले आहे. फक्त ते बेगमी करून ठेवतात हा आमचा वनराज मात्र ते करत नाही. त्याला शिकवले पाहिजे हे.

मग असा माजी सम्राट सिंहावलोकन करतो की नाही ते मात्र स्पष्ट झालेले दिसत नाही. एकदा रिटायर झाल्यावर काय भीती, चिंता आणि मागे काय झाले याची काळजी?

पुरुषसिंह असेच असतात की काय?

पण एक आहे, एकदा रिटायर झाल्यावर मागे लागणारे युवराज नसले तरी एकच का होईना आपली म्हणून एक राणी रहातेच त्याच्या बरोबर. सिंहावलोकन करायची गरज आणि चिंता निघून जाते.

तसे का असेना, निश्चिंत जीवन तरी जगता येते ना? ते काय कमी आहे?

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# श्रीरंग कौलगी यांचं हे ई साहित्यवरील पहिलं पुस्तक.

श्रीरंग कौलगी हे त्या काळातील इंजिनियर जेव्हा भारतात हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच इंजिनियरिंग कॉलेजेस होती. इंजिनियर हा त्या काळचा क्रीम. इंजिनियरिंग सोबतच त्यांचा इतर छंद जोपासण्याचा स्वभाव व वाचन आणि चिंतन यांमुळे आयुष्याकडे त्यांनी सजगपणे पाहिले. त्यांच्या लेखनातून त्यांचा मौलिक अनुभव आणि त्यांचे खुसखुशीत भाषेतील चिंतन अशी दुहेरी मेजवानी मिळते.

डॉ. बंकटलाल जाजू यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि.

a

देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

।आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी॥